सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
Solapur Tarun Bharat
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | रविवार, २३ फेब्रुवारी २०२५ | वर्ष दुसरे | अंक ३२९ | पाने : ८ | किंमत रु. ६/-
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# मंत्र्याला वाटप केलेले खातेच अस्तित्वात नसल्याची धक्कादायक माहिती उघड!

## पंजाब सरकारच्या कामकाजावर प्रश्नचिन्ह

चंदीगढ : पंजाबमध्ये सत्ताधारी आम आदमी पक्षाच्या सरकारचे आणखी एक वादग्रस्त प्रकरण समोर आले आहे. राज्याचे मंत्री कुलदीप सिंग धालीवाल तब्बल २० महिने अशा खात्याचे नेतृत्व करत होते, जे प्रत्यक्षात अस्तित्वातच नव्हते. मुख्य सचिवांनी जारी केलेल्या अधिसूचनेनंतर हा धक्कादायक खुलासा झाला आहे, ज्यामुळे पंजाबच्या राजकारणात मोठी खळबळ उडाली आहे.

यापूर्वी धालीवाल यांच्याकडे कृषी आणि शेतकरी कल्याण खाते होते. मे २०२३ मध्ये झालेल्या मंत्रिमंडळ फेरबदलात मुख्यमंत्री भगवंत मान यांच्या नेतृत्वाखालील सरकारने धालीवाल यांना प्रशासकीय सुधारणा विभाग दिला होता, मात्र ते खाते कधीच अस्तित्वात नव्हते. आता या प्रकरणानंतर धालीवाल यांच्याकडे केवळ एनआरआय व्यवहार विभाग राहणार आहे. ७ फेब्रुवारी २०२५ पासून या निर्णयाची अंमलबजावणी होईल, अशी अधिकृत माहिती अधिसूचनेत देण्यात आली आहे.

शुक्रवारी मुख्य सचिवांनी जारी केलेल्या राजपत्र अधिसूचनेत ही वस्तुस्थिती समोर आली आहे. यामध्ये धालीवाल यांना देण्यात आलेला प्रशासकीय सुधारणा विभाग अस्तित्वातच नसल्याचे म्हटले आहे.

या प्रकारावर विरोधकांनी सरकारवर जोरदार टीका केली आहे. भाजपा प्रवक्ते प्रदीप भंडारी यांनी हा प्रकार 'केजरीवाल मॉडेल' असल्याचे सांगत पंजाब सरकारची खिल्ली उडवली. त्यांनी प्रश्न उपस्थित केला की, एक मंत्री २० महिने अस्तित्वात नसलेल्या खात्याचे काम कसे पाहत होता? आणि एवढ्या दीर्घ काळानंतरच हे सरकारला समजले, यावर विश्वास ठेवायचा तरी कसा?

मे २०२३ मध्ये झालेल्या मंत्रिमंडळ फेरबदलात धालीवाल यांच्याकडून कृषी आणि शेतकरी कल्याण खाते काढून घेतले गेले आणि त्यांना प्रशासकीय सुधारणा विभाग देण्यात आला. मात्र, सप्टेंबर २०२४ मध्ये आणखी एका फेरबदलात अस्तित्वात नसलेले खातेच त्यांच्या वाट्याला आले. त्यामुळे प्रशासनातील ही गंभीर चूक सरकारच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण करणारी असल्याचे विरोधकांचे मत आहे.

दिल्ली विधानसभेच्या निवडणुकीत आम आदमी पक्षाला बसलेल्या मोठ्या पराभवानंतर पंजाबमध्येही पक्षाविरोधात वातावरण निर्माण झाले आहे. मुख्यमंत्री भगवंत मान हे दिल्लीच्या दबावाखाली काम करत असल्याचे आरोप होत आहेत. तसेच, अरविंद केजरीवाल यांचा पंजाब सरकारच्या निर्णयांमध्ये थेट हस्तक्षेप असल्याची टीका विरोधक सातत्याने करत आहेत. या निर्णयाला त्यांनी 'केजरीवाल मॉडेल' असे म्हटले आहे.

दरम्यान, भाजपाचे प्रवक्ते प्रदीप भंडारी म्हणाले, आपने पंजाबमधील कारभाराला विनोद बनवलंय. आपच्या एका मंत्राने २० महिने असा विभाग चालवला, जो कधीच अस्तित्वात नव्हता. २० महिने मुख्यमंत्र्यांना सुद्धा माहित नव्हते की, एक मंत्री 'अस्तित्वात नसलेला विभाग' चालवत आहे. पंजाब सरकारला जर त्यांच्या एका प्रमुख मंत्र्यांना सोपवलेले खाते प्रत्यक्षात कधीच अस्तित्वात नव्हते, हे समजण्यासाठी जवळजवळ २० महिने लागले तर तुम्ही कल्पना करू शकता. त्यामुळे एवढे दिवस मुख्यमंत्री भगवंत मान नेमकं काय करत होते? असे सवाल उपस्थित करत भारतीय जनता पक्षाच्या नेत्यांनी भगवंत मान यांच्या कार्यपद्धतीवर सवाल उपस्थित केले आहेत.

## सर्वसामान्यांना बसणार वीज दरवाढीचा शॉक!

मुंबई : गेल्या काही महिन्यांपासून राज्यभरात खाद्यतेल, कडधान्ये, भाजीपाला, साबण यासारख्या गरजेपयोगी गोष्टींच्या किंमतीत वाढ होत आहे. तर काही दिवसांपूर्वी सर्वसामान्यांच्या प्रवासदरम्यान पसंतीस असणारी एसटीच्या तिकीट दरातही वाढ करण्यात आली. त्यानंतर रिक्षा आणि टॅक्सी प्रवासातही दरवाढ लागू करण्यात आली. सातत्याने वाढत असणाऱ्या या महागाईमुळे सर्वसामान्यांच्या खिशाला चांगलाच फटका बसत आहे. यामध्ये आता वीज दरवाढीचा शॉक देखील लागण्याची चिन्हे दिसून येत आहेत.

महाराष्ट्र राज्य वीज नियामक आयोगाकडे वीज दर निश्चितीच्या प्रस्ताव दाखल करण्यात आला आहे. यामध्ये प्रत्यक्षात फिक्स चार्ज (स्थिर आकार) १२ ते १५ टक्क्यांनी वाढवला असून व्हेरिएबल चार्ज वाढवणार नसल्याचे म्हटले आहे. मात्र, दोन्हीपैकी एक दर जरी वाढले तरी वाढीव वीज बिलाचे पैसे ग्राहकांच्याच खिशातून जाणार आहेत. एकंदरित संपूर्ण बेरीज-वजाबाकी केली तर ग्राहकांना ५ ते १० टक्के वीज दरवाढीचा शॉक बसणार आहे. याबाबत मंगळवार २५ फेब्रुवारी रोजी नवी मुंबईमधील सिडको भवनमध्ये सुनावणी होणार आहे. त्यामुळे ऐन उन्हाळ्याच्या तोंडावर महावितरणाकडून ग्राहकांना वीज दरवाढीचा झटका मिळणार आहे.

## मुंबई-नाशिक महामार्गावरील कसारा घाट पुढील ६ दिवस दोन टप्प्यात राहणार बंद



मुंबई : मुंबई- नाशिक महामार्गावरील जुना कसारा घाट पुढील ६ दिवस वाहतुकीसाठी बंद राहणार आहे. मुंबई - नाशिक महामार्गावरील जुन्या कसारा घाटात रस्ता दुरुस्तीच्या कामासाठी २ टप्प्यात पुढील ६ दिवस ट्रॅफिक ब्लॉक घोषित करण्यात आला आहे. सकाळी ८ ते संध्याकाळी ६ वा या वेळेत हा ट्रॅफिक ब्लॉक घेतला जाणार आहे.

सोमवारपासून म्हणजेचं २४ फेब्रुवारी २०२५ ते २७ फेब्रुवारी २०२५ या कालावधीत तसेच ३ मार्च ते ६ मार्च या दरम्यान जुन्या कसारा घाटात रस्ता दुरुस्ती व पावसाळ्याच्या पूर्वतय्यारी साठी कसारा घाटातून नाशिककडे जाणारी वाहतूक दिवसभरासाठी बंद करण्यात येणार असून या दरम्यान नाशिक दिशेकडे जाणारी वाहतूक नाशिक मुंबई लेनवरील नवीन कसारा घाटातून वळविण्यात येणार आहे. तर जुना कसारा घाट दुरुस्ती दरम्यान बंद असणार असल्याने लहान वाहणाची वाहतूक नवीन कसारा घाटातून वळविण्यात येणार आहे परंतु या दरम्यान या मार्गावरून अवजड वाहनांना पूर्ण पणे बंदी घालण्यात आली असून ओडिसीसारखी अवजड वाहने मुंबई पुणे एक्सप्रेस वे च्या मार्गे वळविण्यात येणार आहेत.

दरम्यान कसारा घाटातील रस्ते दुरुस्ती व त्यामुळे वळविण्यात येणारी मार्गिका लक्षात घेता मुंबई नाशिक शिर्डी प्रवास करणाऱ्या प्रवाशांनी या कालावधीदरम्यान वाहनचालकांना काही अडचण असल्यास मदतीसाठी कसारा पोलीस, महामार्ग पोलीस घोटी केंद्र,महामार्ग पोलीस शहापूर केंद्र,आपत्ती व्यवस्थापन टीम नवीन कसारा घाटात कार्यरत असून नवीन कसारा घाटात ठिकठिकाणी पोलीस कर्मचारी व मदत केंद्र उभारली जाणार आहेत. जुन्या कसारा घाटातील डोकावणाऱ्या दरडी, जुनी महाकाय वृक्ष देखील या कालावधीत काढावीत त्यामुळे भविष्यात म्हणजेच पावसाळ्यात त्रास होणार नाही अशी मागणी आपत्ती व्यवस्थापन सदस्याकडून करण्यात येत आहे.

# समाजातील शेवटच्या घटकापर्यंत न्यायदानाचे कार्य जलदगतीने व्हावे : न्यायमूर्ती भूषण गवई

तभा वृत्तसेवा

हिंगोली, २२ फेब्रुवारी सामाजिक व आर्थिक विषमता संपवून समाजातील शेवटच्या घटकापर्यंत न्यायदानाचे कार्य हे जलदगतीने आणि कमी खर्चात व्हावे, असा आशावाद सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती भूषण गवई यांनी यावेळी व्यक्त केला.

आज येथील नवीन स्वतंत्र न्यायिक जिल्हा न्यायालयाचे व नवीन प्रशस्त न्यायालयीन ईमारतीचा लोकार्पण न्यायमूर्ती भूषण गवई यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती प्रसन्ना भा. वराळे, मुंबई उच्च न्यायालयाचे आलोक आराधे, मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती रवींद्र घुगे, नितीन सांबरे, नितीन सुर्यवंशी, यनशिवराज खोब्रागडे यांच्यासह आमदार तानाजी मुटकुळे, मुंबई उच्च न्यायालयाचे ३० ते ३५ न्यायमूर्ती, परभणीच्या जिल्हा व सत्र न्यायाधीश श्रीमती उज्वला नंदेश्वर आणि नवीन न्यायिक जिल्ह्याचे पहिले प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तुफानसिंग एस. अकाली, विशेष पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप, जिल्हाधिकारी अभिनव गोयल, परभणीचे जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे, मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांची उपस्थिती होती.

यावेळी बोलताना न्यायमूर्ती श्री. गवई म्हणाले, स्वतंत्र न्यायिक जिल्हा व इमारतीचे उद्घाटन केल्याबद्दल वकील संघाचे अभिनंदन करून, स्वतंत्र जिल्हा झाल्यानंतर आता हिंगोली जिल्हा व सत्र न्यायालयाची सर्व सोयीसुविधांनी युक्त भव्य आणि देखणी अशी उत्कृष्ट इमारत बांधली आहे. अमरावती, कोल्हापूर जिल्हा न्यायालयाची इमारत स्थापत्य कलेचा उत्कृष्ट नमुना ठरला असल्याचे त्यांनी सांगितले. स्वतंत्र न्यायिक जिल्हा न्यायालय सुरु करण्यासाठी व न्यायालयासाठी लागणारी नवीन इमारत यासाठी चांगली भूमिका निभावल्याबद्दल विधी विभाग, प्रशासनाचे त्यांनी अभिनंदन केले. या इमारतीतून समाजातील सामाजिक आर्थिक विषमता दूर करत समाजातील शेवटच्या नागरिकाला जलदगतीने कमी वेळेत, कमी खर्चात न्याय मिळाला पाहिजे, असा आशावाद व्यक्त केला. नैसर्गिक न्यायाचा हक्क हा शेवटच्या नागरिकांचा मूलभूत हक्क आहे. येथील न्यायालयाचे इमारत बांधकाम उत्कृष्ट झाले आहे. त्यामुळे महाराष्ट्र राज्य हे पायाभूत सोयीसुविधांच्या बांधकामाबाबत कुठेही मागे नसल्याचे सांगून ही इमारत स्वच्छ ठेवण्यावर भर देत न्यायालयीन इमारत परिसरात वृक्षारोपण करत पर्यावरणाचे संरक्षण करणे गरजेचे असल्याचे न्यायमूर्ती भूषण गवई यांनी यावेळी सांगितले.

नागरिकांच्या मूलभूत हक्काची पायमल्ली होता कामा नये. त्यासाठी न्यायाधीश, वकील आणि अधिकाऱ्यांनी सकारात्मक प्रयत्न करावेत. हिंगोली जिल्ह्यात जन्मलेल्या संत नामदेवांनी १३ व्या शतकात सामाजिक, आर्थिक न्यायाचे बिजारोपण केले होते. नरसीपासून ते पंजाबपर्यंत यासाठी त्यांनी प्रयत्न केले, असे सांगितले.

उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती प्रसन्ना वराळे यांनी या कार्यक्रमासाठी ऐतिहासिक सोहळ्याचा साक्षीदार होण्याची संधी दिल्याबद्दल आयोजकांचे आभार व्यक्त करताना म्हणाले, ज्या ज्या वेळी या भागात येतो तेव्हा अधिक आपुलकीची भावना निर्माण होते. येथे वडिलांचा नोकरीनिमित्त बराच काळ गेल्याचे सांगत ते जुन्या आठवणीत रमले. विधी सेवा प्राधिकरणाचा पदभार न्यायमूर्ती गवई यांनी स्वीकारल्यानंतर नालसा या गिताचा मराठीत अनुवाद पूर्ण झाला असून लवकरच ते मराठीत येईल. यावेळी न्यायमूर्ती गवई यांची लवकरच देशाच्या सरन्यायाधीश पदी नियुक्ती होणार असून ते देशाची न्यायव्यवस्था समर्थपणे सांभाळतील याचा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

महाराष्ट्र भूमी ही संत महात्म्याची भूमी म्हणून ओळखली जाते. नवीन इमारतीत न्यायदानाचे काम अधिक प्रभावी व गतिशील होईल, असा विश्वास मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती आलोक आराध्ये यांनी व्यक्त केला. या इमारतीतून न्यायदानाचे पवित्र कार्य होते. ते पावित्र्य राखण्याची जबाबदारी आपल्या सर्वांची आहे, असे सांगून इमारत स्वच्छतेवर यंत्रणेने विशेष लक्ष देण्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

पालक न्यायमूर्ती नितीन सुर्यवंशी यांनी नवीन न्यायालयीन इमारत हे आपल्या कार्यक्षमता, न्यायव्यवस्थेच्या शुद्धतेचा पाया आहे. या नवीन इमारतीत न्यायदानाचा गतिशील आदर्श घालवून द्यावा, असे सांगितले.

पालक न्यायमूर्ती यनशिवराज खोब्रागडे यांनी हिंगोलीतील जिल्हा व सत्र न्यायालयाच्या नूतन इमारतीचे उद्घाटन प्रसंगी हिंगोली जिल्हा आजपासून स्वतंत्र न्यायिक जिल्हा म्हणून घोषित झाल्याबद्दल अभिनंदन केले. यामुळे आजपासून जिल्ह्यातील नागरिकांना लवकरात लवकर न्याय मिळेल, असा विश्वास व्यक्त केला. आमदार तानाजी मुटकुळे यांनी स्वतंत्र हिंगोली न्यायिक जिल्हा झाला आहे. हा क्षण सुवर्णाक्षरांनी लिहावा, असा आहे. नवीन इमारत व जिल्हा न्यायालयामुळे न्यायदेवतेवरील विश्वास दृढ होत जावो, असे सांगून न्यायाधीश, वकीलांच्या प्रशिक्षण केंद्रांसाठी मागणीचा पाठपुरावा शासनदरबारी करणार असल्याचे सांगितले. परभणीच्या प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश उज्वला नंदेश्वर यांनी हिंगोलीसाठी आज स्वतंत्र न्यायालय झाले असल्याचे सांगून न्यायदानाचे कार्यही तितकेच उच्च दर्जाचे होईल, असे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक ड. सतीश देशमुख यांनी केले. तर शेवटी आभार हिंगोलीचे नव नियुक्त प्रमुख व जिल्हा व सत्र न्यायाधीश तुफानसिंग अकाली यांनी केले.

कार्यक्रमाचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते फीत कापून व कोनशीलेचे अनावरण करुन करण्यात आले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला भारतीय नागरिकांची सनद आणि त्यांचे अधिकार याची माहिती देणारे 'एक मुठ्ठी आसमा हे' नालसा गीत सादर करण्यात आले. उर्मिला जगताप व देवयानी गायकवाड यांनी स्वागत गीत गायिले.

यावेळी सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती भूषण गवई यांनी स्वातंत्र्यसैनिक माणिकराव टाकळगव्हाणकर व समाजसेवक मधुकरराव मांजरमकर यांचा सत्कार केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अर्चना ताम्हणे, गजानन नंदनवार आणि प्रियंका पमनानी यांनी केले. शेवटी राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# गावठाण, गायरान इत्यादी जागेचा तिढा सोडवून पात्र लाभार्थ्यांना घरकुल योजनेचा लाभ द्यावा असे निर्देश : अब्दुल सत्तार

तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.२२ फेब्रुवारी

गावठाण,गायरान इत्यादी जागेचा तिढा सोडवून पात्र लाभार्थ्यांना घरकुल योजनेचा लाभ द्यावा असे निर्देश माजी मंत्री,आमदार अब्दुल सत्तार यांनी सोयगाव येथील गटविकास अधिकऱ्यांना दिले.राज्यातील बेघरांना घरे देण्यासाठी शासन कटिबद्ध असून प्रधानमंत्री आवास योजनेच्या टप्पा - ३ मध्ये एकही पात्र लाभार्थी घरकुल योजनेपासून वंचित राहणार नाही याची काळजीपूर्वक दक्षता घ्यावी असे देखील आ.अब्दुल सत्तार म्हणाले.



सोयगाव येथील पंचायत समितीच्या आवारातील बचत भवन येथे प्रधानमंत्री आवास योजना टप्पा दोन मधील लाभार्थ्यांना घरकुल मंजुरी आदेशाचे वाटप व प्रथम हप्ता वितरण कार्यक्रम आमदार अब्दुल सत्तार यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला.यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करीत असताना आमदार अब्दुल सत्तार बोलत होते.

प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण टप्पा - २ अंतर्गत सोयगाव तालुक्यासाठी ४ हजार ७०६ घरकुलाचे उद्दिष्ट आहे. तर ४ हजार ४०९ पात्र लाभार्थ्यांना घरकुल योजनेची मंजुरी देण्यात आलेली आहे.४ हजार ४०९ पैकी १ हजार २८१ लाभार्थी यांनी पहिला हप्ता वितरित करण्यात आलेला आहे. संबंधित लाभार्थ्यांचे घरकुल बांधकाम चालू आहे. या अनुषंगाने आज २ हजार ४५० लाभार्थ्यांना पहिला हप्ता व मंजूर आदेश प्रमाणपत्राचे वितरण आ. अब्दुल सत्तार यांच्याहस्ते करण्यात आले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रस्ताविक गटविकास अधिकारी दादाराव आहिरे यांनी केले. तर शेवटी कृषी अधिकारी संतोष भालेराव यांनी आभार मानले. कार्यक्रमास शिवसेना उपजिल्हाप्रमुख प्रभाकर आबा काळे, सिल्लोड पं. स. माजी उपसभापती अजीजशेठ बागवान,सोयगाव नगर परिषदेतील शिवसेना पक्षाचे गटनेते अक्षय काळे,नॅशनल सहकारी सूतगिरणीचे संचालक राजेंद्र ठोंबरे,प्रशांत क्षीरसागर,माजी जिल्हा परिषद सदस्य गोपीचंद जाधव,बंडू काळे,नगरसेवक संतोष बोडखे,कदिर शहा,राजू दुतोंडे, उस्मान पठाण आदिंसह पं.स.कार्यालयातील अधिकारी, कर्मचारी व लाभार्थ्यांची उपस्थिती होती.

# उपराष्ट्रपती जगदिप धनखड यांनी घेतले वेरूळ येथे,घृष्णेश्वरचे दर्शन


खुलताबाद प्रतिनिधी : भारताचे उपराष्ट्रपती महामहीम जगदीप धनखड यांनी शनिवार २२ फेब्रुवारी रोजी दुपारच्या सुमारास वेरूळ येथील श्री घृष्णेश्वर महादेवाची महापूजा करत अभिषेक केला. यावेळी माजी केंद्रीय अर्थराज्यमंत्री खा भागवत कराड, उपविभागीय अधिकारी संतोष गोराड,घृष्णेश्वर मंदिर देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष श्री योगेश टोपरे, विश्वस्त राजेंद्र कौशिके,संजय वैद्य, माजी अध्यक्ष दीपक शुक्ल अग्निहोत्री, भारतीय पुरातत्त्व विभागाचे राजेश वाकलेकर , गटविकास अधिकारी पंचायत समिती खुलताबाद प्रकाश नाईक यांनी उपराष्ट्रपती यांचे सपत्नीक स्वागत केले.



तद नंतर श्री धनखड हे वेरूळ लेणी पाहून पुढील नियोजित कार्यक्रमासाठी छत्रपती संभाजीनगर येथे रवाना झाले. दरम्यान वेरूळ सह परिसरात उपराष्ट्रपती येणार असल्याने छावणीचे स्वरूप प्राप्त झाले होते. जागोजागी पोलीस बंदोबस्त, त्याचप्रमाणे बॉम्ब शोधक पथक,आरोग्य विभागाचे रुग्णवाहिका आणि मोठा ताफा त्यांच्या सुरक्षेसाठी तैनात करण्यात आलेला होता.







सोलापूर तरुण भारत न मे कर्मफले स्पृहा
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com



हिंगोली येथील जिल्हा व सत्र न्यायालयाच्या नवीन इमारतीचे उद्घाटन करतांना सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती भूषण गवई, न्यायमूर्ती प्रसन्ना वराले, मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमर्ती यनशिवराज खोब्रागडे न्यायमूर्ती आलोक आराध्ये, न्यायमूर्ती रवींद्र घुगे, न्यायमूर्ती नितीन सांबरे, न्यायमूर्ती नितीन सूर्यवंशी, परभणी जिल्हा व सत्र न्यायाधीश उज्वला नंदेश्वर, हिंगोली जिल्हा व सत्र न्यायाधीश तुफान सिंग अकाली, अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायाधीश राजेंद्र लोखंडे, बार कौन्सिल चे सदस्य अँड सतीश देशमुख, आ. तान्हाजी मुटकुळे, वकील संघाचे अध्यक्ष सुनील भुक्तर, जिल्हाधिकारी अभिनव गोयल, मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले आदींची उपस्थिती होती .

### अथर एनर्जी लि.च्या प्रतिनिधींची जिल्हाधिकाऱ्यांशी भेट

## सामाजिक उत्तरदायित्व निधीतून महिलांचे आरोग्य, कुपोषण इ. क्षेत्रात योगदान देणार

छत्रपती संभाजीनगर, दि.२१ – अथर एनर्जी लि. या कंपनीच्या माध्यमातून १० हजार जणांना रोजगार उपलब्ध होणार आहे. त्यासोबतच कंपनी आपल्या सामाजिक उत्तरदायित्व निधीतून महिलांचे आरोग्य, त्यांच्यातील रक्ताल्पता, कुपोषण अशा क्षेत्रात कामगिरी करु इच्छिते,असे कंपनीच्या प्रतिनिधींनी आज जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांना सांगितले.

अथर एनर्जी लि. च्या प्रतिनिधींची आज जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांच्याशी भेट घेतली. भेटीप्रसंगी निवासी उपजिल्हाधिकारी विनोद खिरोळकर, अथर एनर्जीचे मुख्य कार्यान्वयन अधिकारी संजिवकुमार सिंग, मुख्य प्रशासकीय अधिकारी श्रीकांत विश्वेश्वरन, प्रकल्प प्रमुख शेखर जी., जनसंपर्क अधिकारी अमोल मोहिते उपस्थित होते. श्री. सिंग यांनी प्रकल्प उभारणीच्या कामाबाबत माहिती दिली. जिल्हाधिकारी स्वामी यांनी प्रकल्प कार्यान्वीत करुन या भागातील युवकांना रोजगार द्यावा.

# आधारभूत किंमत खरेदी योजनेंतर्गत तूर खरेदी सुरू; जिल्ह्यात १५ खरेदी केंद्र निश्चित

तभा वृत्तसेवा
हिंगोली, २२ फेब्रुवारी

केंद्र शासनाच्या आधारभूत किंमत खरेदी योजनेंतर्गत एनसीसीएफच्या वतीने खरीप हंगाम २०२४-२५ मध्ये मूग, उडीद, सोयाबीन खरेदी करण्यासाठी खरेदी केंद्र निश्चित करण्यात आले असून, येथे खरेदीसाठी दि. २४ जानेवारीपासून नोंदणी सुरु झाली आहे. तसेच खरेदी केंद्रावर दि. १३ मेपर्यंत तूर खरेदी करण्यात येणार आहे.

तूर खरेदी करण्यासाठी जिल्ह्यात १५ खरेदी केंद्र निश्चित केली आहेत. त्या ठिकाणी नोंदणीला सुरुवात झाली आहे. खरेदी केंद्राचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

कयाधु शेतकरी उत्पादक कं. मर्या. तोंडापूर ता. कळमनुरी या संस्थेचे खरेदी केंद्र वारंगा फाटा व कळमनुरी येथे आहेत. वारंगा फाटा येथील केंद्र चालक मारोती कदम (९७३६४४९३९३) तर कळमनुरी येथे महेंद्र माने (९६८९२२९३९३) हे आहेत.

हजरत नासरगंज बाबा स्वयंसेवी सेवा सहकारी संस्था म. हिंगोली या संस्थेचे खरेदी केंद्र येहळेगाव ता. औंढा नागनाथ येथे आहे. येथे केंद्र चालक शेख गफार शेख अली हे (९८८१५०१०४०) आहेत. प्रगती स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था, हिंगोली या संस्थेचे खरेदी केंद्र हिंगोली येथे आहे. येथे केंद्रचालक नारायणराव देशमुख हे (९८५०७९२७८४) कामकाज पाहणार आहेत.

औंढा नागनाथ तालुका सहकारी खरेदी विक्री संघ मर्या. औंढा (ना) या संस्थेचे खरेदी केंद्र जवळा बाजार ता. औंढा नागनाथ येथे आहे. या संस्थेवर केंद्र चालक कृष्णा हरणे हे (९१७५५८६७५८) आहेत. श्री संत नामदेव स्वयंरोजगार सहकारी संस्था म. चोरजवळा या संस्थेचे खरेदी केंद्र कन्हेरगाव ता. जि. हिंगोली येथे आहे. या संस्थेवर केंद्रचालक अमोल काकडे हे (८००७३८६१४३) आहेत.

विजयलक्ष्मी बेरोजगार सहकारी संस्था म. कोळसा ता. सेनगाव या संस्थेचे खरेदी केंद्र साखरा ता. सेनगाव येथे आहे. केंद्र चालक उमाशंकर माळोदे हे काम पाहणार आहेत. त्यांना ९४०३६५१७४३ क्रमांकावर संपर्क साधावा. श्री संत भगवानबाबा स्वयंरोजगार सेवा संस्था कोथळज या संस्थेचे खरेदी केंद्र सेनगाव येथे आहे. केंद्र चालक निलेश पाटील (९८८११६२२२२) हे असून, वसमत तालुका सहकारी खरेदी विक्री संघ मर्यादित, वसमत या संस्थेचे खरेदी केंद्र वसमत येथे आहे. केंद्र चालक सागर इंगोले हे काम पाहणार आहेत. त्यांचा संपर्क क्रमांक ८३९०९९५२९४ असा आहे. गोदावरी व्हॅली फार्मर प्रोड्युसर कंपनी लि. शिवणी खु. ता. कळमनुरी येथे आहे. केंद्र चालक कैलास ढोकणे हे आहेत. त्यांचा संपर्क क्रमांक ७४४७७५८३१२ असा आहे.

श्री. फाळेश्वर महाराज फार्मर प्रोड्युसर कंपनी या संस्थेचे खरेदी केंद्र फाळेगाव येथे आहे. या संस्थेवर केंद्र चालक म्हणून मारोती वैद्य हे असून, त्यांचा संपर्क क्रमांक ९९७५०५५७३१ असा आहे. मान्यता फार्मर प्रोड्युसर कंपनी लि. या संस्थेचे खरेदी केंद्र नागासिंगी येथे आहे. या संस्थेवर केंद्र चालक म्हणून संदीप काकडे हे असून, त्यांचा संपर्क क्रमांक ९८२३२५२७०७ असा आहे. सप्तरंग ग्रेन फार्मर प्रोड्युसर कंपनी लि. या संस्थेचे खरेदी केंद्र आडगाव येथे आहे. या संस्थेवर केंद्र चालक म्हणून कल्याण गायकवाड हे असून, त्यांचा संपर्क क्रमांक ९५११६८६८८२ असा आहे. वाबळे अँड ऑदर फार्मर प्रोड्युसर कंपनी लि. या संस्थेचे खरेदी केंद्र उमरा येथे आहे. या संस्थेवर केंद्र चालक म्हणून सत्यभामा वाबळे ह्या असून, त्यांचा संपर्क क्रमांक ८८०५९७५६०४ असा आहे. श्री बेलेश्वर महाराज फार्मर प्रोड्युसर कंपनी लि. या संस्थेचे खरेदी केंद्र पुसेगाव येथे आहे. या संस्थेवर केंद्र चालक म्हणून माधव गाडे हे असून, त्यांचा संपर्क क्रमांक ९४२३७३७६७२ असा आहे.

शेतकरी बांधवांनी आपल्या तालुक्यातील केंद्राच्या ठिकाणी संपर्क करुन नोंदणी करावी. नोंदणीसाठी सोबत खरीप हंगाम २०२४-२५ मधील सातबारावर ऑनलाईन पीकपेरा नोंद असावा. आधार कार्ड झेरॉक्स, बँक पासबूक झेरॉक्स सोबत आणावे. बँक पासबुकवर शेतकऱ्यांचे नाव, खाते क्रमांक, आयएफएससी कोड स्पष्ट असावा (जनधन बँक खाते किंवा पतसंस्थेतील खाते क्रमांक देऊ नये). संबंधित तालुक्यातील केंद्राच्या ठिकाणी तूर हमीभावाने खरेदी करण्यासाठी शेतकऱ्यांना नोंदणी करण्याचे आवाहन जिल्हा पणन अधिकारी , परभणी / हिंगोली यांनी प्रसिध्दी पत्रकाद्वारे केले आहे.

# हिंगोली जिल्हा रुग्णालयात पहिली दुर्बिणीद्वारे गुडघ्याची शस्त्रक्रिया यशस्वी



हिंगोली : जिल्हा रुग्णालयात दिनांक २२ फेब्रुवारी २०२५ रोजी गुडघ्याच्या मधील फाटलेल्या गादीसाठी करण्यात आलेली जिल्ह्यातील पहिली दुर्बिणीद्वारे शस्त्रक्रिया यशस्वीरित्या पार पाडण्यात आली.

जिल्हा शल्य चिकित्सक डॉ नितीन तडस व डॉ गोपाल कदम यांच्या मार्गदर्शनाखाली ही शस्त्रक्रिया यशस्वीरित्या झाली.

अस्थिरोगतज्ञ डॉ मंगेश टेहरे व डॉ मनीष बगडिया यांनी यासाठी विशेष प्रयत्न केले.

पाय लचकून पडल्यामुळे २२ वर्ष गारमाळ येथील आयान नथू गरीब या तरुणाच्या गुडघ्याच्या मधील गादी फाटल्याचे निदान एमआरआय स्कॅन वर झाले होते. त्यासाठी लागणारी बिन टाक्याची शस्त्रक्रिया जिल्हा रुग्णालयात प्रथमच यशस्वीरित्या पार पाडण्यात आली.

यासाठी नांदेडचे सुप्रसिद्ध डॉ मुकेश मालू, जे की दुर्बिणीद्वारे गुडघ्याच्या शस्त्रक्रियेमध्ये विशेष प्राविण्य प्राप्त केलेले आहे त्यांचा सहकार्य लाभला.

सिस्टर बेडे,कंधारे, व क्षीरसागर यांनी व सहाय्यक राजेश काळे व संजू सुतारे यांचे विशेष योगदान राहिले.

# आदर्श मध्ये राज्यस्तरीय वादविवाद स्पर्धेचे पारितोषिक वितरण संपन्न




हिंगोली : येथील आदर्श शिक्षण संस्थेच्या कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात १४ फेब्रुवारी २०२४ रोजी आदर्श शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष स्व. सेठ श्री घनश्यामदासजी काबरा यांच्या स्मरणार्थ ५ व्या राज्यस्तरीय वादविवाद स्पर्धेचे आयोजन राजकीय पक्षाकडून घोषीत करण्यात येणाऱ्या थेट लाभांच्या योजना राज्याच्या विकासास तारक / मारक आहेत या विषयावर करण्यात आले होते. संपूर्ण महाराष्ट्रभरातून विविध महाविद्यालयातील स्पर्धक संघाने सदरील वादविवाद स्पर्धेत आपला सहभाग नोंदविलेला होता.

या स्पर्धेत प्रथम पारितोषिक रोख रक्कम ११ हजार, स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र माणिकचंद पहाडे विधी महाविद्यालय छत्रपती संभाजी नगर येथील स्वप्निल सोपान खरात व प्रथमेश बळीराम गिरी या संघाने पटकावले. द्वितीय पारितोषिक रोख रक्कम ७ हजार, स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र महाराष्ट्र महाविद्यालय निलंगा येथील वाडकर गीता माधव व वाडकर वैष्णवी ज्ञानोबा या संघाने पटकावले तर तृतीय पारितोषिक रोख रक्कम ५ हजार, स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र आदर्श महाविद्यालय हिंगोली येथील विश्वभूषण फकीरा गायकवाड व दिपाली गुलाबराव मस्के या संघाने पटकावले. उत्तेजनार्थ वैयक्तिक पारितोषिक रोख रक्कम अकराशे रुपये तोष्णीवाल महाविद्यालय सेनगाव येथील करण वसंतराव नायक व दिव्या वसंतराव नायक या विद्यार्थ्यांनी पटकावले आहे.

सदरील स्पर्धेचे तज्ञ परिक्षक म्हणून कै. शंकरराव सातव महाविद्यालय, कळमनुरी येथील प्रा. डॉ. प्रमोद इंगोले, श्री योगानंद स्वामी कला महाविद्यालय, वसमत नगर येथील प्रा. डॉ. संजय गायकवाड, न्यू डिग्री मॉडेल कॉलेज हिंगोली येथील प्रा. डॉ. लक्ष्मी गलांडे यांनी काम पाहिले.

स्पर्धेच्या समारोप समारंभ प्रसंगी अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. विलास आघाव हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून सौ सविता कैलाश काबरा, सौ रेखा मुंदडा, स्पर्धेचे मुख्य प्रायोजक कैलाशचंद्र काबरा, केशव काबरा,माधव काबरा यांची उपस्थिती होती. यावेळी प्रमुख पाहुण्यांच्या शुभहस्ते विजेत्या संघांना व स्पर्धकांना पुरस्कार प्रदान करण्यात आले. सदरील कार्यक्रमाचे सुत्रसंचलन प्रा. डॉ. आशीष गट्टानी यांनी केले. तर आभार प्रदर्शन प्रा. निलेश उबाळे यांनी केले.

या कार्यक्रमाप्रसंगी स्टाफ सचिव प्रा. डॉ. सचिन हाटकर, स्टाफ सहसचिव प्रा. वसंत पडोळे तसेच महाविद्यालयाचे सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी व महाविद्यालयातील बहुसंख्य विद्यार्थी तसेच राज्यातील विविध महाविद्यालयातुन आलेले स्पर्धक संघ व त्यांचे संघ व्यवस्थापक यांची उपस्थिती होती.

सदरील स्पर्धेच्या यशस्वी संयोजनासाठी वादविवाद स्पर्धेचे संयोजक प्रा. गजानन चव्हाण, संयोजक समिती सदस्य प्रा. डॉ. आशिष गट्टाणी, प्रा. डॉ. प्रशांत कुमार जोशी, प्रा. डॉ. रविंद्र केणे, प्रा. निलेश उबाळे, प्रा. गजानन डुडूळे, प्रा. डॉ. सत्यजित चव्हाण, प्रा. अमजदखान पठाण, प्रा. डॉ. अण्णाजी मडावी, प्रा. डॉ. बस्वराज लक्षटे, प्रा. डॉ. सुभाष पोले, प्रा. वसंत पडोळे, प्रा. राम तोडकर, प्रा. डॉ. महेश मंगनाळे, प्रा. डॉ. मारोती कोल्हे, प्रा. डॉ. सुरेश लेकुळे, प्रा. तुकाराम आडे, सुभाष जाधव, दुर्गादास टापरे, मुर्लिधर वावधाने, संजय राठोड, सुदर्शन निजलेवार, जीवन मोरे, धम्मा इंगोले, दीपक कंठाळे, रामकिशोर ठाकूर, मदन बैस तसेच महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अथक परिश्रम घेतले.

# जय शिवाजी जय भारत पदयात्रा व कौशल्य दिंडीस प्रतिसाद

तभा वृत्तसेवा
हिंगोली, २२ फेब्रुवारी

भारत सरकारचे केंद्रीय युवक व कल्याण विभागाचे राज्यमंत्री व जिल्हाधिकारी यांच्या सूचनेनुसार हिंगोली जिल्ह्यामध्ये दि. १९ फेब्रुवारी रोजी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३९५ व्या जयंती निमित्त जय शिवाजी जय भारत पदयात्रा तसेच जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, हिंगोली या विभागामार्फत कौशल्य दिंडी काढण्यात आली.

जय शिवाजी जय भारत पदयात्रा व कौशल्य दिंडीचे जिल्हाधिकारी अभिनय गोयल यांच्या हस्ते हिरवी झेंडी दाखवून छत्रपती शिवाजी महाराज चौक येथून पोस्ट ऑफीस, महात्मा गांधी चौक, महावीर चौक, इंदिरा गांधी चौक, परत छत्रपती शिवाजी महाराज चौक या मार्गाने कौशल्य दिंडी काढण्यात आली.

या पदयात्रा व कौशल्य दिंडीप्रसंगी जिल्हा पोलीस अधीक्षक, निवासी उपजिल्हाधिकारी, उपजिल्हाधिकारी, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र), उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामीण विकास), जिल्हा क्रिडा अधिकारी, समाज कल्याणचे सहायक आयुक्त, , जिल्हा उत्सव समितीचे आयक्ष, शिक्षणाधिकारी, जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी, सहायक माहिती अधिकारी, महिला व बाल विकास अधिकारी, जिल्हा युवा अधिकारी, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभागाचे सहायक आयुक्त इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

जय शिवाजी जय भारत पदयात्रा व कौशल्य दिंडीव्दारे महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य विकास विभागात राबविण्यात येणाऱ्या प्रमोद महाजन ग्रामीण कौशल्य विकास योजना, आचार्य चाणक्य कौशल्य विकास योजना, प्रधानमंत्री विश्वकर्मा योजना, रोजगार मेळावा, मॉडेल करिअर सेंटर, मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना व अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ इत्यादी योजनेची कौशल्य दिंडी व स्टॉल लावून योजनेचा प्रचार व प्रसार करण्यात आला.

जय शिवाजी जय भारत पदयात्रा व कौशल्य दिंडीमध्ये कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता विभागातील एकूण ५०३ युवा कार्य प्रशिक्षणार्थी व कौशल्य विकास प्रशिक्षण घेणारे प्रशिक्षणार्थी यांनी सहभाग घेतला. तसेच कार्यालयातील नवनाथ टोनपे, मनोज लोखंडे, राजेभाऊ कदम, रमेश जाधव, नागेश निरदुडे, पवन पांडे व अमोल आडे आदी अधिकारी कर्मचारी यांनी सहभाग घेतला.

### साहित्यसंमेलन विशेष लेख



-डॉ. शेषराव पठाडे,
छत्रपती संभाजीनगर. मो. ९६०४८८४०५६
-लेखक लोककलांचे अभ्यासक, लोककलावंत व पत्रकार आहेत.

# कालसंवादी मराठी लोककला, प्रवाही लोकसंस्कृती!

प्राचीन काळापासून भारतीय पारंपरिक लोककलांचे विश्व समृद्ध आणि संपन्न आहे. विविधतेतील एकता हे पारंपरिक लोककलांचे आगळे-वेगळे वैशिष्ट्य आहे. मौखिक परंपरा हे भारतीय लोककला आविष्काराचे वेगळेपण होय. हा वारसा एका पिढीने दुसऱ्या पिढीच्या हाती सुपूर्द केला आहे. त्यामुळे या लोकाविष्काराचे आकलन करताना त्यातील सूक्ष्म बारकावे लक्षात घेतले असता काही नवे प्रवाह गोचर होतात. पारंपरिक लोककलांचे जनसंवाद हे सामर्थ्य हे अतिशय लक्षणीय स्वरुपाचे आहे. परंतु, ते उपेक्षित आणि दुर्लक्षित राहिले आहे. पारंपरिक लोककलांचे आणि त्यांच्या आविष्काराचे दृढ नाते हे कलावंतांच्या जीवनाशी निगडीत आहे. देशाच्या, राष्ट्राच्या उन्नतीचेही ते एक प्रमुख साधन आहे.

काय आहे लोकसाहित्य..?

लोक हा बहुवचनी शब्द आहे. लोकांचे आपोआप घडत गेलेले जीवन, त्यांनी निर्माण केलेला परिसर, त्या अनुभवांची गाणी, गोष्टी, म्हणी, उखाणे, चाली-रिती, श्रद्धा-समजुती, देवदेवता, कला, क्रीडा म्हणजे लोकसाहित्य!

समूहमनाचा स्वीकार किंवा नकार, समूह मनाने केलेले बदल, बरे-वाईट प्रत्येक युगातच घडत असतात. 'लोक' ते स्वीकारीत-नाकारित असतात आणि भाषेतून व्यक्तही करीत असतात. म्हणून लोकसाहित्य सतत घडत-बिघडत असते, ते केवळ ग्रामीण किंवा भूतकालीन नसते. समाजाच्या विविध स्तरातले लोकमन सामूहिक अबोधपणे ते घडवित आणि मोडीत असते. ते प्रवाही आणि कालप्रवाही असते.

शिक्षितांकडूनच दुर्लक्ष!

मी येथे समग्र लोकसाहित्याबद्दल गंभीर चिकित्सा करीत बसणार नाही. आपल्या डोक्याला मुद्दामहून, अगदी जरासा ताण देण्याचाही माझा यत्किंचितही हेतू नाही. तर लोकमन कालप्रवाहात कोणते लोकसंचित कसे स्वीकारीत जाते, त्याला कशी वळणे मिळतात, गाभा परंपरेतला राहूनही बदल-परिवर्तन कसे होत जाते, यांच्या काही उदाहरणांसह मागोवा घेण्याचा हा एक छोटेखानी माझा प्रयत्न आहे.

इंग्रजोत्तर नागरी शिक्षित समूहातून तमाशासारख्या लोककलांकडे दुर्लक्ष झाले. त्याची जागा 'नाटक' या कलाप्रकाराने घेतली. मराठी नाटक हे इंग्रजोत्तर शिक्षित मंडळींनी इंग्रजी नाटकांच्या अनुकरणातूनच उचलले, कारण आज आपण ज्याला नाटक म्हणतो ते शाळा-महाविद्यालयांत शिकणाऱ्यांसाठी तेव्हा उपलब्धच नव्हते. तेथे प्रथम इंग्रजीतून शेक्सपिअरची आणि पुढे अन्य पाश्चिमात्य नाटककारांचीच नाटके शिकविली गेली. स्नेहसंमेलनात त्यांचेच प्रयोग होवू लागले, तेच आम्ही उत्साहाने पाहत आलो. सांस्कृतिक भूक भागवत गेलो.

लोककला आवाहक ताकद!

संस्कृत नाटकेही शिकविली गेली. मग इंग्रजी आणि संस्कृत नाटकांची भाषांतरे, रुपांतरे होवू लागली. मग त्या पद्धतीच्या अनुकरणातून मराठी नाटके लिहिली गेली. पण, नाटकाचा खरा प्राण त्याचा 'प्रयोग' असतो. प्रारंभीचा हा भाषांतरित नाटकांचा एक जोरकस प्रवाह आला आणि काही काळ बराच स्थिरावला. १९२५ मध्ये एका नाटककाराला एकदम आपल्या पारंपरिक लोककलांचा बाज एका नागर नाटकात आणावासा वाटला. माधवराव जोशी यांचे 'संगीत संस्थानिक स्वराज्य अथवा म्युनिसिपालिटी' हे ते नाटक होय! नुकत्याच स्थानिक स्वराज्य संस्था उदयास आल्या होत्या. त्या म्युनिसिपालिटीची निवडणूक हा नाटकाचा विषय. धमाल विडंबन आहे हे. आजही कोणी प्रयोग केला तर आजच्याच नगरपालिकांचे हुबेहूब चित्र त्यात आहे असे वाटते.



स्वातंत्र्योत्तर काळात पुन्हा एकदा देशीपणाची अस्मिता जागी झाली. लोकसाहित्य, लोककलांचा पुन्हा वापर केला गेला. मात्र, नाटकात पुन्हा लोककलांचा उपयोग झाला, तो जर्मन नाटककार बर्टोल्ड ब्रेख्त यांच्या अनुकरणाने. समाजामध्ये सामाजिक, राजकीय परिवर्तन करायचे असेल तर लोककलांमधील सामूहिक आवाहक आणि आश्वासक ताकदीचा प्रयोग आणि उपयोग करून घेणे प्रभावी ठरते. डाव्या विचाराच्या ब्रेख्तने श्रमकऱ्यांच्या, कष्टकऱ्यांच्या न्यायाचे प्रश्न मांडण्यासाठी केलेल्या प्रयोगापैकी 'कॉकेशियन ऑफ चॉक सर्कल' या 'अजब न्याय वर्तुळाचा' (अनु. चिं. त्र्यं. खानोलकर) या अनुवादित नाटकाने मराठी रंगभूमीला एक दिशा दाखविली. सर्वसामान्य लोकांना परिचित अशी एखादी लोककथा लोककलांच्या माध्यमातून मांडायची. ते लोकांना परिचित असते, आवडते. मग त्याच परिचित कथेतून नवा, कालसंवादी आशय, विषय मांडून परंपरेला कलाटणी देवून नव्या काळाशी संवाद साधायचा.

ब्रेख्तच्या या तंत्रातून १९७०-८० च्या दशकात काही भाषांतरित, रुपांतरित नाटके झाली. श्रमकऱ्यांचे, कष्टकऱ्यांचे भीषण महानगरी वास्तव मांडणारे रत्नाकर मतकरींचे 'लोककथा ७८' हे नाटक आले. पुण्याच्या सतीश आळेकर आणि जब्बार पटेल यांनी विजय तेंडूलकरांचे 'घाशीराम कोतवाल' हे नाटक मराठी रंगमंचावर आणून इतिहास घडविला. हे नाटक आशय आणि प्रयोग दोन्ही दृष्टींनी युगप्रवर्तक ठरले.

वर-वर पाहता कथा ऐतिहासिक, सादरीकरणासाठी दशावतार, भारूड, गोंधळ अशा लोककला प्रकारांचा वापर आणि आशय कालातीत. प्रत्येक वेळी नाटक नवेच वाटावे. याच प्रवाहात मग सतीश आळेकरांचेच 'महानिर्वाण' नाटक आले. एकूण मानवी जगण्या-मरणातील विसंगतीवरची ही उपहासिका 'ब्लॅक कॉमेडी' म्हणता येईल, अशी आविष्कारासाठी प्रामुख्याने वापरली. कीर्तन शैली म्हणजे एक लोककलाच !

नित्यनूतन आविष्कार !

त्या आधी स्वातंत्र्यपूर्व काळात लोकजागरणासाठी 'राष्ट्रीय कीर्तन' नावाचा एक प्रकार येवून गेला. तर बहुजन जागरणासाठी म. ज्योतिबा फुले यांच्या काळात 'सत्यशोधक जलसे' लोककलावंतांनी लिहिले, सादर केले आणि गाजविले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या अनुयायांनी देखील 'आंबेडकरी जलसे' ताकदीने सादर केले अन् गाजविले. समूहमनाला जेव्हा-जेव्हा मरगळ येते, तेव्हा-तेव्हा प्रयोगसिद्ध लोककलांनी नवनवे आविष्कार आणून समाजाला वळण दिले. कारण समूहाला आवाहन करण्याची प्रचंड ताकद लोककलांमध्ये असते. पारंपरिकता, सामूहिकता, सुबोधता, उत्स्फूर्तता आणि लवचिकता अशा अनेक वैशिष्ट्यांमुळे प्रत्येक काळात लोककला नित्य नूतन आविष्कार सादर करीत असतात, करीत आल्या आहेत. स्त्री चळवळींच्या काळातही 'मुलगी झाली हो...' या लोकशैलीतल्या पथनाट्याने जागतिक विक्रम केला आहे.

प्रभावी लोकाविष्कार शैली!

एकेकाळी दारूबंदी, स्त्रीभ्रूणहत्या विरोध यावर पोवाडे केले गेले. आजही ही परंपरा त्याच ताकदीने सुरू आहे. 'म्युनिसिपालिटीची' आठवण यावी असा पु. ल. देशपांडे यांचा 'पुढारी पाहिजे' हे वगनाट्य तुफान गाजले होते.

नाटकांमधून प्रामुख्याने प्रबोधनासाठी, सामाजिक, राजकीय परिवर्तनपर विचार जागृतीसाठी लोकाविष्कार शैलींचा प्रभावी उपयोग पुन:पुन्हा होतो आहे. खरे तर प्रबोधनासाठी समाजमन तयार करण्यासाठी वारकरी, संतांनी प्रथम लोककलांचा प्रभावी उपयोग केला. अंधश्रद्धेतून, नवस-सायास आदी कर्मकांडातून, भक्तीच्या नावावर केल्या जाणाऱ्या आत्मक्लेषी कर्मातून, भोंदू बाबांच्या अध्यात्माच्या नावावर केल्या जाणाऱ्या शोषणातून सर्वसामान्य, निरक्षर, दरिद्री स्त्री-पुरुषांची मने मोकळी व्हावी, त्यांना भक्तीची उन्नत वाट मिळावी, म्हणून संत एकनाथ महाराजांनी भारूडांतून, रूपकांतून केलेल्या रचना सर्वज्ञात आहेत. सर्वच वारकरी संतांचे या क्षेत्रातले योगदान खूप मोठे, नव्हे तर अनन्यसाधारण आहे. आता पुन्हा त्यांचे आविष्कार सादर व्हावेत अशी परिस्थिती आली आहे, असे वाटते.

लोकमनाचा उत्स्फूर्त उद्गार

आतापर्यंतच्या सर्व विवेचनावरून लक्षात आले असेल की, सगळे लोकाविष्कार कालसंवादी राहिले तर टिकतात. केवळ जुने टिकवायचे म्हटले तर ते शक्य नाही. त्याचा अभ्यास जरूर होवू शकतो, व्हायलाच हवा. त्यामुळे परंपरेतले टिकाऊ काय आणि टाकाऊ काय, हे समूहमनच ठरवते. एखादी व्यक्ती नाही ठरवू शकत, हे तेवढेच सत्य म्हणावे लागेल. कारण सर्व (लोक) संस्कृती, साहित्य, कला या लोकसमूह निर्मित, समूहरक्षित आणि समूहाच्या गतीबरोबर घडणाऱ्या आणि बिघडणाऱ्या आहेत.

इंग्रजोत्तर काळात नाटकांखेरीज अन्य कलाप्रकारांचा कसा उपयोग स्वातंत्र्यपूर्व काळातही झाला, हे राष्ट्रसेवादलाच्या कलापथकांतून राष्ट्रप्रेमी कार्यकर्त्यांनी दाखवून दिले आहे. एक फरक मात्र इंग्रजोत्तर नागर जीवनात झाला आहे. व्यक्तीनिर्मित साहित्य, कथा, कविता, कला यांच्यावर कर्त्याची नाममुद्रा आली. भांडवली मनोवृत्तीत कॉपीराईट, स्वामित्व हक्क म्हणून 'अर्थ' संबंध निर्माण झाले. ते लोकसाहित्य नव्हे, ज्यावर अभावितपणे लोकमनाच्या स्वीकृतीची मोहर उमटते, असे साहित्यही त्याचवेळी समांतरपणे निर्माण होत असते. आहे, त्याकडे फारसे लक्ष जात नाही. कर्त्याची नाममुद्रा प्रारंभी असली तरी तो लोकमनाचा सहज, उत्स्फूर्त उद्गार असल्यासारखा त्याचा वापर लोक नागरी जीवनातही करीतच असतात. उदा. संत वचने.. अनेकदा कर्त्याच्या नावाचेही विस्मरण होते. पण कृती शिल्लक राहते. रूढ लोकसाहित्य, लोककला, या बाहेरच्या काही उदाहरणातून माझे म्हणणे जास्त चांगले स्पष्ट होईल. अशा साहित्याला लौकिक साहित्य अशी संज्ञा वापरली जाते.

कालसापेक्ष अभिव्यक्ती!

संवेदनांची अभिव्यक्ती व्यक्तिनिरपेक्ष पद्धतीने सतत होत असते. ही लोकसाहित्याचीच निर्मिती होत असते. अगदी डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीच्या निमित्ताने जी गाणी वाजवली जातात, ती वस्तीतल्या बायका-मुले गुणगुणताना दिसतात. त्यांचा कर्ता कोणीतरी असणारच, पण त्यावर स्वामित्व लोकमनाचे असते.

आजच्या क्षणाला सुद्धा राजकीय, सामाजिक वास्तवावरच्या चारोळ्या, उखाण्यांसारखे यमक, अनुप्रास साधीत, शब्दचमत्कृती आणि अर्थचमत्कृतीयुक्त एसएमएस, ट्विटरच्या प्रतिक्रिया ही लोकमनाची उत्स्फूर्त, सहज आणि मुख्य म्हणजे मूळ निर्मात्याचा स्वामित्व हक्क नसलेली ही आधुनिक लोकसाहित्य निर्मितीच आहे. स्वरूप बदलले, आशय बदलला तरी तत्व कायम असते. समूहमनाला शब्दातून अभिव्यक्त झाल्याशिवाय राहवत नाही. कधी गंभीरपणे, कधी मिश्किलपणे असा हा प्रवाह आहे. अगदी खळाळत्या प्रवाही पाण्यासारखा. काळ बदलला, जुने संदर्भ सुटले तरी बिघडत नाही. लोककला कालसंवादीच असून, प्रवाही लोकसंस्कृतीच्या असंख्य अगणित पाऊलखुणा आहेत. नव्या संदर्भांना नव्या पद्धतीने लोकमन शब्दातून मोकळे करीत पारंपरिक, अस्सल मराठी लोककलांचा आणि लोकसंस्कृतीचा हा झरा अखंडपणे प्रवाहीच राहणार आहे, एवढे मात्र निश्चित!

सोलापूर तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com


## कत्तलखान्यात गोवंश जनावरांची कत्तल, कारवाई करण्याची मागणी

छत्रपती संभाजीनगर : या जिल्ह्यातील नारायणपूर गावात अवैद्य पद्धतीने गोवंश जनावरांची कत्तल केली जात आहे हे कत्तलखाणे पोलीस व पशुसंवर्धन विभागाच्या आशीर्वादाने सुरू असल्याचे निवेदन पोलीस आयुक्त यांना देण्यात आले आहे.

वाळूज एमआयडीसी पोलीस स्टेशन अंतर्गत वाळूज नारायणपूर (बु) कुरेशी मोहल्ला वाळूज, भारतनगर, आरबिया मदरशा, कमलापूर रोड, अल कुरेशी हॉटेल, आंबेलोहळ ,रांजणगाव, साजापूर आदी परिसरात गोवंश कत्तलखाने यामध्ये गाई आणि बैलांची अवैधरित्या कत्तल चालू असून वाळूज एमआयडीसी पोलीस याकडे लक्ष देत नसल्याचा आरोप करत सामाजिक कार्यकर्ते शेख मोहसीन शेख नन्हू यांनी पोलीस आयुक्तांना दिलेल्या निवेदनात नमूद केला आहे.

वेळोवेळी पोलीस आयुक्त कार्यालय छत्रपती संभाजी नगर यांना अर्ज देऊनही कोणती ठोस कारवाई होत नसल्यामुळे २४ फेब्रुवारी पासून जिल्हाधिकारी समोर आमरण उपोषण करण्यात येणार असल्याचे शेख मोहसीन यांनी निवेदनात नमूद केले आहे.

## दुर्गा प्रायमरी इंग्लिश स्कूल बिडकीन येथे छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती साजरी



बिडकीन दि २२ फेब्रुवारी : पैठण तालुक्यातील बिडकीन येथील दुर्गा इंग्लिश स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज बिडकीन मध्ये दि १९ फेब्रुवारी रोजी छत्रपती शिवाजी महाराज यांची ३९५ व्या जयंती उत्साहात व थाटामाटात साजरी करण्यात आली.यावेळी विद्यार्थ्यांनी बिडकीन येथील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याचे दर्शन घेऊन तिथे भाषण व सुंदर नृत्य सादर करुन जयंतीची शोभा वाढवली यावेळी सहाय्यक पोलीस निरीक्षक निलेश शेळके , सरपंच अशोक धर्मे,बिडकीन मधील सर्व प्रतिष्ठित व्यक्ती ,संस्थाचालक ओमप्रकाश जैस्वाल, सचिव रोशन जैस्वाल, शाळेचे प्राचार्य अभिजीत इंगळे आदी उपस्थित होते. तसेच शाळेचा शिक्षकवृंद दर्शना कोकणे, सुनिता चव्हाण, दिक्षा साबळे ,ओसीन शिंदे, जयश्री नजन , आरती इंगळे , शिवानी ठाकूर, सीमा वंजारे या सर्वांनी कार्यक्रम यशस्वी पार पाडण्यासाठी परीश्रम घेतले.

## प्रधानमंत्री आवास योजनेचे मंजुरीपत्र व पहिला हफ्ता वाटप

कन्नड :- दि.२२ फेब्रुवारी - तालुक्यातील १० हजार ६०४ नवीन घरकुल मंजुरी पत्र व ७ हजार ८९८ लाभार्थ्यांना ११ कोटी ८४ लाख ७० हजार रुपयांचा पहिला हप्ता वितरण कार्यक्रम आमदार संजना जाधव यांच्या हस्ते प्रातिनिक स्वरूपात वाटप करण्यात आले . यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून तहसीलदार विद्याचरण कडवकर , सपोनि कुणाल सुर्यवंशी ,भाजप जिल्हाध्यक्ष संजय खांबायते , भाजप प्रदेश कार्यकारिणी सदस्य डाँ संजय गव्हाणे ,तालुकाध्यक्ष किशोर पवार , महिला आघाडी सोनाली घाटबळे , उपसभापती जयेश बोरसे , ज्ञानेश्वर निकम , साईनाथ आल्हाड , डाँ सदाशिव पाटील , राम पवार , श्रीराम घुगे , यासिन शेख आदींची उपस्थिती होती . कार्यक्रमाचे सूत्रसंचालन योगेश पाटील यांनी केले तर प्रास्तविक गटविकास अधिकारी चंद्रहार ढोकने यांनी केले . सहाय्यक गटविकास अधिकारी विजय पंडित , विस्तार अधिकारी संतोष दारकुंडे , गटशिक्षणाधिकारी नीता श्रीश्रीमाळ , बालविकास प्रकल्प अधिकारी निलेश राठोड , सहाय्यक प्रशासन अधिकारी एच एस कोलमवार , कार्यालय प्रशासन अधिकारी आर एस चव्हाण , कल्पेश राठोड , आदींसह कर्मचारी उपस्थित होते .

## श्री स.भु. प्रशालेच्या तुषार अहिरे यांची 'संविधान जागर' सायकल फेरी



बिडकीन दि. २२ फेब्रुवारी पैठण तालुक्यातील श्री सरस्वती भुवन प्रशाला बिडकीन चे तंत्रस्नेही शिक्षक तुषार अहिरे यांनी श्री सरस्वती भुवन शिक्षणसंस्था छत्रपती संभाजीनगर आयोजित उपराष्ट्रपती जगदीप धनगड व राज्यपाल सी. राधाकृष्णन यांच्या उपस्थितीत होणाऱ्या संविधान जागर कार्यक्रमाचे औचित्य साधून बिडकीन ते छत्रपती संभाजीनगर अशी सायकल फेरी काढली. संविधानाबाबत जनतेत जागृती निर्माण व्हावी हा ही सायकलफेरी काढण्यामागे उद्देश आहे. यावेळी प्रशालेचे मुख्याध्यापक धर्मेंद्र येवले, पर्यवेक्षिका मनिषा मिश्रा, प्रभारी पर्यवेक्षक राजू शिंदे, ज्ञानेश्वर चाटूपळे, बाबासाहेब सोकटकर,प्रशालेतील शिक्षक प्रदीप ठोसर, सुदाम चिंचाणे, पद्माकर वाघरूळकर, लक्ष्मीकांत जोशी, संजय कुलकर्णी, अनिल साबळे, जयश्री महाजन, सुजाता तोष्णीवाल आदिंसह सर्वच शिक्षक व विद्यार्थ्यांनी शुभेच्छा दिल्या.

## सोनालिकाकडून महाराष्ट्रातील शेतकऱ्यांसाठी नवीन सोनालिका चीता ट्रॅक्टर केला लाँच

छत्रपती संभाजीनगर , २२ फेब्रुवारी २०२५ : भारतातील क्रमांक एकचा ट्रॅक्टर निर्यात ब्रँड असलेल्या सोनालिका ट्रॅक्टर ने 'चीता' श्रेणीतील ट्रॅक्टर सादर केले आहेत. यांचे डिझाईन नवीन लूकसह करण्यात आले असून त्यामध्ये शक्ती, शैली आणि प्रगत तंत्रज्ञानाचा परिपूर्ण मिलाफ आहे.

'चित्त्यासारखी चपळाई आणि वेगा'ची हमी देणाऱ्या या नवीनतम हेवी-ड्युटी ट्रॅक्टर मॉडेल्समध्ये सोनालिका चीता डीआय ३२, सोनालिका चीता डीआय ३० ४डब्ल्यूडी आणि सोनालिका चीता एमएम १८ ट्रॅक्टर यांचा समावेश आहे. शेतीतील विशेष गरज असलेल्या शेतकऱ्यांच्या गरजा ते पूर्ण करतात.



या नवीन उत्पादनाद्वारे फळबागा, ऊस, डाळिंब, द्राक्षे आणि सुपारीची शेती करणाऱ्या महाराष्ट्रातील शेतकऱ्यांचा खर्च कमी करतानाच त्यांची कार्यक्षमता व कामगिरी सुधारण्याचे उद्दिष्ट सोनालिकाने बाळगले आहे. नवीन सोनालिका चीता मालिका शेतीच्या विविध गरजांसाठी शक्तिशाली ट्रॅक्टर पुरवते आणि महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना त्यांची कामे अधिक सहजतेने आणि आरामात करण्यास सक्षम करते.

हेवी-ड्यूटी सोनालिका चीता डीआय ३२ मध्ये ३-सिलेंडरचे २,७८० सीसी इंजिन असून ते १३० एनएम टॉर्क देते. त्याची इंधन कार्यक्षमता या वर्गातील ट्रॅक्टरमध्ये सर्वोत्तम आहे, त्यामुळे आंतर-शेती आणि बागांसाठी ते आदर्श ठरते. हा ट्रॅक्टर सिंगल-पीस बोनेट तसेच ४डी कूलिंग सिस्टम, १,३२५ किलो लिफ्ट क्षमता, ऑइल इमर्स्ड ब्रेकसह उपलब्ध आहे. कार्यक्षम वापरासाठी त्याच्यात लहान आणि मोठ्या ट्रॅकचा पर्याय आहे. याने रोटाव्हेटर, कल्टिव्हेटर आणि आरएमबी प्लो सारखी उपकरणे देखील सहजतेने वापरली जाऊ शकतात.

## बिबट्याच्या पिल्लांची आई सोबत पुनर्भेट

### वनविभाग व मॅन विथ इंडिज संस्थेच्या रेस्क्यू टीम ला यश



खुलताबाद प्रतिनिधी खुलताबाद लुक्यातील पळसगाव शिवारात गेल्या काही दिवसापासून आईपासून बिछडलेल्या बिबट्याच्या पिल्लांना त्यांच्या आईसोबत पुनर्भेट घडून आणण्यात वनविभाग छत्रपती संभाजीनगर व मॅन विथ इंडिज संस्थेच्या रेस्क्यू टीम ला यश आले असून, पिलांना त्यांची आई सुरक्षितपणे आपल्या सोबत घेऊन गेली.

गेल्या दोन दिवसात झालेल्या ऊसतोडी दरम्यान ही पिल्ले आढळून आली होती. या विषयी गल्ले बोरगाव चे पोलीस पाटील बढे पाटील यांनी वनविभागाला माहिती दिली होती, त्या अनुषंगाने खुलताबाद वन विभागाचे अधिकारी कर्मचारी यांनी तात्काळ कारवाई करत अशी पिल्ले पुन्हा आई जवळ सोडणे अत्यंत महत्त्वाचे व आव्हानात्मक असल्याने, मादी चिडखोर होऊ नये म्हणून पिल्ले तिच्याजवळ सुरक्षित जाण्यासाठी आधुनिक कॅमेऱ्यांच्या मदतीने पुनर्भेट घडवण्यात वनविभागाला व मॅन विथ इंडिज संस्थेच्या रेस्क्यू टीम यश आले.

खुलताबाद तालुक्यात सर्वत्रच ऊस क्षेत्र मोठ्या प्रमाणात आहे, अशातच पळसगाव भागात मधील शेतात शेतकरी मच्छिंद्र बोडखे यांच्या शेतात बिबट्याची दोन पिल्ले उसतोडीत आढळून आले. छत्रपती संभाजीनगर वनविभाग व मॅन विथ इंडिज संस्थेच्या रेस्क्यू टीमने तातडीने घटनास्थळी जाऊन पाहणी केली व आधुनिक ट्रॅप कॅमेरे लाऊन आई व पिल्लाची यशस्वी पुनर्भेट घडवून आणली

या वेळी उपवनसंरक्षक सुवर्णा माने, वनपरिक्षेत्र अधिकारी श्री पेहेरकर, यांच्या मार्गदर्शनाने, वनपाल एस आर मोरे, वनरक्षक मोईनुद्दीन शेख , एस. बर्डे तसेच छत्रपती संभाजीनगरच्या मॅन विथ इंडिज संस्थेच्या रेस्क्यू टीमचे प्रमुख आशिष जोशी , शुभम साळवे, सुरज पानकडे, सार्थक अग्रवाल या रेस्क्यू टीमने शिताफीने हे आव्हान स्वीकारून पुनर्भेट यशस्वी घडवली.

## राष्ट्रीय महिला आयोगाचा उपक्रम; येत्या ८ मार्चपासून जिल्हा मुख्यालयात विवाहपूर्व समुपदेशन केंद्र कार्यान्वित होणार

छत्रपती संभाजीनगर, दि.२१ - राष्ट्रीय महिला आयोगामार्फत महिलांचे सक्षमीकरण व सस्नेही कुटुंब या साठी जिल्ह्यात येत्या ८ मार्च पासून विवाहपूर्व समुपदेशन केंद्र कार्यान्वित करण्यात येणार असून त्यासाठी योग्य स्थळाची निवड करा,असे निर्देश जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी आज जिल्हा महिला व बालविकास अधिकारी रेश्मा चिमंद्रे यांना दिले. या उपक्रमासाठी राज्य शासनाने पुढाकार घ्यावा,असे निर्देश राष्ट्रीय महिला आयोगाने दिले आहेत. राष्ट्रीय महिला आयोगाने या संदर्भात जिल्हाधिकाऱ्यांना पत्राद्वारे कळविले आहे की, विवाहाशी निगडीत समस्या, त्यातून निर्माण होणाऱ्या मानसिक समस्या, महिलांशी संबंधित हिंसाचार, घटस्फोट रोखण्यासाठी विवाहपूर्व समुपदेशन केंद्र उपयुक्त व महत्त्वाचे ठरु शकतात. त्यासाठी जिल्हा मुख्यालयात विवाहपूर्व समुपदेशन केंद्र स्थापन करावे,असे निर्देश या पत्रात देण्यात आले आहेत.

प्रत्येक जिल्ह्यात विवाहपूर्व समुपदेशन केंद्र सुरु करण्यात येणार आहे. ही केंद्र येत्या ८ मार्च पासून कार्यान्वित करावी,अशा सुचना राष्ट्रीय महिला आयोगाने दिल्या आहेत. त्यासंदर्भात आज जिल्हाधिकारी कार्यालयात बैठक घेण्यात आली. जिल्हा महिला व बालविकास अधिकारी रेश्मा चिमंद्रे, अपर जिल्हाधिकारी डॉ. अरविंद लोखंडे, मुद्रांक जिल्हाधिकारी विवेक गांगुर्डे यावेळी उपस्थित होते. विवाहाच्या अल्प कालावधीतच वाढत जाणारे कौटुंबिक वाद, त्यामुळे होणारे घटस्फोट टाळण्यासाठी विवाहानंतर उद्भवणाऱ्या विविध शारीरिक मानसिक, कौटुंबिक समस्यांबाबत माहिती व्हावी. त्याची पूर्वकल्पना विवाहयोग्य दाम्पत्यास व्हावी.

## ठिबक सिंचन वर तीन महिन्यांत चाळीस क्विंटल गव्हाचे उत्पन्न; प्रयोगशील शेतकऱ्याचा उपक्रम

तभा.वृत्तसेवा
सोयगाव,दि.२२ फेब्रुवारी



सोयगाव शिवारात तीन महिन्यांत कमी पाण्यावर ठिबक सिंचन वरील ७० आर क्षेत्रावर लागवड केलेल्या गहुचे तब्बल तीस क्विंटल उत्पन्न घेत सोयगाव शिवारात तरुण शेतकऱ्याने नाविन्यपूर्ण उपक्रम यशस्वी केला आहे.

सोयगाव शिवारात शेतकरी अरुण सोहनी यांनी खरिपात मक्याचे उत्पन्न घेतले त्यानंतर



झालेला पाऊस यामुळे अडचणीत आलेल्या या शेतकऱ्याने तालुका कृषी विभागाकडून मार्गदर्शन घेऊन हा ठिबक सिंचन वरील गहू लागवड प्रयोग यशस्वी केला आहे..

७० आर क्षेत्रात तीनच महिन्यात मिळाले भरघोस आला आहे लागवड पासून ते काढणी पर्यंत त्यांना २५ हजार रु खर्चात तब्बल एक लाख वीस हजार रु चे उत्पन्न झाले आहे सध्या तीन हजार रु क्विंटल गव्हाचे दर सुरू आहे दरम्यान शरबत्ती गव्हाची ठिबक सिंचन वर लागवड हा प्रयोग पहिल्यांदा सोयगाव शिवारात यशस्वी झाला आहे प्रयोग शील शेतकरी अरुण सोहनी यांनी कमी पाण्यावर उन्हाळा सुरू होण्यापूर्वी च उत्पन्न हाती घेतले आहे त्यासाठी त्यांनी लागवडी पासून नियोजन करून हे उत्पन्न घेतले आहे.

> आसमानी संकट,वन्याप्रण्याचे संकट,वाढत्या खताच्या व वाढती मजूरीचे संकट,या सर्व बाबीला संघर्ष करीत शेवटी एका दाण्याचे हजार दाने करून आज गणपती बापा च्या कृपेने संकष्ट चतुर्थी ला गहू हातात आला आहे.
>
> - अरुण सोहनी
> प्रयोगशील शेतकरी,सोयगाव

## आई महोत्सवाचे यंदा रौप्यमहोत्सवी वर्षात पदार्पण

### रौप्यमहोत्सवी वर्षा निमित्त सोयगाव येथे विविध कार्यक्रम आयोजन

तभा.वृत्तसेवा
सोयगाव,दि.२२ फेब्रुवारी



सोयागाव येथील आई महोत्सवा ला यावेळी २५ वर्ष पूर्ण होत असून सन.२००० साला पासून सुरु झालेला हा महोत्सव रौप्य महोत्सव करीत आहे.प्रत्येक वैक्तीने निर्व्यसनी राहून आपापल्या आई,वडिलांची सेवा करावी जेष्ठ वैक्तीना सन्मानतेची,माणुसकीची वागणूक द्यावी,मुला - मुलीमध्ये भेद न करता मुलींच्या जन्माचे स्वागत करावे, स्त्रीभ्रून हत्या करू नये,पर्यावरणाचे रक्षन करावे, प्लास्टिकवर बहिष्कार,वनसंवर्धन चा स्वीकार,सामाजिक एकात्मतेत वाढ होऊन आपला प्राणप्रिय भारत देश निरोगी सदृढ देश व्हावा या उदात्त हेतूने प्रेरित होऊन समाज प्रबोधनकार तथा लोककलावंत विष्णू मापारी यांनी सन २००० साला पासून आई महोत्सवची सुरुवात केली.या आई महोत्सवाचे हे २५ म्हणजेच रौप्य महोत्सवी वर्ष आहे. त्यानिमित्ताने दि.२२ ते २५ फेब्रुवारी २०२५ विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. दि.२२ शनिवार जंगलातांडा येथे जि.प.प्रा.शाळा येथे नगरपंचायत नगराध्यक्षा आशाबी तडवी यांचे हस्ते उद्घाटन झाले.तर प्रमुख अतिथी माजी जिल्हा परिषद सदस्य पुष्पाताई काळे,समाजसेवक सुमित पंडित,डॉ.मोहितकुमार जोहरे, शिवसेना नगरसेवक गजानन कुडके,दिपक पगारे,सरपंच देवकाबाई चव्हाण,उपसरपंच फकिरा कल्याणकर, मुख्याध्यापक रामदास फुसे,शालेय शिक्षण समिती अध्यक्ष दयाराम राठोड उपस्थित होते. यावेळी परिसर स्वछता,शालेय विद्यार्थ्यांना साहित्य,खाऊ वाटप कार्यक्रम दि.२३ रविवार रोजी सर्व रोग निदान उपचार शिबिराचे डॉ. जगमोहन छाबडा जनरल सर्जन, आरोग्यम हॉस्पिटल जळगाव यांचे मार्गदर्शन खाली तसेच जळगाव व सोयगाव येथील डॉ. असोसिएशन व केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशन यांच्या सहकार्यने ग्रामीण रुग्णालय कोविड सेंटर सोयगाव येथे आयोजन केले असून डॉ.नितीन धांडे,अस्थीरोग तज्ञ,डॉ.चैतन्य कासार दंतरोग तज्ञ,डॉ.पूजा कासार,डॉ.रमेश पाटील हृदयरोग तज्ञ,डॉ.ज्योती थोरात,होमिओपयथीक तज्ञ,डॉ. रघुनाथ फुसे अध्यक्ष,डॉ. असोसिएशन डॉ.मोहित कुमार जोहरे वैद्यकीय अधिकारी प्रा.आ.केंद्र शेंदुर्णी,डॉ.दीपाली जोहरे,डॉ.अक्षय सोनवणे, अँड.राजेश गिरी,संजय शहापुरकर तालुका अध्यक्ष मेडिकल असोसिएशन,डॉ.इग्रजिंत साळूंके फर्दापूर उपस्थित राहत असून गरजू रुग्णाची इ.सी.जी.व शुगर तपासणी मोफत करण्यात येईल या कार्यक्रमास सोयगाव शहरातील विविध पक्षाचे पदाधिकारी तालुका अध्यक्ष,शहर अध्यक्ष यांना निमंत्रीत करण्यात आले आहे. दि.२४ सोमवार रोजी नॅशनल मराठी स्कूल सोयगाव येथे तंबाखू मुक्त शाळा,प्लास्टिक वर बहिष्कार वनसवर्धन स्वीकार,हसत खेळत तणाव मुक्ती या विषयावर चर्चा सत्र कार्यक्रमाचे अध्यक्ष,मुख्याध्यापक अमजद पठान उपस्थित राहत आहे.

दि.२५ मंगळवार शाळेत विद्यार्थ्याना शालेय साहित्य, पौष्टिक आहार वाटप,मुला,मुली मध्ये भेद नको मुलगी झाली खेड नको पटनाट्य.संध्याकाळी सोयगाव येथे दीप पूजा व पसायदानाने कार्यक्रमाचा समारोप तरी सर्वांनी कार्यक्रमाचा लाभ घ्यावा अशी विनंती समाज प्रबोधनकार विष्णु मापारी व त्याचे सहकारी सीता मापारी,आरोग्य दूत दिगंबर वाघ,चंद्रकांत मापारी,किशोर मापारी,कृषी भुषण अरुण सोहनी,संजय बोरसे, समाजसेवक दत्तू रोकडे, भगवान वाघ व जय भोले मित्र मंडळ नारळी बाग यांनी केली आहे.

## श्री स.भु.प्रशालेत 'शिवजयंती' विविध कार्यक्रमांनी उत्साहात साजरी

तभा वृत्तसेवा



बिडकीन दि २२ फेब्रुवारी पैठण तालुक्यातील श्री सरस्वती भुवन प्रशाला बिडकीन येथे छत्रपती शिवाजी महाराज जयंती विद्यार्थ्यांची भाषणे, प्रतापगडाचा रणसंग्राम (अफजलखान वध प्रसंग) साभिनय गीतनाट्य, वीररसप्रधान पोवाडेगायन, शिवकालीन खेळांची प्रात्यक्षिके अशा विविध कार्यक्रमांनी अत्यंत उत्साहात साजरी करण्यात आली,कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रशालेचे मुख्याध्यापक धर्मेंद्र येवले, प्रमुख पाहुणे उपमुख्याध्यापक युवराज पाडळे, पर्यवेक्षिका मनिषा मिश्रा, मुख्य वक्ते प्रभारी पर्यवेक्षक राजू शिंदे, कार्यक्रम आयोजक लक्ष्मीकांत जोशी, सुजाता तोष्णीवाल व सर्वच शिक्षकांनी दीपप्रज्वलन व छत्रपती श्री शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे माल्यार्पण करून पूजन केले.सर्वप्रथम श्रावणी म्हैसमाळेने ,शिवगर्जना, सादर केली. अक्षरा औटी, समृद्धी गरड, सिद्धीका मालुसरे यांनी शिवचरित्राधारित भाषण केले. वीररसप्रधान -पोवाडा गायन- तनया बोरूडे, सुवर्णा जाधव, आराध्या काळे, आनंदी धाडगे, ज्ञानेश्वरी धारगे, नक्षत्रा विसपुते, सिद्धीका मालुसरे यांनी केले. ,प्रतापगडाचा रणसंग्राम (अफजलखान वधप्रसंग) गीतनाट्यात, जिजामाता-मानसी सोनुने, छत्रपती शिवाजी महाराज-उदय शिंदे, अफजलखान-रेहान पठाण, आदिलशाह-मुजाहिद पठाण यांनी भूमिका वठविल्या. शिवकालीन खेळांच्या प्रात्यक्षिकात -दांडपट्टा- अथर्व चाटुपळे, प्रद्युम्न केणे, श्रेयांत कदम, वरद वंजारे, -काठी- सार्थक दारकोंडे, वेदांत टेके यांनी सादर केले.मुख्य वक्ते राजू शिंदे, प्रमुख पाहुणे उपमुख्याध्यापक युवराज पाडळे व पर्यवेक्षिका मनिषा मिश्रा आणि अध्यक्षीय समारोप मुख्याध्यापक धर्मेंद्र येवले यांनी केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मसीरा कुरेशी, काव्यांजली जाधव, दिशा गवते तर आभारप्रदर्शन राधिका गरड, माधवी चव्हाण यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रशालेतील सर्वच विद्यार्थी व शिक्षकशिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी उपस्थित राहून सहकार्य केले.

## संघ हीच जीवनगाथा



अलकः- (४८) **दृष्टिकोन**

**एकदा परमपूजनीय डॉ. हेडगेवार सातारा जिल्ह्यातील औंध येथे देवीच्या मंदिरात तिथल्या महाराजांबरोबर गेले होते. दस्तुरखुद महाराजांच्या प्रतिभावान कुंचल्याने रेखाटलेल्या रंगीत भव्य चित्रांनी ते मंदिर सुशोभित केले होते. डॉक्टरांनी अवलोकन करीत असताना आपला आनंद वआवड पण व्यक्त केली होती. पण अचानक एका चित्रासमोर ते थबकले. त्या चित्रात राजमाता जिजाऊ हिचे डोहाळे चित्रित केले होते. व प्रत्यक्ष शिवशंकर तिच्या उदरी अवतार घेणार आहेत असे रेखाटले होते. तेव्हा डॉक्टर म्हणाले महाराज या अवताराच्या कल्पनेने आमच्या समाजाचा घात केला आहे. आपल्या असामान्य प्रयत्नाने व अतुलनीय पराक्रमाने समाजाला नवचैतन्य देणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराजांवर असा देवत्वाचा शिक्का का मारता. हे त्यांचे म्हणणे महाराजांनाही पटले व त्यांना आपली चूक लक्षात आली. आणि महाराजांनी स्वतः रेखाटलेले डोहाळे चित्र पुसून टाकले.**

क्रमशः

**लेखन : सौ. सुरेखा विजय काणे,**
छत्रपती संभाजीनगर. मो. ९९६००५३५२१
माजी जिल्हा बौद्धिक प्रमुख राष्ट्र सेविका समिती

## डिजिटली जाणकार मिलेनियल्ससाठी अनेक नवीन वैशिष्ट्ये

छत्रपती संभाजीनगर : राष्ट्रीय पेन्शन योजना आणि अटल पेन्शन योजना खाती हाताळणारी सर्वात मोठी सेंट्रल रेकॉर्डकीपिंग एजन्सी प्रोटीन ई-गव्हर्नन्स टेक्नॉलॉजीज लिमिटेड, (पूर्वी: एनएसडीएल ई-गव्हर्नन्स इन्फ्रास्ट्रक्चर) ने त्यांचे पेन्शन व्यवस्थापन ॲप - 'एनपीएस बाय प्रोटीन' मध्ये सुधारणा केली आहे आणि विशेषतः आजच्या डिजिटली जाणकार मिलेनियल्ससाठी अनेक नवीन वैशिष्ट्ये जोडली आहेत. तुम्ही आधीच एनपीएस शी संबंधित असाल किंवा एनपीएससोबत तुमचा निवृत्ती नियोजन प्रवास सुरू करत असाल, हे नवीन ॲप तुम्हाला एकाच ठिकाणी सर्व उपाय देईल. अँड्रॉइड आणि आयओएस दोन्ही ग्राहकांसाठी उपलब्ध असलेले हे नवीन ॲप अत्यंत वापरकर्ता-अनुकूल इंटरफेस, अंतर्ज्ञानी नेव्हिगेशन आणि सुधारित सुरक्षा वैशिष्ट्यांसह प्रदान करते. आजच्या तरुण पिढीसाठी विशेषतः डिझाइन केलेले, हे ॲप त्यांच्यासाठी नवीन एनपीएस खाते तयार करणे, योगदान देणे आणि ते व्यवस्थापित करणे ही प्रक्रिया खूप सोपी करेल.

## व्हिक्स व्हेपोरब वापरण्याची योग्य पध्दत

नाशिक : एक पालक म्हणून मुलांच्या आरोग्याचे व्यवस्थापन करणे ही एक कठीण गोष्ट आहे. बदलत्या हवामाना मुळे आणि हवेचा घसरता दर्जा यांमुळे मुलांच्या आरोग्यावर परिणाम होतो, जसे लर्जी, इन्फेक्शन्स आणि अन्य आजार होत असतात. जर यावर अंकुश ठेवला नाही तर काही काळानंतर ही लक्षणे बळावतात आणि झोपेच्या चक्राचा समतोल गेल्याने बरे होण्याच्या प्रक्रियेला बाधा निर्माण होते. मूल ज्यावेळी आजारी पडते त्यावेळी पालक नक्कीच चिंतेत पडतात, विशेष करुन अशा वेळी ज्यावेळी मुलांची झोप ही सर्दी आणि खोकल्यामुळे पूर्ण होत नाही, त्यामुळे रोजचे काम न झाल्याने शारीरीक आरोग्यावर त्याचा परिणाम होतो. २०१० मध्ये पेनिसिल्वेनिया तील पेन्न स्टेट कॉलेज ऑफ मेडिसिन च्या डॉ. इयान पॉल यांच्या मते ज्यावेळी मुलांना सर्दी आणि खोकल्याचा त्रास होतो त्यावेळी ९० टक्क्यांहून अधिक मुलांना झोप लागण्यास त्रास होतो.

## आयकर विधेयकात सीएमए चा समावेश करण्याची मागणी

मुंबई: इन्स्टिट्यूट ऑफ कॉस्ट अकाउंटंट्स ऑफ इंडिया च्या वेस्टर्न इंडिया रीजनल कौन्सिल ने मुंबईत रीजनल कॉस्ट कन्व्हेन्शन २०२५ चे आयोजन केले. विकसित भारतासाठी बदल उत्प्रेरक म्हणून सीएमए २०४७ या विषयावर आयोजित केलेल्या या परिषदेत २०४७ पर्यंत विकसित राष्ट्र बनण्याच्या दिशेने भारताच्या प्रवासात कॉस्ट अँड मॅनेजमेंट अकाउंटंट्स ची महत्त्वाची भूमिका अधोरेखित करण्यात आली. या दोन दिवसांच्या परिषदेला मोठ्या संख्येने आघाडीचे व्यावसायिक, धोरणकर्ते आणि उद्योग तज्ञ उपस्थित होते. खर्च लेखापाल कार्यक्षमता कशी वाढवू शकतात, संसाधन वाटप कसे अनुकूलित करू शकतात आणि राष्ट्रीय धोरणे कशी आकार देऊ शकतात? यासह विविध मुद्द्यांवर चर्चा केली. या सत्रांमध्ये देशासमोरील आव्हाने आणि कृषी, उत्पादन, डिजिटल परिवर्तन, शाश्वतता यासारख्या क्षेत्रातील उदयोन्मुख संधींवर चर्चा करण्यात आली. या चर्चेत, धोरणात्मक खर्च व्यवस्थापन नवोपक्रमाला कसे प्रोत्साहन देऊ शकते, स्पर्धात्मकता कशी वाढवू शकते आणि शाश्वत आर्थिक वाढ कशी सुनिश्चित करू शकते? इतर महत्त्वाचे मुद्दे देखील सविस्तरपणे अधोरेखित करण्यात आले. आयसीएमएआय-डब्ल्यूआयआरसीचे अध्यक्ष सीएमए अरिंदम गोस्वामी म्हणाले, विकसित भारत २०४७ च्या दृष्टिकोनात मजबूत अर्थव्यवस्था, जागतिक स्पर्धात्मकता, तांत्रिक नवोपक्रम, शाश्वतता आणि समावेशक वाढ यांचा समावेश आहे. हे स्वप्न साकार करण्यासाठी काळजीपूर्वक नियोजन, धोरणात्मक खर्च व्यवस्थापन आणि संसाधनांचा कार्यक्षम वापर आवश्यक आहे. सार्वजनिक आणि खाजगी दोन्ही क्षेत्रात सर्वोत्तम निर्णय सुनिश्चित करून, दृष्टीकोन आणि अंमलबजावणीमधील अंतर भरून काढण्यासाठी सीएमए अद्वितीयपणे स्थानावर आहेत. या मोहिमेत आपला व्यवसाय कसा अर्थपूर्ण योगदान देऊ शकतो यावर चर्चा करण्यासाठी ही परिषद एक महत्त्वाचे व्यासपीठ आहे.

## संधिवात आणि ऑटोइम्युन आजारांसाठी विशेष अशा आर्थरायटिस क्लिनिकची सुरुवात

पुणे- मणिपाल हॉस्पिटल खराडी तर्फे त्यांच्या विशेष अशा आर्थरायटिस क्लिनिकच्या सुरुवातीची घोषणा केली असून यामुळे संधिवात आणि ऑटोइम्युन आजारांवर मात करण्यासाठी अत्याधुनिक उपचार उपलब्ध करुन देण्याच्या त्यांच्या वचनबध्दतेला अधोरेखित करण्यात आले आहे. संधिवाताशी संबंधित दुखण्यांनी त्रस्त असलेल्या रुग्णांना आता निदान, व्यवस्थापन आणि उपचार आता या विशेष केंद्रातून उपलब्ध होणर आहेत. या नवीन सुरु करण्यात आलेल्या क्लिनिक मध्ये अत्याधुनिक निदान आणि उपचार सेवा उपलब्ध असून यामुळे रुग्णांना आता त्याच्या आजाराचे व्यवस्थापन करुन त्यांच्या जीवनाची गुणवत्ता वाढवणे तर शक्य होईलच पण त्याच बरोबर सातत्याने वाढणार्या ऑटोइम्युन आजारांवरही उपचार घेता येणार आहेत. या नवीन विशेष केंद्रा मुळे मणिपाल हॉस्पिटल खराडी हे शहरातील काही निवडक केंद्रांपैकी एक बनले आहे ज्यामध्ये आर्थरायटिस केअरसाठी विशेष सुविधांसह पुण्यातील व आसपासच्या भागातील लोकांना उपचार प्राप्त होऊ शकतील.

## 'दशकातील सर्वोत्कृष्ट व्यवसाय अग्रणी' पुरस्कार प्रदान

नवी दिल्ली - जेएसडब्ल्यू ग्रुपचे अध्यक्ष सज्जन जिंदाल यांना १५ व्या एआयएमए मॅनेजिंग इंडिया अवॉर्ड्समध्ये प्रतिष्ठेच्या 'दशकातील सर्वोत्कृष्ट व्यवसाय अग्रणी' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. हा पुरस्कार म्हणजे जेएसडब्ल्यू समूहाला जागतिक स्तरावरील मोठ्या उद्योग समूहामध्ये विस्तारण्याच्या त्यांच्या परिवर्तनात्मक नेतृत्वाला मिळालेली मान्यता आहे. आज झालेल्या समारंभात श्री. जिंदाल यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. या वेळी मुख्य अतिथी म्हणून केंद्रीय शिक्षण मंत्री श्री. धर्मेंद्र प्रधान आणि सन्माननीय अतिथी म्हणून वाणिज्य आणि उद्योग; इलेक्ट्रॉनिक्स आणि आयटी विभागाचे राज्यमंत्री श्री. जितिन प्रसाद उपस्थित होते. पुरस्काराच्या सन्मानपत्राचे वाचन केपीएमजी इंडियाचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. यझदी नागपोरेवाला यांनी केले.

## अग्रलेख...

# दिल्लीची भाग्य 'रेखा'


राजधानी दिल्लीतील ऐतिहासिक अशा रामलीला मैदानावर दिल्लीच्या नव्या मुख्यमंत्री म्हणून भाजपाच्या रेखा गुप्ता यांनी शपथ घेत इतिहास घडवला. दिल्लीच्या मुख्यमंत्रिपदी कोणाची निवड होते, याकडे दिल्लीतीलच नाही तर संपूर्ण देशातील जनतेचे लक्ष लागले होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शाह यांनी आपल्या नेहमीच्या धक्कातंत्राच्या राजकारणशैलीचा परिचय घडवत दिल्लीच्या मुख्यमंत्री म्हणून रेखा गुप्ता यांची निवड केली. रेखा गुप्ता यांची निवड तशी धक्कादायक म्हणता येणार नाही, कारण पहिल्याच दिवसांपासून दिल्लीच्या मुख्यमंत्रिपदासाठी ज्या पाच-सहा नावांची चर्चा होती, त्यात रेखा गुप्ता यांचे नाव आघाडीवर होते. त्यामुळे त्यांची मुख्यमंत्रिपदी निवड करत भाजपाच्या नेतृत्वाने पुन्हा एकदा पक्षातील निष्ठावान आणि तळागाळाच्या कार्यकर्त्यांवर विश्वास दाखवला, असे म्हणायला हरकत नाही. रेखा गुप्ता यांचा रामलीला मैदानावरील शपथविधी समारंभही न भूतो न भविष्यति असा झाला. पंतप्रधान मोदी, संरक्षण मंत्री राजनाथसिंह, गृहमंत्री अमित शाह आणि भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा यांच्यासह भाजपा तसेच रालोआशासित राज्यांचे मुख्यमंत्री यावेळी उपस्थित होते. यावरून दिल्लीतील विजय हा भाजपासाठी किती महत्त्वपूर्ण आहे, याचा आपण अंदाज करू शकतो. रा. स्व. संघाशी संबंधित असलेल्या घराण्यात पुढे आलेल्या रेखा गुप्ता या आपल्या महाविद्यालयीन जीवनात विद्यार्थी परिषदेच्या संपर्कात आल्या. विद्यार्थी परिषदेच्या परीसस्पर्शाने त्यांच्या आयुष्याचे खऱ्या अर्थाने सोने झाले. दिल्ली विद्यापीठ विद्यार्थी संघाचे सचिव आणि अध्यक्षपद त्यांनी सांभाळले आहे. नंतर अपेक्षेप्रमाणे राजकारणात आलेल्या गुप्ता यांची आक्रमक नेत्या म्हणून ओळख आहे. सलग तीनदा त्या दिल्ली महानगरपालिकेत नगरसेवक म्हणून निवडून आल्या. नगरसेवक म्हणूनही त्यांनी आपल्या कामाची छाप पाडली. गुप्ता यांचे वैशिष्ट्य म्हणजे त्या भाजपासारख्या शिस्तबद्ध पक्षाच्या निष्ठावान कार्यकर्त्या होत्या, त्यामुळे पक्षाने जे दिले ते त्यांनी प्रत्येकवेळी गोड मानून घेतले. मला हे का दिले नाही, मला हे मिळालेच पाहिजे, म्हणून कधी हट्ट धरला नाही. नगरसेवक असताना एकदा महापौरपदासाठी त्यांचे नाव चर्चेत आले, अर्ज भरण्याचीही त्यांनी तयारी केली, पण ऐनवेळी दुसऱ्याच उमेदवाराचे नाव पुढे आले. पण याची कोणतीही नाराजी त्यांनी कधी दर्शवली नाही. माणसाने कर्म करत राहावे फळाची अपेक्षा ठेवू नये, ही गीतेतील शिकवण त्यांनी आपल्या आचरणाने दाखवून दिली. भाजपाच्या कार्यकर्त्यांसाठी सर्वात पहिले देश, मग पक्ष आणि तिसऱ्या स्थानावर तो स्वतः असतो. हे गुप्ता यांनी आपल्या कृतीने दाखवून दिले. विधानसभेच्या सलग दोन निवडणुकांत त्यांचा पराभव झाला, त्यांच्या जागी दुसरा कोणताही नेता असता तर तो यामुळे निराश झाला असता, समाजकारणातून राजकारणातून निवृत्त होण्याचा विचार त्याने केला असता. पण यापैकी गुप्ता यांनी काहीही केले नाही, आपल्या वॉर्डातील नागरिकांची कामे त्या करत होत्या. फळाची अपेक्षा न ठेवता काम करण्याच्या सवयीमुळे मुख्यमंत्रिपदाचे मोठे फळ त्यांना मिळाले, असे म्हटले तर ते चूक ठरू नये.

रेखा गुप्ता या पहिल्यांदाच आमदार म्हणून निवडून आल्या आणि भाजपा नेतृत्वाने त्यांच्या गळ्यात मुख्यमंत्रिपदाची माळ टाकत महिला सक्षमीकरणाच्या आपल्या धोरणाचा परिचय करून दिला. देशात भाजपाचे दीड डझन मुख्यमंत्री असताना एकाही महिलेला भाजपाने मुख्यमंत्री म्हणून संधी दिली नाही, म्हणून आरोप करणाऱ्यांचे तोंड भाजपाने दिल्लीच्या मुख्यमंत्री म्हणून रेखा गुप्ता यांची निवड करत बंद केले. महिला आरक्षण विधेयक संसदेत पारित करवून घेणाऱ्या भाजपाची ही कृती आधी केले मग सांगितले अशी आहे. गुप्ता या दिल्लीच्या चौथ्या महिला मुख्यमंत्री आहेत, तर हरयाणाची पृष्ठभूमी असलेल्या दिल्लीच्या तिसऱ्या मुख्यमंत्री. आतापर्यंत हरयाणा पृष्ठभूमीच्या सुषमा स्वराज आणि अरविंद केजरीवाल यांनी दिल्लीचे मुख्यमंत्रिपद भूषवले आहे. विशेष म्हणजे दिल्लीत भाजपा, काँग्रेस आणि आप या तीनही राष्ट्रीय पक्षांनी आतापर्यंत प्रत्येकी एकवेळा दिल्लीला महिला मुख्यमंत्री दिला आहे. भाजपाच्या सुषमा स्वराज या दिल्लीच्या पहिल्या महिला मुख्यमंत्री म्हटल्या पाहिजे. काँग्रेसच्या शीला दीक्षित या दुसऱ्या तर आपच्या आतिशी मार्लिना या दिल्लीच्या तिसऱ्या महिला मुख्यमंत्री होत्या. पण यातील शीला दीक्षित वगळता सुषमा स्वराज आणि आतिशी या दोन महिला मुख्यमंत्री फार कमी काळासाठी मुख्यमंत्री होत्या. सुषमा स्वराज या फक्त ५२ दिवस तर आतिशी १५२ दिवस मुख्यमंत्रिपदी विराजमान होत्या. फक्त शीला दीक्षित यांनाच प्रदीर्घ म्हणजे १५ वर्षे मुख्यमंत्रिपद भूषवता आले. महिला मुख्यमंत्र्याचा विचार केला तर दिल्लीत शीला दीक्षित यांनाच आपला ठसा उमटवता आला. दिल्लीच्या जनतेची मने जिंकता आली. दिल्लीचा जो काही विकास झाला, तो त्यांच्याच कार्यकाळात झाला. आपचे नेते अरविंद केजरीवाल यांच्या मुख्यमंत्रिपदाच्या जवळपास दहा वर्षांच्या कार्यकाळात दिल्लीचे वाटोळे झाले. केजरीवाल यांच्या कार्यकाळात विकास होईल म्हणून दिल्लीची जनता वाट पाहात असताना त्यांनी दिल्लीची फार वाट लावली. त्यामुळे कुठून केजरीवाल नावाचा भस्मासुर आपण दिल्लीत आणला, असे दिल्लीच्या जनतेला वाटू लागले. आधीच्या दोन विधानसभा निवडणुकांत झालेली चूक दिल्लीच्या जनतेने यावेळी दूर करत भाजपाला सत्तेवर आणले. दिल्ली हे पूर्ण राज्य नाही तसेच पूर्ण केंद्रशासित प्रदेशही नाही. देशाची राजधानी असल्यामुळे राज्याचा दर्जा मिळाल्यानंतरही दिल्लीला अतिशय मर्यादित असे अधिकार आहेत. त्यामुळे दिल्लीत मायबाप सरकार हे मुख्यमंत्र्यांचे नाही तर नायब राज्यपालांचे असते. देशाच्या अन्य राज्यांत मुख्यमंत्र्यांनी सांगायचे आणि राज्यपालांनी ऐकायचे असे असते. पण दिल्लीत नेमके याच्या उलट आहे, दिल्लीत नायब राज्यपालांनी सांगायचे आणि मुख्यमंत्र्यांनी मम् म्हणायचे असते. सुषमा स्वराज या दिल्लीच्या पहिल्या महिला मुख्यमंत्री होत्या, पण त्यांना फार कमी वेळ मिळाला. त्यामुळे मुख्यमंत्री म्हणून त्यांना आपला पाहिजे तसा ठसा उमटवता आला नाही. सुषमा स्वराज मुख्यमंत्री झाल्यानंतर दोनच महिन्यात म्हणजे १९९८ मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीत भाजपाचा पराभव झाला. त्यानंतर भाजपाला दिल्लीची सत्ता मिळवण्यासाठी २७ वर्षे वाट पाहावी लागली. सलग तीन लोकसभा निवडणुकांत दिल्लीतील सातपैकी सातही जागा जिंकणाऱ्या भाजपाला मात्र दिल्लीची विधानसभा हुलकावणी देत होती. त्यामुळे यावेळचा भाजपाचा विजय देवदुर्लभ म्हणावा लागेल. रेखा गुप्ता यांच्यासोबत सहा मंत्र्यांनी शपथविधी झाला आहे. मुख्यमंत्री म्हणून त्यांच्यासमोर पूर्ण पाच वर्षांचा कार्यकाळ आहे. त्यामुळेच हा कार्यकाळ आव्हानात्मक आहे. दिल्लीच्या जनतेच्या त्यांच्याकडून खूप अपेक्षा आहेत. या अपेक्षांची पूर्तता त्यांना टप्प्याटप्प्याने करावी लागणार आहे. मुख्यमंत्री म्हणून आपली तसेच आपल्या मंत्र्यांची कोणतीही कृती आणि विधाने वादग्रस्त ठरणार नाहीत, याची काळजी त्यांना घ्यावी लागणार आहे. प्रशासनावर पकड बसवावी लागेल. कारण त्यांच्यासमोर केजरीवालांचा आम आदमी पक्ष विरोधक आहे. केजरीवाल हे आक्रमक आणि आक्रस्ताळे नेते आहेत. त्यामुळे रेखा गुप्ता यांच्या सरकारला अडचणीत आणण्याची एकही संधी ते सोडणार नाहीत, यात शंका नाही. शपथ घेतल्यानंतर झालेल्या आपल्या मंत्रिमंडळाच्या पहिल्याच बैठकीत रेखा गुप्ता यांनी काही महत्त्वपूर्ण आणि धोरणात्मक निर्णय घेत आपली चुणूक दाखवून दिली आहे. आतापर्यंत दिल्लीच्या जनतेला लागू नसलेली केंद्र सरकारची आयुष्मान योजना त्यांनी दिल्लीत लागू केली. दिल्ली सरकारच्या भ्रष्ट कारभाराचा पर्दाफाश करणारा सीएजीचा अहवाल विधानसभेत सादर करण्याचा निर्णय घेतला आहे. केजरीवालांची राजकीय रेखा छोटी करताना आपली रेखा त्यांना मोठी करावी लागणार आहे. दिल्लीच्या जनतेची जीवनरेखा आणि भाग्यरेखा त्यांना व्हावे लागणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शाह यांचे पाठबळही त्यांची दिल्लीच्या मुख्यमंत्री म्हणून जमेची बाजू राहणार आहे. आतापर्यंत आक्रमक नेता ही रेखा गुप्ता यांची ओळख होती, पण आता त्यांना संयमी, मुत्सद्दी, प्रशासनावर पकड असलेल्या मुख्यमंत्री अशी आपली प्रतिमा निर्माण करावी लागणार आहे. आपल्या अंगभूत गुणांनी, दूरदृष्टीने आणि संघटनकौशल्याने त्या यात यशस्वी होतील, याबाबत शंका नाही.

## यंगिस्तान

**जयेश शत्रुघ्न मेस्त्री**

# 'ती'ची आत्महत्या आणि त्यांचे बलिदान...



पुण्याच्या इंजिनीयरिंग कॉलेजच्या सहिती रेड्डी नावाच्या २० वर्षीय मुलीने १५ व्या मजल्यावरून उडी मारून जीव दिला. आधी सर्वांना यामागचं कारण माहीत नव्हतं. मात्र तिच्या मृत्यूनंतर तिच्या मैत्रिणीच्या मोबाईलवर ऑडिओ क्लिप आली आणि त्यात मृत्यूचं कारण दडलं होतं. मृत्यूनंतर तिचा मेसेज आल्याने मैत्रिणीला धक्काच बसला. पण तिने ही ऑडिओ क्लिप ऐकली व त्यानुसार ती त्या टेरेसवर पोहोचली आणि क्लिपमध्ये उल्लेख केल्याप्रमाणे सहितीचा मोबाईल व पासवर्ड तिला सापडला आणि एक नवा खुलासा समोर आला. प्रणव डोंगरे नावाचा तिचा मित्र तिला त्रास देत होता. तिला टॉर्चर करत होता. या त्रासाला कंटाळून तिने आत्महत्या केली. त्यानंतर पोलिसांनी प्रणव डोंगरेला ताब्यात घेतले आहे. आता या प्रकरणात आणखी खुलासे होऊ शकतात. परंतु इंजिनीयरिंग कॉलेजमध्ये शिकणारी अवघी २० वर्षांची हिंदू तरुणी हे जग सोडून गेली हा चिंतेचा विषय आहे. २०२२ मध्ये १,७१,००० लोकांनी आत्महत्या केली. आधीच्या वर्षांच्यापेक्षा ४.२ टक्क्यांनी वाढ झाली आहे. नॅशनल क्राईम रेकॉर्ड्स ब्युरोनुसार भारतात १८ ते २९ आणि ३०-४५ वर्षे वयोगटातील लोकांमध्ये आत्महत्येचे प्रमाण लक्षणीय आहे. ही खरोखरंच चिंतेची बाब आहे. त्यामुळे हा केवळ सहिती रेड्डीचा प्रश्न नसून आपल्या समाजाचा प्रश्न आहे.

आताच छावा हा चित्रपट प्रदर्शित झाला. छत्रपती संभाजी महाराजांनी देव, देश आणि धर्मासाठी बलिदान दिलं, हे आता संपूर्ण भारताला कळलेलं आहे. इथे कुणी प्रश्न उपस्थित करू शकेल की याआधी माहीत नव्हतं का? तर औरंगजेबाच्या परंपरेतल्या काही लोकांनी इतिहास विकृत पद्धतीने मांडला आहे. दुसरी गोष्ट आपलं दुर्दैव असं की आपण मराठी माणूस म्हणून एकमेकांशी जातीवरून इतके भांडत बसलो की आपला समृद्ध इतिहास सांगण्यात आपण कमी पडलो. कुणी कितीही म्हटलं की चित्रपट हा इतिहास नसतो, पण तरीही चित्रपटातून होणारा परिणाम दीर्घकाळ टिकून राहणारा असतो. कलेची ताकद सावरकरांनी ओळखली होती आणि म्हणूनच त्यांनी नाट्य लिखाणातून आपले विचार लोकांपर्यंत पोहोचवले होते. लोकांच्या प्रतिक्रिया तुम्ही वाचल्या किंवा ऐकल्या असतील तर तुम्हाला कळेल की महाराजांचा पराक्रम पाहून लोक थक्क झाले आहेत. महाराज जगले देव, देश व धर्मासाठी आणि बलिदान सुद्धा याच कारणासाठी दिलं. स्वा. सावरकरांनी आत्महत्या आणि आत्मार्पण नावाचा एक निबंध लिहिला आहे. तरुणांनी हा निबंध अवश्य वाचला पाहिजे. जगण्यासाठी एक व्यापक ध्येय असलं पाहिजे आणि माझ्या मते ''देव, देश आणि धर्म'' यापेक्षा व्यापक भौतिक ध्येय दुसरे असू शकत नाहीत. हिंदू धर्मातील मोक्ष, स्व-चा शोध हे ध्येय आता तितके प्रचलित राहिले नाहीत.

विस्तारवादी पंथाचे लोक पंथासाठी जगतात, पंथासाठी मरतात आणि पंथासाठी मारतात. उलट आपण तर सनातन वैदिक हिंदू धर्माचे पाईक आहोत. आपण विस्तारवादी नाही. उलट आपण समरसतावादी आहोत. प्रचंड अभिमानास्पद असा आपला इतिहास आहे, आपला सांस्कृतिक वारसा सर्वांत प्राचीन आहे, आपली परंपरा अद्‌भुत आहे, आपली आध्यात्मिक बैठक जगाला हेवा वाटेल अशी आहे. इतकं सारं आपल्याकडे असताना आपण इतके निराश का आहोत? धक्का तेव्हा बसतो जेव्हा ज्यांच्या पाया पडावे, ज्यांच्याकडून मार्गदर्शन घ्यावे असे लोक आत्महत्या करतात. इतका टोकाचा निर्णय घ्यावासा का वाटतो? त्या २० वर्षांच्या मुलीने तिची समस्या आई-वडिलांना सांगितली असती तर त्यांनी ती समस्या सोडवली नसती का? वडील आपल्या मुलीसाठी काहीही करू शकतात. मग प्रश्न पडतो की मुलं आणि पालक यांच्यामधील संवाद हरवत चालला आहे का? मुलांना आपल्या पालकांवर विश्वास राहिलेला नाही का? ''तू काळजी करू नकोस, मी आहे'' असं म्हणणारं त्यांच्या आयुष्यात कुणीच नसतं का? कुणाच्या त्रासाला कंटाळून आत्महत्या करण्यापूर्वी कायद्याचा आसरा घ्यावासा वाटत नाही का? जर तरुणीने पोलिसात तक्रार केली असती व पोलिसांनी त्यांच्या पद्धतीने समज दिली असती तर कदाचित त्या तरुणीचा जीव वाचला असता. पण तिला पोलिसात तक्रार कराविशी वाटली नाही. कारण कदाचित तिचा कायद्यावरही विश्वास नसेल. त्यामुळे जेव्हा अशा प्रकारची एक आत्महत्या घडते तेव्हा असे अनेक प्रश्न निर्माण होतात. आपण मोबाईलवर एक टॅप करून काहीही जाणून घेऊ शकतो इतके आपण प्रगत झालेलो असताना समाज म्हणून आपण मागास होत आहोत का?

मी या विषयावर एक पुस्तक लिहिलं आहे. ''सावरकर - सकारात्मक विचारांची गुरुकिल्ली.'' स्वा. सावरकरांचा झालेला छळ, अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत केलेलं कार्य हे तरुणांसमोर येणं खूप गरजेचं आहे. त्यांच्या आयुष्यात असे अनेक प्रसंग होते, जे आत्महत्येस प्रवृत्त करतील. परंतु त्यांनी आत्महत्येचा विचार झुगारून जीवनाचा स्वीकार केला आणि भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्यात सिंहाचा वाटा उचलला. त्याही पलीकडे जाऊन अस्पृश्य उद्धार, सामाजिक सुधारणा, राजकारण अशा अनेक पातळींवर त्यांनी कामे केली. त्या काळी अंदमान हे वेड लागण्याचं ठिकाण होतं. पण सावरकर गेले आणि ते मानसोपचाराचं ठिकाण झालं. कसं ते या पुस्तकात तुम्हाला वाचता येईल. सांगायचं तात्पर्य असं की तुमच्यासमोर व्यापक ध्येय असेल तर तुम्ही आत्महत्येच्या विचारांवर नियंत्रण मिळवू शकता. देश स्वातंत्र्य हे सावरकरांसमोरील व्यापक ध्येय होतं. म्हणजेच ''देव, देश आणि धर्म'' हे व्यापक ध्येय समोर ठेवल्यावर आपल्या आयुष्याला एक वेगळी दिशा मिळते. स्वतःचं कल्याण, यशस्वी होणे - हे ध्येय असायलाच हवे. पण आपली प्रत्येक कृती ही देव, देश आणि धर्माला समर्पित असायला हवी. उदा. आपण डॉक्टर झालो तर आपलं भलं होईलंच. पैसे मिळतीलच. पण त्याचबरोबर देशबांधवांना रोगमुक्त करून देशाचं सुद्धा भलं करता येईल. हे व्यापक ध्येय आहे. वाचकहो, भारतीय समाजातील आत्महत्येचं वाढतं प्रमाण चिंताजनक आहे. आपण जर मुलांना देव, देश आणि धर्माचं बाळकडू पाजून व्यापक ध्येय त्यांना दिलं तर कदाचित चित्र बदललेलं दिसेल. माझ्या वर नमूद केलेल्या पुस्तकात ''आत्महत्या करण्यापूर्वी सावरकर चरित्र वाचा'' या नावाचा एक अध्याय आहे. महापुरुषांच्या चरित्रातून आपल्याला व्यापक ध्येय सापडेल आणि जगण्याची इच्छा बळावेल. तुम्हाला जगण्याचे बळ मिळो, ही विश्वेश्वर चरणी प्रार्थना...

writerjayeshmestry@gmail.com

## वेध

**विजय पांढरीपांडे**

# सतर्क राहा!

सोळावे वरीस धोक्याचं असं आधी म्हटलं जायचं. तसे एक गाणे देखील होते. आता ही धोक्याच्या वयाची मर्यादा सहा सात वर्षांनी खाली घसरली आहे की काय अशी परिस्थिती दिसते. शाळेत जाणारी सहा सात वर्षांची मुलं देखील हातात मोबाईल आल्यापासून, सोशल मीडिया अन् विविध ॲपला नादावल्यापासून त्यांचे तिशीतले आई-वडील त्रस्त आहेत. हा संसर्गजन्य रोग एका गावापुरता, शहरापुरता, राज्यापुरता मर्यादित राहिला नाही. तो देशभर व्हायरल झाला आहे.

आता लहान, तरुण मुलांना ना आई-वडिलांचा धाक राहिला, ना शाळेतल्या शिक्षकाचा. पूर्वी शाळेतल्या शिक्षकाचा दरारा होता. वेळ पडल्यास कान उपटणे, छडीचा प्रसाद देणे हा अधिकार पालकांनीच त्यांना दिला होता. आता लाखो रुपयांची फी आकारणाऱ्या शाळेत शिस्तीची व्याख्याच बदलली आहे. शिक्षक, प्राचार्य कुणाचेच या मुलांवर नियंत्रण राहिले नाही. आपल्या कामात व्यस्त असलेल्या पालकांनाही शाळेतल्या शिस्तीची फिकीर नाही. उलट आज जमाना बदलला आहे हे पालुपद उगाळत ते शिक्षकांना, प्राचार्यांना दुर्लक्ष करायला सांगताहेत. दोन्ही कमावत्या पालकांच्या हातात लाखोंचे पॅकेज खेळत असल्याने महागड्या बर्थ डे पार्टीज, विमानाने प्रवास अन् आलिशान रिसॉर्टयुक्त हॉलिडेजची सवय या मुलांना लहानपणातच झाली आहे. अर्थात या गोष्टी शहरी वातावरणापुरत्या मर्यादित असल्या तरी तारुण्यसुलभ आकर्षणापोटी जन्माला येणाऱ्या भानगडी लहान गावात देखील कॉमन झाल्या आहेत. नवे तंत्रज्ञान फायद्याचे, सोयीचे असले तरी ज्या चक्रवेगाने त्यातील कन्टेन्ट, ॲप, व्हिडीओ, गेम्स वाढताहेत, अन्? लहान पोरांना नादी लावत आहेत, ते बघता आता कुठेतरी यावर नियंत्रण हवे हा विचार पुढे यायला लागला आहे. कारण अवती भवतीचे वातावरण इतक्या वेगाने बदलते आहे की पालकांना देखील कुठे कसे नियंत्रण ठेवावे हे कळेनासे झाले आहे. विचारस्वातंत्र्य, व्यक्त होण्याचे स्वातंत्र्य, खाण्यापिण्याचे, कपडे घालण्याचे फॅशन स्वातंत्र्य प्रत्येकाला हवे हा आधुनिक विचार एकीकडे बळावत चालला असताना, दुसरीकडे आपली जुनी परंपरा, संस्कार, देव, धर्माच्या मर्यादा याचाही बोलबाला वाढतो आहे. पण मोबाईल, इंटरनेट, सोशल प्लॅटफॉर्म या सुखसोयींच्या तंत्रज्ञानाचा अजगर विळखा आता इतका घट्ट आवळला गेलाय की त्यातून कुणाचीच सुटका नाही. आता मुलांना पॉकिट मनी नव्हे तर थेट क्रेडिट-डेबिट कार्ड, ऑनलाईन पेमेंटची सवय झाली आहे. महागडे ड्रेसेस, शूज, गिफ्ट्स हे सवयीचे झाले आहेत. लहान मुलांच्या तोंडी घाणेरड्या शिव्या आल्या आहेत. डेटिंग, चॅटिंग, अफेअर्स आता आठ दहा वर्षांच्या वयात सुरू होतात. व्हॉट्स ॲप मेसेजेस, व्हिडीओ शेअरिंग हे खालच्या पातळीवर आले आहे. कशाचाच कुठे ताळतंत्र राहिला नाही. मुलांना पालक बोलले, रागावले तर ती चक्क उलट उत्तरे देताहेत. रागावून आत्महत्येचे टोकाचे पाऊल उचलण्याच्या घटना घडताहेत. एकूणच परिस्थिती नियंत्रणाबाहेर जाताना दिसते आहे. हा पद्धतशीरपणे रचलेला सापळा आहे का? किंवा आजच्या राजकीय भाषेत हे नवे नॅरेटिव्ह आहे का कुठल्या बाह्य शक्तीचे किंवा अदृश्य हाताचे? तरुण पिढी बिघडली, शिक्षणापासून विचलित झाली की राष्ट्र डळमळते. आपली संस्कृती पोखरली जाते. फार पूर्वी मोगलांनी हेच केले. ब्रिटिशांनी देखील तोच कित्ता गिरवला. आता आपण नव्या दिशेने, नव्या जोमाने वाटचाल सुरू केली आहे. नव्या उद्दिष्टांच्या दिशेने झेप घेतली आहे. पण हे नवे तंत्रज्ञान वरदान ठरण्याऐवजी शाप ठरू पाहते आहे. यामुळे आपले जीवन सुसह्य भलेही झाले असेल. पण आपला आनंद हिरावून घेतला गेला आहे. आपण इमोशनकडून इन्फॉर्मेशनकडे वाटचाल सुरू केली तेव्हाच या धोक्याच्या वळणाला सुरुवात झाली. गेल्या काही दशकांचा नीट अभ्यास केला तर आपल्या लक्षात येईल. भावनिक नात्याला घरघर लागली. कुटुंबातला लळा जिव्हाळा संपला. कोणे एके काळी जी घरे भरलेली होती ती विभक्त कुटुंब पद्धतीत रोडावली. स्वार्थ बोकाळला. दोन पिढ्यांतले अंतर वाढले. आजी-आजोबांच्या नशिबी एकटेपण आले. तरुण पिढी एकतर परदेशात स्थिरावली किंवा याच देशात आई- वडिलांपासून विलग होत लाखोंच्या वार्षिक पॅकेजच्या नादी लागून आपल्या नव्या मृगजळातील महालात रममाण झालीत. हा बदल सर्वांनीच गुण्यागोविंदाने स्वीकारला. कारण दुसरा पर्यायच उरला नव्हता. असला तरी तो शोधायची गरज भासली नाही कुणाला. आपल्या कुटुंबव्यवस्थेचा तालत बिघडला. आता तर कृत्रिम बुद्धिमत्ता काय, मशीन लर्निंग काय अशी नवी भुते आपल्या मानगुटीवर बसायला तत्पर झाली आहेत. माणसाला अधिकाधिक आळशी, निरुपयोगी करण्याचे पद्धतशीर प्रयत्न सुरू आहेत. आपली भावना, विचारशक्ती, विवेक जर या तंत्राने आपल्याकडे गहाण ठेवून घेतला तर आपले काय होईल याचा आपण वेळीच विचार केलेला बरा.

७६५९०८४५५५

## मुंबई वार्तापत्र

**नागेश दाचेवार**

# असा धक्का देऊ की...



'मच्छर चावला तर, खाजवायचं कसं अशी परिस्थिती माझी होती', अशी कबुली स्वतः देणारे आणि दसरा मेळाव्याप्रसंगी खाली बसल्यावर पुन्हा उभं राहायला दोन लोकं लागणारे, गणपतीची आरती करताना आरतीचं वजन हाताला न झेपणाऱ्या उधोजींनी यावेळी 'असा धक्का देऊ की ते पुन्हा उठणारच नाहीत' असा इशारा दिलाय्? म्हणे... कुठे धक्का देणार तर, मुंबई महापालिकेच्या निवडणुकीत!.. गद्दारांना धडा शिकवू, गद्दारांना गाडा... सूड सूड सूड आणि सूड उगवण्याच्या प्रचंड यशानंतर 'आता असा धक्का देऊ की...' हा एकपात्री हास्यप्रयोग घेऊन येत आहेत, आपले हास्यसम्राट उद्धव ठाकरे साहेब...

आजवर वाघ बनून फिरणारे यावेळी भिजलेल्या कोकरासारखे झालेले दिसत आहेत. यापेक्षा वस्तुस्थितिदर्शक वेगळं वर्णन उद्धव ठाकरेंच्या परिस्थितीत दुसरं काही होऊ शकत नाही. एकेकाळी राज्यात डरकाळी फोडणाऱ्या वाघाचं अस्तित्व वाचविण्याची म्हणजेच आता राज्यात 'वाघ वाचवा मोहीम' उद्धव ठाकरेंनी हाती घेतली आहे. करणार तरी काय साहेबांवर परिस्थितीच तशी ओढवली आहे. आता सोबत असणारा नेता 'पलक झपकतेही' असे हिंदीत म्हणतात ना तसा सेकंदात एकनाथ शिंदेंसोबत दिसतो. आणि वर्षानुवर्षे सोबत असणारा, सेकंदापूर्वी दुसरीकडे गेला की तोच प्रामाणिक नेता, कार्यकर्ता लगेच गद्दारही ठरतो. हे उद्धवजींच्या नेतृत्वाचं विशेष आहे, बरं का!... म्हणजे वषोन्वर्षे पक्षात खपविलेला नेता अचानक पक्ष सोडून जातो याचे श्रेय उद्धवजींच्या नेतृत्वालाच जाते. हे श्रेय कोणीही त्यांच्याकडून हिरावून घेऊ शकत नाही.

आता ५४ आमदारांपैकी ४० गद्दार, १८ खासदारांपैकी ११ गद्दार, आता नेते, उपनेते, प्रवक्ते, मुंबईचे शाखा प्रमुख, जिल्हाप्रमुख, तालुकाप्रमुख, नगरसेवक, अध्यक्ष, जिल्हा परिषद सदस्य, अध्यक्ष, पंचायत समिती सदस्य, सभापती, नगर पंचायत सदस्य, अध्यक्ष, ग्राम पंचायत सदस्य, सरपंच अशी सगळी मोठ्या संख्येने सोडून गेलेली नेते मंडळी सगळी गद्दार ठरविली गेली. आणि यातली महत्त्वाची बाब म्हणजे या सगळ्या जुन्या मंडळींना बाळासाहेबांनी घडविले होते. आता बाळासाहेबांचे पुत्र या बाळासाहेबांच्या शिलेदारांना गद्दारीचं प्रमाणपत्र वाटप करत फिरत आहेत. त्यामुळे प्रश्न असे निर्माण होतात की, बाळासाहेबांनी शिवसैनिक नव्हे तर, गद्दार घडविले का? बाळासाहेबांच्या नेतृत्वावर उद्धवजींना शंका उपस्थित करायची आहे का?, बाळासाहेबांना माणसांची परख नव्हती, असे उद्धवजींना सुचवायचे आहे का?, या प्रश्नांची उत्तरं आधी उद्धव साहेबांनी शिवसैनिकांना आणि महाराष्ट्राला देण्याची गरज आहे. यावेळी बाळासाहेबांचं सोडा अधिक खोलात जाऊन विचार केला तर, मुळात गद्दार घडविण्याची फॅक्टरीच उद्धवजी चालवतात का? असा प्रश्न देखील निर्माण होतो. त्यामुळे उद्धवजी ॲण्ड कंपनीने 'ह्याला गाड त्याला गाड'चे राजकारण करण्यापेक्षा गेल्या चार साडेचार वर्षांमध्ये घरी बसून अर्थात अख्खं राज्य घरी बसून चालविणाऱ्यांना वेगळ्याने सांगण्याची गरज नाही, कारण ते घरी बसून दरबारी राजकारण करण्यात पारंगतच आहेत. तरीदेखील घरी बसून शांतपणे आत्मपरीक्षण केले असते तर, त्यांना 'वाघ वाचवा मोहीम' राबवावी लागली नसती. आणि आजवर मान खाली घालून बसणारे छाती फुगवून उघड माथ्याने तुमच्या छाताडावर पाय ठेवून, दणक्यात फिरताना दिसले नसते. महत्त्वाची, चिंतेची गंभीर बाब म्हणजे काल-परवापर्यंत एकनाथ शिंदेंना पाण्यात पाहणाऱ्या, नोकर समजणाऱ्या उद्धव ठाकरेंना शिंदेंच्या 'ऑपरेशन टायगर'ची भीती वाटली नसती. पण आजची परिस्थिती तर उद्धवजींसाठी भीतिदायकच आहे. अर्थात त्यांच्याच शब्दात सांगायचं झाल्यास त्यांच्या नोकरानेच त्यांची झोप उडवून ठेवली आहे. ही 'शिवसेना' आहे की, 'शिव्यासेना' म्हणत, वाघाची पार शेळी करून ठेवली आहे. मुळात वाघाची शेळी काय शिंदे तर यांना वाघच मानायला तयार नाहीत. वाघाची झूल ओढून वाघ असल्याचा बनाव करणारे डोंबारी असल्याचं सांगत यांना हिणवताना ते दिसतात.

यावेळी उद्धव ठाकरेंच्या लोकसभा आणि विधानसभेतील शिलेदारांना केंद्रात आणि राज्यात २०२९ पर्यंत विरोधातच बसायचं आहे. त्यामुळे उरलेल्यांना अजून पाच वर्षे सांभाळणे उद्धव ठाकरेंसाठी मोठे आव्हान आहे. त्यातही सोबत असलेल्यांचा संयम कधी तुटेल याचीही काही शाश्वती नाही. कुणीही सत्तेच्या बाजूने राहणे पसंत करतात. त्यातून स्वतःची आणि स्वतःच्या मतदारसंघातील चार कामं होणे त्यांना अपेक्षित असते. त्यामुळे उद्धव यांचे शिलेदार किती दिवस त्यांच्या भूलथापांना बळी पडून विरोधात राहणे पसंत करतात, याची कोणीही हमी देऊ शकत नाही. ठाकरेंचे आर्थिक स्रोत घटले आहेत. उत्पन्नाचा मुख्य स्रोत बृहन्मुंबई महानगर पालिका होती. ती आज यांच्या ताब्यात नाही आणि पुढे येईल याची खात्री नाही. हे सगळं ठाकरेंसोबत असलेल्या आत्ताच्या शिलेदारांना चांगल्याने कळून चुकलं आहे. त्यामुळे त्यांना स्वतःच्या अस्तित्वाची, भवितव्याची चिंता लागली आहे. यावेळी नऊ खासदारांमध्ये केवळ अरविंद सावंत आणि अनिल देसाई हे दोघेच सोबत राहतील अशी खात्री स्वतः ठाकरेंना आहे. दुसरीकडे २० आमदारांचा विचार केलाच तर, आदित्य ठाकरे, वरुण सरदेसाई हे दोन घरचे आणि अजय चौधरी या तीन नावांच्या पलीकडे कोणावरही विश्वास आजघडीला नाही. आता संघटनात्मक बांधणीचा घाट ठाकरेंनी घातलेला दिसत आहे. ती त्यांची अपरिहार्यता आहे. कारण आजघडीला त्यांच्याकडे संघटनाच उरलेली नाही. पण तेथेही ठाकरेंनी गडबड केल्याचं दिसतं. पक्ष कार्यकर्त्यांमध्ये सर्वमान्य नसलेले, किंबहुना नाराजी असलेल्या संजय राऊतांकडे याची जबाबदारी देण्यात आली आहे. ज्यांनी पक्षाची वाट लावली त्याच व्यक्तीकडे पुन्हा संघटन बांधणीची जबाबदारी देणे म्हणजे चोराच्या हातात चावी देण्यासारखं असल्याच्या प्रतिक्रिया कार्यकर्त्यांकडून येत आहेत. ठाकरेंना स्वतःची, पक्षाची एवढी वाताहत होऊनही घरी बसून राजकारण करण्याचा मोह काही आवरता येत नसल्याचे दिसते. बरं येथे 'बाप से बेटा सवाई' आहे. बापाला नसेल जमत तर, मुलाने पुढाकार घ्यावा तर त्यालाही नाईट लाईफपासून फुरसत नाही. अशा परिस्थितीत हातापायात जोर नसताना, मैदानात येऊन लढण्याची कुवत नसताना, कोणाच्या जिवावर धक्का देण्याची टिमकी हे लोक वाजवतात, याचेच आश्चर्य वाटते. धक्के खाऊन खाऊन मी धक्कापुरुष झालोय्, म्हणणारे उद्धव ठाकरे आज कोणाला धक्का देण्याच्या परिस्थितीत नाहीत. मात्र, आजही कार्यशैलीत सुधारणा केली नाही तर, शिंदे अजून मोठे धक्के देतील यात शंका नाही.

९२७०३३३८८६

### तपासणी तर सर्व शासकीय कामांची व्हायला हवी

निवडणुकीपूर्वी मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना अंमलात आणली आणि महिलांची मतदानाची टक्केवारी सुद्धा वाढली गेली. त्यानंतर सरकारी तिजोरीवर भर पडताच याचा परिणाम मात्र सामान्य माणसाच्या खिशावर होतो आहे. त्यानंतर अत्यावश्यक बाबींमध्ये भाववाढ झाली, एसटी तिकीट दरात वाढ झाली, सरकारी कर्मचारी वेतनात वाढ झाली, अनेक वस्तूंचे भाव गगनाला भिडत आहेत. यात मरण मात्र सामान्य माणूस, शेतकरी, कामगार वर्गांचे होते आहे. महाराष्ट्र सरकारने मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना सुरू केली. मात्र त्यातही बोगस लाभार्थींवर आळा घालण्यासाठी उपाययोजना सुरू केल्या आहेत. कागदपत्रांची छाननी, तपासणी केली जाते आहे. केवळ दीड हजार प्रति लाभार्थी याप्रमाणे यात लाभ मिळत असला तर तपासणी केली जाते ही बाब विचार करायला लावणारी आहे. एकीकडे दिवसाढवळ्या ठिकठिकाणी अवैधरीत्या उत्खनन, नैसर्गिक साधनसंपत्तीवर अनेकांनी आपली घरे भरली आहेत, तर दुसरीकडे बोगस कागदपत्रांवर नोकरी मिळवणारे हजारो शासकीय कर्मचारी ऐशोआरामात आयुष्य काढत आहेत. तेव्हा यांच्या शैक्षणिक व अनुभव प्रमाणपत्रांची सखोल तपासणी का केली जात नाही असा प्रश्न पडतो. बोगस मतदानावर आळा घातला जात नाही. प्रत्येक क्षेत्रात बोगस कागदपत्रे दाखवून कोटींचा निधी हडप होताना दिसतो. आवास योजनेत बोगस लाभार्थी दिसतात. घरात सरकारी नोकरदार असूनही दारिद्र्य रेषेखालील यादीत अनेकांची नावे दिसतात. याबाबत सरकार गांभीर्य का दाखवत नाही. कागदपत्रांची तपासणी तर अशांची करायला हवी. राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थेच्या माध्यमातून कोटींचा निधी दरवर्षी खर्च होताना दिसतो. मात्र यात गुणवत्तापूर्ण विकासकामे होतांना दिसत नाही. उलट प्रामाणिकपणे कागदपत्रांची छाननी व कामांची पाहणी केल्यास भ्रष्टाचार होत असल्याचेही चित्र अनेक ठिकाणी नक्कीच दिसून येईल यात शंका नाही. शासकीय निधी हा जनतेच्याच खिशातला निधी असतो हे सत्य आहे. पण याचा योग्य विनियोग होतो की नाही याची शहानिशा सरकारने सुद्धा करायला हवी. राज्यातील बोगस लाभार्थींवर आळा घालण्यासाठी तसेच वारंवार विविध योजनांचा लाभ घेणाऱ्यांचीही कागदपत्रांची तपासणी होणे अत्यावश्यक आहे.

**सचिन नागरे**/९६०४३२१४३२

## वाचक पत्रे

### हाव आणि हेवा

मानवी मन विविध भावनांची एक गुंतवण आहे. काही भावना व्यक्तीच्या जीवनात आनंद फुलवतात तर काही भावना व्यक्तीचे जीवन प्रदूषित करीत जातात. हाव आणि हेवा या मानवी मनातल्या अत्यंत प्रदूषित अशा भावना आहेत. प्रत्येक व्यक्तीला आपल्या जीवनावश्यक गरजा पूर्ण करणे आवश्यक असते परंतु इच्छा आणि गरज यामधील फरक ज्यांना कळतो त्यांचे जीवन अधिक आनंदमय होऊ शकते. परंतु इच्छा आणि गरज यामधील भेद ज्यांना कळत नाही आणि प्रत्येक इच्छेला गरज समजून जी माणसे ती गरज पूर्ण करण्याकरिता सतत धावपळ करीत असतात. त्यांच्या जीवनात सतत अस्वस्थता आणि अशांती असते. अशा व्यक्तीच्या मनात हाव आणि हेवा या प्रदूषित भावना सतत घर करून बसलेल्या असतात. प्रत्येक इच्छा ही गरज समजून ते ती इच्छा पूर्ण करण्याकरिता सतत पैसा कमविण्याचा प्रयत्न करीत असतात सुख आणि चैनीची गरज त्यांना सतत मागे फिरवत असतं ते सदैव अस्वस्थ असतात आणि त्यासाठी ते गरज पडल्यास अवैध मार्गांचा अवलंब करून वेड्यासारखे पैशाच्या मागे धावत असतात. श्रीमंत लोकांचे अनुकरण करून ते अधिक श्रीमंत होण्याचा, प्रभावशाली होण्याचा प्रयत्न करीत असतात. त्यासाठी वेळप्रसंगी तुरुंगवास भोगण्यास मागे पुढे पाहत नाही. आपल्यापेक्षा श्रीमंत आणि लोकप्रिय प्रभावी माणसे जे असतील त्यांचा ते हेवा करतात. हाव आणि हेवा यामुळे अशा व्यक्तींचे जीवन अधिक दुःखमय आणि प्रदूषित होत जाते. संत रामदास स्वामींचे मनाचे श्लोक त्यांना आवर घालू शकत नाही किंवा तुरुंगाची हवा त्यांची हाव कमी करू शकत नाही.

अशा व्यक्तींवर समाजातील लोक आवर घालू शकतात. वेळप्रसंगी त्यांच्यावर बहिष्कार टाकून त्यांना योग्य जागा दाखवू शकतात. अशा लोकांच्या मागे केवळ समाजच नसतो तर त्यांच्या कुटुंबातील लोक सुद्धा त्यांचे कौतुक करत असतात. त्यामुळे ते अधिकाधिक हावरट होत जातात. वेळप्रसंगी देशाचा सुद्धा हेवा हे करू लागतात. कुटुंबातील लोकांनी अशा लोभी आणि हावरट लोकांवर नजर ठेवून त्यांना योग्य मार्ग दाखविला पाहिजे. असे केल्यास समाजातील वातावरण अधिक सुखदायक होईल. चांगल्या मूल्यांची जोपासना होईल आणि येणाऱ्या पिढीला योग्य वळण लागेल.

**शशिकांत पांडे**/नागपूर

### शाळा, महाविद्यालयांत छावा चित्रपट दाखवा

छत्रपती संभाजी महाराजांच्या जीवनावर आधारित छावा हा दर्जेदार चित्रपट नुकताच प्रदर्शित झाला आहे. छत्रपती संभाजी महाराजांच्या जीवनावर प्रकाश टाकणारा हा चित्रपट सर्वार्थाने दर्जेदार आहे. यातील कलाकारांचा अभिनय दर्जेदार आहे. चित्रीकरण सुंदर आहे. या चित्रपटातून छत्रपती संभाजी महाराजांच्या जीवनातील अनेक अपरिचित प्रसंगाची माहिती मिळते. संभाजी महाराजांचे शौर्य, त्यांचा राज्यकारभार, या गुणांचा उलगडा होतो. छत्रपती संभाजी महाराजांना स्वराज्य रक्षक का म्हणतात? हे हा चित्रपट पाहिल्यावर समजते. स्वराज्य रक्षणासाठी त्यांनी स्वतःचे बलिदान दिले. संभाजी राजांच्या बलिदानाची महती विद्यार्थ्यांना कळावी यासाठी हा चित्रपट शाळा व महाविद्यालयांत मोफत दाखवण्यात यावा.

**श्याम ठाणेदार**/९९२२५४६२९५

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस tbedit2016@gmail.com

तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास ९६५०७५३२८१ या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.

प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समूह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७६६८ RNI Reg.No 46878/87

stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

# पदवी सोबतच छोटे छोटे तांत्रिक कौशल्य पूर्ण करा : राज्यमंत्री बोर्डीकर

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. २२ फेब्रुवारी**



विद्यार्थ्यांनी आपल्या पदवीचा अभ्यासक्रम करताना किंवा पदवी झाल्यानंतर कौशल्यपूर्ण एखादा अभ्यासक्रम पूर्ण करावा. ज्यामुळे त्यांना करिअर करणे आणि नोकरी मिळविणे शक्य होईल, अशी सूचना राज्याच्या राज्याच्या सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण, पाणीपुरवठा आणि स्वच्छता, ऊर्जा, महिला व बालविकास, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी केली.

भोकरच्या आमदार श्रीजया चव्हाण यांनी शंकरराव चव्हाण महाविद्यालय अर्धापूर येथे आयोजित केलेल्या युवा उमेदवार रोजगार मेळाव्यात श्रीमती बोर्डीकर उद्घाटक म्हणून त्या बोलत होत्या. नांदेड जिल्ह्यातील शंकरराव चव्हाण महाविद्यालय अर्धापूर येथे आयोजित या युवा उमेद रोजगार मेळाव्यामध्ये मोठ्या संख्येने युवक-युवती उपस्थित होत्या.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी राज्याचे माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोक चव्हाण होते. तर विशेष अतिथी म्हणून अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र पाटील, आ.श्रीजया चव्हाण, स्वामी रामानंद तिर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू मनोहर चासकर,जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, माजी आमदार अमर राजुरकर, माजी आमदार अमीता चव्हाण आदीं मान्यवरांची उपस्थिती होती.

यावेळी बोलताना बोर्डीकर यांनी आजचे युग कौशल्याचे असून तुमच्या पदवीसोबतच तुम्हाला रोजगारासाठी आवश्यक असणारे कौशल्य प्राप्त असणे आवश्यक आहे. बदलत्या तंत्रज्ञानानुसार व आवश्यकतेनुसार आपल्या अभ्यासक्रमांमध्ये बदल करावा लागणार आहे. जगात सध्या कौशल्याची मागणी आहे. त्यामुळे तुमच्याकडे फक्त पदवी असून चालणार नाही. तर जगाला हवे असणारे कौशल्यही लागणार आहे. त्यामुळे विद्यापीठांनी देखील अशा पद्धतीच्या कमी कालावधीच्या अभ्यासक्रमाची निर्मिती करून नव्या पिढीला कौशल्य प्राप्त करून द्यावे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

यावेळी अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र पाटील यांनी आपल्या महामंडळामार्फत मराठा समाजातील सुशिक्षित बेरोजगार युवकांसाठी मोठ्या प्रमाणात कर्ज परतावा योजना उपलब्ध आहे. म्हणजे थोडक्यात कुणबी मराठा समुदायातील युवकांनी त्यांना आवड असणाऱ्या क्षेत्रातील उद्योग व्यवसाय उभारावा. या उद्योग व्यवसायात उभारण्यासाठी त्यांना बँकेने जे कर्ज दिले आहेत. त्याचा परतावा सरकार करणार आहे. अत्यंत सोपी ही पद्धत आहे. त्यासाठी युवकांनी पुढे यावे ,असे आवाहन त्यांनी यावेळी केले. या योजनेअंतर्गत अनेकांच्या आयुष्यात परिवर्तन झाले आहे. नांदेडमध्ये ही मोठ्या संख्येने या योजनेचा लाभ घ्यावा, असे आव्हान त्यांनी यावेळी उपस्थित युवकांना केले.


माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोक चव्हाण यांनी अध्यक्ष स्थानावरून बोलताना प्रत्येक काळाची एक गरज असते. श्रीजया चव्हाण यांनी निवडणुकीमध्ये युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याच्या आवाहन केले होते. त्यानुसार त्यांनी आजचा रोजगार मेळावा घेतला आहे. शेकडो कंपन्या या ठिकाणी आल्या आहेत. हा उपक्रम आता पूर्ण जिल्ह्यामध्ये हळूहळू राबविल्या जाईल. याशिवाय नांदेड जिल्ह्यामध्ये मोठे उद्योग सुरू करण्यासाठी आपण शासनाकडे पाठपुरावा करणार आहे. केवळ नांदेडच नव्हे तर मराठवाड्यात मोठ्या प्रमाणात उद्योग व्यवसाय यावेत यासाठीचे आपले प्रयत्न असून त्यातून युवकांच्या हाताला काम मिळावे, हा उद्देश असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.जवळपास ४ हजारावर बेरोजगारांची नोंद झाली असल्याचे त्यांनी सांगितले. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू मनोहर चासकर यांनीही यावेळी संबोधित केले. जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी यावेळी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना छोट्या छोट्या नोकरी पासून सुरुवात करा. सुरुवात करणे महत्त्वाचे आहे. नंतर दिशा मिळत राहते असे स्पष्ट करून कोणत्याही क्षणी हार न मानण्याच्या आवाहन विद्यार्थ्यांना केले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन नरेंद्र चव्हाण यांनी केले. सूत्रसंचालन विश्वंधार देशमुख यांनी केले.

# हदगाव शहरात तरुणाचा चाकूने भोसकुन खून; १० आरोपी अटकेत

**तभा वृत्तसेवा**
**हदगाव,दि. २२ फेब्रुवारी**

हदगाव शहरातील खुदबई नगर जिनिंग जवळ येथे दिनांक २१ फेब्रुवारी रोजी सायंकाळी साडेसातच्या सुमारास एका युवकाचा नावे शेख अराफत शेख मेहमूद वय २१ वर्ष याचा चाकूने भोसकून खून झाल्याची घटना घडली.

पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, हदगाव शहरातील खुदबई नगर येथे दोन दिवसांपूर्वी आमच्या मुलीपासून दूर राहा अन्यथा तुला जीव मारतो अशी धमकी दिली होती. दरम्यान दि.२१ फेब्रुवारी सायंकाळी साडेसातच्या सुमारास मयत शेख अराफत आपल्या घराजवळील लाकडावर बसला असता जेवणासाठी आईने घरी बोलवले असता घरी येत असताना आरोपी राम्या संभा काळे, पम्या संभा काळे ,साहेबराव काळे, कृष्णा काळे, संजय खानजोडे, प्रदीप पंडित, सीमा काळे, वंदना काळे, जिजाबाई मस्के, प्रियंका काळे ,वत्सला काळे, ओमकार काळे यांनी माझ्या मुलास सर्वांनी घेरून माझ्या मुलीच्या मागे लागून त्रास का देत आहेस ? आमच्या मुलीवर वाईट नजर का ठेवत आहेस ? तुला सांगूनही तू ऐकत का नाहीस ? तुला आम्ही आता ठार मारतो असे म्हणून लाथ्या- बुक्क्यांनी मारहाण करण्यास सुरुवात केली. त्यानंतर रम्या, पम्या, साहेबराव काळे, कृष्णा काळे, संजय खानजोडे यांनी जवळच्या चाकू काढून माझ्या मुलावर वार केले असता त्याला वाचविण्याचा प्रयत्न खूप केला पण



इतर जण मारहाण करतच होते. जखमी अवस्थेत त्यास इतरांच्या मदतीने उपजिल्हा रुग्णालय हदगाव येथे नेण्यात आले होते परंतु पुढील उपचारार्थ विष्णुपुरी नांदेड येथे हलविण्यात आले . विष्णुपुरी नांदेड येथे उपचारादरम्यान मृत्यू झाला अशी फिर्याद मुबीना बी शेख मेहमूद रा. जिनिंग जवळ खुदबई नगर यांनी दिली यावरून हदगाव पोलिसांनी गु. र. नं.४२/२५ कलम ११८(१), ११५(२), ३५१(२) , ३५१(३), १८९(२), १९०,१९१(२), १९१(३), १०३(१) भारतीय न्याय संहिता या कलमानुसार गुन्हा दाखल झाला. या घटनेतील एकूण पंधरा आरोपींवर गुन्हा दाखल झाला असून दहा आरोपी अटक असून पाच जण फरार आहेत. सदर घटनेचा तपास पोलीस निरीक्षक राजेश पुरी यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात येत आहे. सदर घटनेनंतर हदगाव पोलीस स्टेशन कडे अनेकांनी धाव घेतली त्यांना शांत करत असताना खुदबईनगर येथे मयत व आरोपीचे घर जवळ असल्याने तिथे अचानक दगडफेकीस घटना चालू होती त्या घटनेचा वृत्तानकरिता काही पत्रकार त्या ठिकाणी गेले असता त्यातील एका पत्रकारास जबर मार लागला. तणावपूर्ण वातावरणात आज दुपारी दोनच्या नंतर अंत्यविधी प्रक्रिया पार पडली सदर घटनेच्या पार्श्वभूमीवर भोकर ,तामसा, मनाठा ,हिमायतनगर, नांदेड येथून अतिरिक्त पोलीस कुमक बोलविण्यात आले होते .उपविभागीय पोलीस अधिकारी मळधने कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी शहरात तळ ठोकून होते.

**घडलेल्या घटनेची माहिती देण्यास पोलीस अधिकाऱ्यांची टोलवाटोलवी**

घटनेला १४ तास उलटल्यानंतर अनेक पत्रकार बांधव पोलीस स्टेशन येथे माहिती घेण्यासाठी गेले असता त्या ठिकाणी असलेले पोलीस उपनिरीक्षक उमेश रायबोळे म्हणाले की , तुम्हाला माहिती देणे मला बंधनकारक नाही आपण माहिती घटनास्थळी जाऊन घ्यावी अशी उपरोधक भाषा त्यांनी वापरली व माहिती सुद्धा दिली नाही.

## संक्षिप्त वृत्त



### येरगी येथे मातृ-पितृ पूजन दिवस संपन्न

**देगलूर**-तालुक्यातील चालुक्य कालीन नगरी येरगी येथे बालिका पंचायत राज समितीच्या वतीने मुलांमध्ये संस्कार रुजविले जावेत यासाठी मातृ-पितृ पूजन दिनानिमित्त कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. मातृ-पितृ पूजन कार्यक्रमात गावातील मारोती मंदिर परिसरात आई वडिलांना बसवून त्यांच्या मुला-मुलींना त्यांच्यासमोर बसवण्यात आले . त्यानंतर मुलांकडून त्यांच्या आई वडिलांचे पाय धुवून त्याचे पूजन करून फूल अर्पण करण्यात आले.त्यानंतर प्रत्येक मुला मुलींनी त्यांच्या आई वडिलांची ओवाळणी केली. नंतर आई वडिलांनी आपल्या लेकरांना मिठी मारून त्यांना आशीर्वाद दिले. यावेळी माता पित्याचे डोळे प्रेम भावनेने पाणावले होते. याचवेळी आईवडिलांचे महात्म्य दर्शवणारे संगीतमय गीत प्रस्तुत करण्यात आले. सरपंच संतोष पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली बालिका पंचायत राज समितीच्या वतीने सदरील कार्यक्रम पार पडला. सरपंच संतोष पाटील यांच्या नेतृत्वाखाली गावात विभिन्न उपक्रम राबविण्यात येतात. ज्याची दखल महाराष्ट्र पातळीवरच नव्हे तर देश पातळीवर घेतली गेली आहे. गावाचा विकास साधायचा असेल तर संस्कारक्षम पिढी घडली पाहिजे हा उदात्त हेतू लक्षात घेऊन भारतीय परंपरेनुसार वसंत पंचमी, रक्षाबंधन, रंगपंचमी, सहस्र दिप प्रज्वलन असे विभिन्न कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहेत. येरगीच्या इतिहासात पहिल्यांदाच मातृ-पितृ पूजन कार्यक्रम साजरा करण्यात आला. आईवडिलांविषयी आपल्या कर्तव्याची जाणीव ठेवणारी पिढी निश्चितच घडेल असा युक्तिवाद गावातील ज्येष्ठ नागरिकांनी केला. या कार्यक्रमाची स्तुती तालुक्यात होत आहे.

### अंश फर्टिलिटी अँड टेस्ट ट्युब बेबी सेंटरचा आज शुभारंभ

**नांदेड**-नांदेड शहरात पुणे, संभाजीनगर, नाशिक अत्याधुनीक सोईसुवीधा असलेले अंश फर्टिलिटी अँड टेस्ट ट्युब बेबी सेंटरचा शुभारंभ उद्या दि. २३ फेब्रुवारी रोजी शहरातील अण्णाभाऊ साठे चौक येथे सकाळी ११ वा. करण्यात येणार आहे. या सेंटरचा शुभारंभ जगद्गुरू भिमाशंकर लिंग शिवाचार्य यांच्या हस्ते होणार आहे. तसेच शिवानंद शिवाचार्य महाराज, विरूपाक्ष शिवाचार्य महाराज, सोमलिंग शिवाचार्य महाराज, दिगंबर शिवाचार्य महाराज, सिद्दयाळ शिवाचार्य महाराज, गुरूपादेश्वर शिवाचार्य महाराज, शिवलिंगय्या गुरू महाराज, महंत स्वामी व्यंकटेशाचार्य यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. तर कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी खा. अशोक चव्हाण हे राहणार आहे. या कार्यक्रमास उपस्थिती राहण्याचे आवाहन किशन बोमनाळे, डॉ. संतोष बोमनाळे, डॉ. राधाबाई बोमनाळे, डॉ. शिल्पा बोमनाळे यांनी केले आहे.



**उमरी**-छावा युवा संघटनेचे प्रदेशाध्यक्ष राजेश पाटील मोरे उमरी यांनी उमरी शहरातील दहावीच्या विद्यार्थ्यांना पेन चॅकलेट देवून स्वागत करूण यशस्वी भव म्हणून शुभेच्छा दिल्या आहेत. यावेळी छावा युवा संघटनेचे प्रदेशाध्यक्ष तथा शिवाय द् मेन्स् फॅशन्स् चे सर्वेसर्वा राजेश पाटील मोरे,भागवत पाटील मोरे,शरद पाटील जाधव,दत्ताहारी पाटील,राजु पाटील शिंगणगावकर आदीसह अनेक कार्यकर्ते व विद्यार्थी उपस्थित होते.

# जे माझ्यावर टीका करीत होते आता त्यांनीच पक्ष बदलला : आमदार चिखलीकर

**तभा वृत्तसेवा**
**नायगांव,दि. २२ फेब्रुवारी**

जे नेते नेहमीच अनेक वेळा वारंवार माझ्यावर टीका टिपणी करीत होते की मी पक्ष बदलणारा म्हणून पण आज तेच पक्ष बदलले आहे.परंतु मी अनेक पक्ष बदल लो तरी माझे सर्वांसोबत जिव्हाळ्याचे ऋणानुबंध पूर्वी पासूनच असल्यामुळे मी निवडून आलो,मी कसा पराभू त होईल हा आनंद त्यांना वाटत होता. पण मी सतत निवडून येत राहिलो हाआनंद माझ्यासह माझ्या स्नेहीचा आहे. शिवराज पाटील होटाळकर यांनी आयोजित केले ल्या राष्ट्रवादी पक्ष (अजित पवार गट) प्रवेश सोहळा व सभासद नोंदणी अभियान या कार्यक्रमात अशोकराव चव्हाण यांचे नाव न घेता आ.प्रताप पा. चिखलीकर यांनी निशाणा साधला आहे.



नायगांव शहरातील हेडगेवार चौक येथे राष्ट्रवादी (अजित पवार) गट पक्ष प्रवेश सोहळा,सभासद नोंदणी अभियान या आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आमदार.प्रताप पा. चिखलीकर यांच्यासह जिल्हाध्यक्ष दिलीपराव धर्माधिकारी बरबडेकर, विक्रम देशमुख, वसंत सुगावे, उत्तमराव सोनकांबळे,संभाजीराव मुकनर अँड.बाळासाहेब कांबळे, रणजीत पाटील हिवराळे, दिलीप पा.चोळाकेकर, तालुका अध्यक्ष धर्माबाद अंकुश हनुमंते,यादवराव तुडमे,ज्ञानेश्वर कदम, पाटील शिंदे तालुकाध्यक्ष नायगाव,ज्ञानेश्वर सुर्यवाड,विशाल पाटील शिंदे,सचिन पाटील बेंद्रीकर,आनंद पाटील पवार, यांची प्रमुख उपस्थिती होती. शिवराज पाटील होटाळकरांनी आपल्या प्रास्ताविकातून म्हणाले की, राष्ट्रवादी पक्ष हा राज्यातील सर्व सामान्य कार्यकर्त्यांना यांना बळ देणारा पक्ष म्हणून ओळखल्या जाते. भोकर येथे कार्यकर्त्यांचा खूप मोठ्या प्रमाणात नुकताच पक्ष प्रवेश सोहळा झाला आहे. नांदेड जिल्ह्यातील राष्ट्रवादी पक्ष हा आमदार चिखलीकर यांचा गट म्हणूनओळखला जाईल असे आपण २४ तासांपैकी १८ तास पक्षा साठी काम करू असेही यावेळी ते म्हणाले यासह जीवन चव्हाण , विक्रम देशमुख यांनीही या वेळी आपले मत व्यक्त केले.आमदार. चिखलीकर बोलताना पुढे म्हणाले की ,येत्या २८ तारखेला आ.मोहन हंबर्डे हे देखील राष्ट्र वादी पक्षात प्रवेश करणार आहेत, सत्यविना जमणारी मंडळी देखील आपल्या जिल्ह्यात आहे सिंचनाच्या प्रश्ना वर अनेकांनी प्रश्न केला याबाबत आपण एक शिष्टमंडळ ना.अजित पवार यांना भेटून याविषयी सखोल चर्चा घडवून आणूया असे सांगत ते पुढे म्हणाले. राष्ट्रवादी पक्ष हा शिव, लहू, फुले, शाहू आंबेडकर यांच्या विचारा धारेवर चालणारा पक्ष आहे म्हणून आपण जोमाने काम करूया तुम्ही माझी खूप तारीफ केली परंतु मी देखील तुमच्या सारखाच कार्यकर्ता आहे असेही ते म्हणाले, सदर कार्यक्रमांचे सूत्र संचालन व्यंकटराव पाटील शिंदे यांनी केले आहे तर यावेळी.

गंगाजी मुगांवकर, श्रीपत शिंद, प्रदीप पवळे, आनंदराव शिंदे, रमेश पवार, श्रीकांत शिंदे , विकास धुपेकर यासह तालुक्यातील महिला व पुरुष यांची मोठ्या संख्येने यावेळी उपस्थिती होती.

# 'स्वारातीम' विद्यापीठात 'दलित साहित्यावर' आंतरराष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**नवीन नांदेड ,दि. २२ फेब्रुवारी**

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासन व अभ्यास केंद्राच्या वतीने दि. २२ मार्च २०२५ रोजी 'दलित साहित्य: जागतिक परिप्रेक्ष्य' (DLIT LITER-TURE GLOBL PERSPECTIVE) आंतरराष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे.

या चर्चासत्रात देश-विदेशातील अभ्यासक मार्गदर्शन करणार आहेत. दलित किंवा आंबेडकरी साहित्य हा आधुनिक भारतीय साहित्यातील एक महत्त्वाचा साहित्यप्रवाह आहे. सामाजिक व वाङ्मयीन अशा दुहेरी विचारमंथनातून स्वातंत्र्योत्तर काळात ही संज्ञा पुढे आली. विशेषत्वाने १९६० नंतर ती विशेष चर्चाविषय ठरली. या चर्चासत्रात भारतीय दलित साहित्याच्या अनुषंगाने व्यापक चर्चा करण्यात येणार आहे. या चर्चासत्रात प्राध्यापक, संशोधक आणि विद्यार्थी सहभागी होवू शकतात. ज्यांना शोधनिबंध पाठवायचे आहेत. त्यांनी 'जागतिक परिप्रेक्ष्यात दलित साहित्य', 'भारतीय दलित साहित्य आणि डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे तत्त्वज्ञान', 'दलित साहित्यातील वैश्विकता', 'दलित साहित्य आत्मसन्मानाचा व्यापक लढा', 'इंग्रजी आणि विविध भारतीय भाषेतील दलित साहित्य', 'भारतीय दलित कविता', 'भारतीय दलित आत्मकथने', 'भारतीय दलित रंगभूमी', 'दलित साहित्याचे सौंदर्यशास्त्र', 'दलित साहित्याची सांस्कृतिक पार्श्वभूमी', 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि वाङ्मयीन मूल्यजाणिवा', 'सांस्कृतिक मूल्ये आणि दलित साहित्य', 'दलित साहित्य आणि सामाजिकपरिवर्तन'इत्यादी विषयावर drbabasahebambedkarchairgmail.com या ई-मेलवर दि. ५ मार्च, २०२५ पर्यंत शोधनिबंध पाठवावेत.

# कौठा परिसरात तरुणाची आत्महत्या

**तभा वृत्तसेवा**
**नवीन नांदेड,दि. २२ फेब्रुवारी**



दारूच्या नशेत कुठले तरी विषारी औषधी पिऊन एका ३६ वर्षीय व्यापाऱ्याने आत्महत्या केली ही घटना २२ फेब्रुवारी रोजी सकाळी नांदेडच्या कौठा परिसरातील मोदी ग्राउंड वर घडली.

लोहा तालुक्यातील निळा येथील मूळ रहिवासी असलेल्या रामदास बाबाराव मोरे यांचे भगतसिंग चौक असर्जन परिसरात सिमेंट व गजाळी विक्रीचा व्यवसाय आहे दरम्यान रामदास मोरे यांनी २२ फेब्रुवारी रोजी सकाळी दारूच्या नशेत कुठले तरी विषारी औषधी पिऊन कवठा परिसरातील मोदी ग्राउंड वर बेशुद्ध अवस्थेत पडल्याचे दिसून आले. दरम्यान त्यांना उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले असता वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासून सकाळी पावणेदहाच्या सुमारास मृत्यू घोषित केले. याप्रकरणी गंगाधर बाबाराव मोरे यांनी दिलेल्या माहितीवरून नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्यात आकस्मित मृत्यूची नोंद करण्यात आली आहे प्रभारी ठाणे प्रमुख सपोनी सचिन गडवे यांच्या मार्गदर्शनाखाली बीट हेड कॉन्सबल शेख जावेद हे या प्रकरणाचा अधिक तपास करीत आहेत.

# शेतकरी हिताच्या दृष्टीने काम करणाऱ्या कंपनी, संस्थांना नेहमीच सहकार्य आणि पाठबळ : आ.भीमराव केराम

**तभा वृत्तसेवा**
**किनवट,दि. २२ फेब्रुवारी**



केंद्र व राज्य सरकारचे शेतकरी धोरण व धान्यखरेदी उद्दिष्टाप्रमाणे किनवट माहूर सारख्या मागास,दुर्गम भागातील शेतकऱ्यांच्या उत्पादित शेतमालाला योग्य भाव मिळवून देण्याच्या दृष्टीने सारखणी फार्मर्स कंपनीने तूर खरेदी सुरू करून मोठा दिलासा दिला आहे. शेतकऱ्यांच्या हितासाठी काम करणाऱ्या अशा कंपन्यांना सहकार्य करून पाठबळ देण्याची माझी सुरुवातीपासूनची भूमिका राहिली आहे असे प्रतिपादन आमदार भीमराव केराम यांनी सारखणी येथे केले.

मागील सहा वर्षापासून कार्यान्वित असलेल्या सारखणी फार्मर्स कंपनीतर्फे आयोजित केलेल्या तूर खरेदीचा शुभारंभ आमदार भीमराव केराम यांच्या शुभहस्ते करण्यात आला त्याप्रसंगी ते बोलत होते.

या कार्यक्रमास भाजपनेते अनिल तिरमनवार,जिल्हा परिषदेचे माजी समाज कल्याण सभापती संजय राठोड, संदीप केंद्रे, दत्ता आडे, निरंजन केशवे, किनवट शिक्षण संस्थेचे अध्यक्ष ठाकूर साहेब, सूर्यभान सिडाम, समद फाजलानी, सीईओ मुसाखान कोपरेकर आदीची प्रामुख्याने उपस्थिती होती. पुढे बोलताना आ.केराम म्हणाले की किनवट-माहूर तालुक्यात १ लाख क्विंटलच्या आसपास सोयाबीन व तुरीचे उत्पादन होते परंतु आदिवासी महामंडळ वगळता अन्य खरेदी केंद्र नसल्यामुळे येथील शेतकऱ्यांना तेलंगाना राज्यात किंवा स्थानिक व्यापाऱ्यांना बेभावदराने धान्य विक्री करावी लागत असे परंतु शेतकऱ्यांची ही गैरसोय व आर्थिक भुर्दंड सारखणी फार्मर्स कंपनीने दूर केला आहे.

# महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचा दौरा

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. २२ फेब्रुवारी**



राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे हे नांदेड दौऱ्यावर येत असून त्यांचा दौरा कार्यक्रम पुढील प्रमाणे राहिल. रविवार दिनांक २३ फेब्रुवारी २०२५ रोजी नागपूर येथून विमानाने नांदेड विमानतळ येथे आगमन होणार आहे. त्यानंतर राज्यस्तरीय महसूल क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धा २०२५ च्या समारोपीय कार्यक्रमास उपस्थित राहणार आहेत. नंतर चंद्रशेखर बावनकुळे पुढील प्रवास नांदेड विमानतळ येथून विमानाने मुंबईकडे प्रयाण करतील.

# इरेगावच्या शेतकऱ्यांचा तलाठी बोधगीरे यांच्या विरूद्ध एल्गार

## तात्काळ कारवाई नझाल्यास आमरण उपोषणाचा इशारा

**तभा वृत्तसेवा**
**इस्लापूर,दि. २२ फेब्रुवारी**

इस्लापूर परिसरातील रिठ्ठा सज्जा चे तलाठी कर्तव्यात कसूर करूण सेवा देत आहेत. छोट्या मोठ्या व इतर सर्व कामासाठी शेतकऱ्यांकडून पैश्याची मागणी करूण शेतकऱ्यांस वेठीस धरून नाहक त्रास देत आहेत. म्हणून अश्या भ्रष्ट तलाठ्याची इथून उचलबांगडी करावी. अशी मागणी इरेगाव व रिठ्ठा सज्जा अंतर्गतच्या शेतकऱ्यांनी केली आहे.

तालूका दंडाधिकारी यांना दिलेल्या निवेदनात तक्रारदार शेतकऱ्यांनी म्हटले आहे की, रिठ्ठा तलाठी सज्जा येथे कर्तव्यावर असलेले तलाठी एम. के. बोधगीरे हे तलाठी सज्जा अंतर्गत गावांना भेटी देत नाहीत. इस्लापूर येथे असल्यावर दारू पिऊन मद्यधुंद असतात. व तसेच सन २०२२ ते २०२३ मध्ये अतिवृष्टी ग्रस्त मयत शेतकऱ्यांच्या कुटुंबांना आणी सामूहिक शेती असणाऱ्या शेतकऱ्यांना, भावभरक सोयाबीन व कापूस इत्यादी शासनाकडून मिळणाऱ्या अनूदानापासून वंचित ठेवण्यात आलेले आहे. सदरील तलाठी हे शेतीचा फेरफार करून घ्या मी तुम्हाला मार्गदर्शन करतो, मला पैसे द्या मी तहसील मधून अनूदान काढून देतो, तसेच मयताच्या शेती फेरफार करण्यासाठी ६ हजार रूपये वाटणी फेरफार करण्यासाठी १५ हजार रूपये, शेतकऱ्यांच्या सातबारावर आडनाव टाकण्यासाठी ५ हजार रूपयाची मागणी करतात. अनेक शेतकऱ्यांकडून पैसे घेतलेले आहेत. परंतू त्यांची कामे अद्यापपर्यंत झालेली नाहीत. अतिवृष्टी अनूदान यादीत नाव आणण्यासाठी पाचशे रूपये अशी मागणी लावून धरतात, अनेक शेतकऱ्यांकडून पैसे घेतले. परंतू साईड बंदच्या नावाखाली लाभधारक शेतकऱ्यांना झुलवत ठेवलेले आहे.साध्या साध्या कामांसाठी पैश्याची मागणी करूण शेतकऱ्यांना तलाठी महाशय त्रास देत आहेत. अश्या भ्रष्ट तलाठ्याची खातेनिहाय चौकशी करून त्यांचेवर कायदेशीर कारवाई करून, येथून तात्काळ उचलबांगडी करावी. अशी मागणी ज्ञानेश्वर शेळके, पांडुरंग मंदेवाड, बालाजी संभाजी, अरूणाबाई गायकवाड, श्रीराम गंटनवाड, रूक्माबाई मेटकर, गयाबाई मागीरवाड, देवराव मेटकर, दिगंबर बोईनवाड, सटवाजी मिराशे, विमलबाई फोले, गंगाधर बोईनवाड, संतोष उतनूरवाड, संतोष मागीरवाड, किशोर तोकलवाड, नारायण गंटनवाड, सुरेश शेळके, आत्माराम गायकवाड, आदींसह असंख्य शेतकऱ्यांनी केली असून, प्रशासनाकडुन उपरोक्त कारवाईस विलंब झाल्यास आमरण उपोषण करण्यात येईल. असा इशारा संतप्त शेतकऱ्यांनी दिला आहे.

सदरच्या निवेदनावर सहा ग्रामपंचायत विद्यमान सदस्य व गावातील गावकरी असे एकशे तीस गावकऱ्यांच्या सईचे निवेदन आमदार भीमराव केराम यांना सुद्धा देण्यात आलेले आहे.

# ई-केवायसी न केल्यास रेशन मिळणे होणार बंद :२८ फेब्रुवारी अंतिम तारीख

**तभा वृत्तसेवा**
**किनवट,दि. २२ फेब्रुवारी**

अन्नसुरक्षा योजनेअंतर्गत तालुक्यातील २०१ रेशन धान्य दुकानांमधून अंत्योदय व प्राधान्य कुटुंबातील लाभार्थ्यांना दरमहा अन्नधान्याचे वितरण केले जाते. ही प्रक्रिया पारदर्शकपणे पार पाडण्यासाठी ई-केवायसी करणे बंधनकारक आहे. तालुक्यातील अनेक लाभार्थ्यांनी अद्यापही ई-केवायसी केलेली नाहीत. जे पात्र लाभार्थी ई-केवायसी करून घेणार नाहीत, ते धान्यापासून वंचित राहू



शकतात. त्यामुळे २८ फेब्रुवारी ही ई-केवायसी करून घेण्याची शेवटची तारीख आहे. तालुक्यात अंत्योदय व प्राधान्य कुटुंबातील मोठ्या प्रमाणात लाभार्थी आहेत. या लाभार्थ्यांना सुरुवातीपासूनच ई-केवायसी करण्याच्या सूचना करण्यात आल्या आहेत. मंडळनिहाय शिबिराचे आयोजन करण्याच्या सूचनाही सर्व रेशन दुकानदारांना देण्यात आल्या. शिधापत्रिका आधार संलग्न केल्यानंतर संबंधित कार्डधारकाचा आधार क्रमांक अचूक आणि तोच आहे का? याची पडताळणी म्हणजे ई-केवायसी होय. पत्ता व ओळखीच्या दृष्टीने ई-केवायसी महत्त्वपूर्ण ठरणार आहे. सर्व शिधापत्रिकाधारकांनी २८ फेब्रुवारीपूर्वी आपली ई-केवायसी करून घ्यावी. अन्यथा त्यांचा धान्य पुरवठा बंद केला जाईल.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# शिवसेना शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभा

## केज तालुक्यातील साबला, धर्माळा ,उमरी येथील १०० के.व्ही. च्या ४ डीपी चे लोकार्पण

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२२ फेब्रुवारी**



शेतकऱ्यांसह वंचित घटकांच्या पाठीशी शिवसेना कायम खंबीरपणे उभी आहे. यामुळेच केज तालुक्यातील साबला, धर्माळा, उमरी येथील येथील शेतकऱ्यांचा वीज प्रश्न शिवसेनेच्या माध्यमांतून सोडवण्यात आला आहे. शिवसेनेचे मुख्य नेते तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली शिवसेना कायम शेतकऱ्यांच्या पाठीशी उभी असल्याचे प्रतिपादन शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक, स्वप्निल गलधर यांनी केले.

केज तालुक्यातील साबला, धर्माळा, उमरी येथील शेतकरी वारंवार खंडित होणाऱ्या २० पुरवठ्याने त्रस्त झाले होते. त्यामुळे या तीनही गावातील शेतकऱ्यांना पाणी प्रश्न मोठ्या प्रमाणात भेडसावत होता. परिणामी पाण्याअभावी पिके करपली जात होती. या तीनही गावातील शेतकऱ्यांनी शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांच्याशी संपर्क करून आपली व्यथा मांडली. जिल्हाप्रमुख मुळूक यांनी शिवसेना मुख्य नेते तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या माध्यमातून साबला, धर्माळा ,उमरी या गावांसाठी शंभर केव्ही जनित्राची मंजुरी घेतली. यामुळे शिवसेनेच्या माध्यमातून १०० k.v. चे धर्माळा गावात २ D.P. उमरी गावात १ D.P. साबला गावात १ D.P. चे लोकार्पण करून शेतकऱ्यांचा विजेचा प्रश्न मार्गी लावला. यावेळी जिल्हाप्रमुख सचिन भैय्या मुळूक, सहकारी जिल्हाप्रमुख स्वप्निल भैया गलधर, जिल्हा संघटक योगेश नवले ,केज तालुकाप्रमुख अण्णासाहेब पाटील, विधानसभा प्रमुख दादासाहेब ससाणे, सह तीनही गावातील प्रतिष्ठित नागरिक व शेतकरी याप्रसंगी उपस्थित होते. ग्रामस्थानी जिल्हाप्रमुख सचिन भैय्या मुळूक, सहकारी जिल्हाप्रमुख स्वप्निल भैया गलधर व शिवसेनेचे आभार मानले



### भाऊंनी केले ताईंच्या वाहनाचे सारथ्य....

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या नेत्या तथा संसदरत्न खासदार सुप्रियाताई सुळे मंगळवारी परळी वैजनाथ दौऱ्यावर आल्या होत्या. त्यांच्या आग्रहास्तव पक्षाचे नेते राजेभाऊ फड यांनी या संपूर्ण दौऱ्यात ताईंच्या वाहनाचे सारथ्य केले. हा विषय सर्वांसाठी आश्चर्याचा आणि लक्षवेधी ठरला.

# प्रदेश उपाध्यक्ष पदी प्रफुल्ल सहस्त्रबुद्धे

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२२ फेब्रुवारी**

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या बीड जिल्हा शाखेने जिल्ह्यातील तालुका पत्रकार संघाच्या अध्यक्षांच्या नियुक्त्या जाहीर केल्या आहेत.तसेच आष्टी येथील ज्येष्ठ पत्रकार प्रफुल्ल सहस्त्रबुद्धे यांची प्रदेश उपाध्यक्षपदी नियुक्ती केली आहे.इलेक्ट्रॉनिक मीडियाच्या बीड जिल्हाध्यक्ष पदी दीपक जाधव यांची तर बीड शहर पत्रकार संघाच्या अध्यक्ष पदी प्रतिक कांबळे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.सर्व नवनियुक्त तालुकाध्यक्ष यांनी तत्काळ नवीन सभासद नोंदणी करून तालुकास्तरीय उर्वरित कार्यकारिणी जाहीर करावी असेही कळवण्यात आले आहे.

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे आणि राज्य समन्वयक संतोष मानूरकर यांच्या नेतृत्वाखाली कार्यरत असलेल्या पत्रकार संघाचे बीड जिल्हाध्यक्ष बालाजी तोंडे आणि जिल्हाध्यक्ष शेख रिझवान यांनी जिल्ह्यातील नवीन तालुकाध्यक्षांची नियुक्ती जाहीर केली आहे.या मध्ये

बीड –धनंजय गुंदेकर
परळी – बालासाहेब फड
अंबाजोगाई – गोविंद महाराज केंद्रे
केज – दुर्गादास लांब
आष्टी – प्रविण पोकळे
धारूर –परमेश्वर राऊत
पाटोदा –महेश बेदरे
शिरूर –शहेबाज पठाण
माजलगाव –अंगद दराडे
गेवराई– राहुल लोंढे
वडवणी – दत्ता कराड यांचा समावेश आहे.तसेच बीड शहर अध्यक्ष पदी प्रतिक कांबळे यांची नियुक्ती करण्यात आली असून जिल्ह्यातील सर्व शहर अध्यक्षांची नियुक्ती करण्यासाठी त्यांना प्रभारी करण्यात आले आहे.त्याच प्रमाणे प्रदेश उपाध्यक्ष या रिक्त पदी आष्टी चे ज्येष्ठ पत्रकार प्रफुल्ल सहस्त्रबुद्धे यांची राज्य कार्यकारी समितीच्या मान्यतेने नियुक्ती करण्यात आली आहे.सर्व नवनियुक्त पदाधिकाऱ्यांनी आपल्या तालुक्यात आणि शहरात नवीन सभासद नोंदणी करून स्थानिक कार्यकारिणी जाहीर करावी असे जिल्हा संघाच्या वतीने सांगण्यात आले आहे.

## भारतीय बौध्द महासभेच्या पश्चिम बीड महिला जिल्हाध्यक्षपदी सर्वानुमते अरुणाताई व्ही.निसर्गन यांची निवड

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२२ फेब्रुवारी**



दि.१५ फेब्रुवारी २०२५ रोजी जिल्हा कार्यालय भारतीय बौध्द महासभा बस स्टॅण्ड जवळ बीड येथे केंद्रीय महिला उपप्रमुख आद.रागिनीताई पवार यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये आणि राज्याध्यक्षा आद.स्वातीताई शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली बीड जिल्हा पश्चिम महिला कार्यकर्त्यांची बैठक घेण्यात आली. बैठकीच्या सुरुवातीस रागिनीताई पवार, स्वातीताई शिंदे, माजी राष्ट्रीय संघटक व्ही.एन.निसर्गन, राज्य संरक्षण सचिव अमरसिंह ढाका आदी पदाधिकार्यांच्या हस्ते त.भगवान बुध्द आणि प.पू.डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करुन धुप–दीपाने पुजन झाल्यानंतर सामुहिक वंदना घेण्यात आली.

# श्री श्री रविशंकर विद्या मंदिर येथे शिवजयंतीचा कार्यक्रम



**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२२ फेब्रुवारी**

१९ फेब्रुवारी २०२५ या दिवशी श्री श्री रविशंकर विद्या मंदिर येथे शिवजयंतीचा कार्यक्रम साजरा करण्यात आला.कार्यक्रमाला शाळेचे अध्यक्ष पारगावकर सर सचिव, पाशा सर उपमुख्याध्यापिका अनिता सूर्यवंशी मॅडम यांच्यासह प्रमुख पाहुणे म्हणून वेदांत देशमुख उपस्थित होते.

या कार्यक्रमाची सुरुवात प्रतिमापूजनाने आणि शिवगर्जनेने झाली. शिवरायांचा पाळणा छोट्या गटातील विद्यार्थिनी वेदिका मगर ने सादर केला तर शिवगर्जना इयत्ता सातवीतील विद्यार्थिनी श्रावणी आणि वेदिका या दोघींनी सादर केली.छोट्या गटातील विद्यार्थ्यांनी शिवजयंती निमित्त, युगात मांडली या गाण्यावर नृत्य सादर केले. तसेच शिवजयंतीनिमित्त वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आली छोट्या गटातील विद्यार्थ्यांनी आणि मोठ्या गटातील विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट भाषणे सादर केली. शिवाजी महाराज यांचे चरित्र आपल्या शाळेतील शिक्षिका पूजा लांडे आणि दीप्ती जोशी यांनी विद्यार्थ्यांना सांगितले. तसेच वक्तृत्व स्पर्धेचे बक्षीस देखील मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांना देण्यात आले आणि शाळेमध्ये मॅथ्स डे निमित्त स्पर्धा घेण्यात आल्या होत्या, त्याचीही बक्षीस विद्यार्थ्यांना देण्यात आले त्याचप्रमाणे आपल्या शाळेत दरवर्षीप्रमाणे याही ओलंपियाड स्पर्धा घेतली होती. यामध्ये जी .के .आणि इंग्लिश ओलंपियाड यामध्ये विद्यार्थ्यांना मेडल आणि प्रमाणपत्र मान्यवरांच्या हस्ते देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाळेतील शिक्षिका सुषमा हावळे यांनी केले तर आभार प्रदर्शन विना मॅडम यांनी केले. शिवजयंती निमित्त मान्यवरांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या कार्यक्रमाला सर्व शिक्षक वृंद पालक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# खेळाडुंना प्रोत्साहन देण्यासाठी शिवसेना नेहमीच कटिबद्ध : सचिन मुळूक

## शिवजयंती निमित्त बीडमध्ये नाथ चषक प्रीमियर लीग चे शानदार उद्घाटन





**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२२ फेब्रुवारी**

जिल्ह्यातील खेळाडुंना प्रोत्साहन देण्यासाठी शिवसेना नेहमीच कटिबद्ध आहे. नाथ चषक बीड प्रीमियर लीग च्या माध्यमातून खेळाडूंना प्रोत्साहन देण्याचे काम शिवसेनेने केले आहे. यापुढेही दरवर्षी नाथ चषक बीड प्रीमियर लीग चे आयोजन करून खेळाडूंना वाव देण्याचे काम करण्यात येईल असे प्रतिपादन शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांनी केले.

बीड जिल्हा शिवसेनेच्या वतीने शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांच्या पुढाकारातून शिवजयंतीनिमित्त बीडमध्ये १९ ते २८ फेब्रुवारी या काळात नाथ चषक बीड प्रीमियर लीग क्रिकेट स्पर्धेचे आयोजन केले आहे. सी.पी. ग्राउंड पालवन चौक येथे या स्पर्धेचे उद्घाटन शिवजयंतीचे औचित्य साधून करण्यात आले. यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमास जिल्हाप्रमुख अनिल जगताप, स्वप्निल गलधर,योगेश नवले, संदीप आदमाने, रवी वाघमारे आदी उपस्थित होते. यावेळी जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांनी खेळाडूंना कुठलीही अडचण आली किंवा कोणत्याही प्रकारची मदत लागल्यास आपण नेहमीच तत्पर असू असा विश्वास त्यांनी खेळाडूंना दिला. या क्रिकेट स्पर्धेसाठी १२ संघांनी सहभाग नोंदवला आहे. विजेत्या संघासह सर्व खेळाडूंना शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांच्या वतीने भरघोस बक्षीस दिले जाणार आहे. यावेळी बीड शहरासह तालुक्यातील खेळाडू मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# राजर्षी शाहू कन्या विद्यालयात शिवजयंती उत्सवानिमित्त शालांतर्गत वकृत्व स्पर्धा











**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२२ फेब्रुवारी**

श्री छत्रपती राजर्षी शाहू समाज प्रबोधन मंडळ बीड संचलित, राजर्षी शाहू कन्या प्राथमिक व माध्यमिक विद्यालय व राजमाता इंग्लिश स्कूल तेलगाव रोड बीड यांच्या संयुक्त विद्यमाने, शिवजयंती उत्सवानिमित्त शालांतर्गत वकृत्व स्पर्धा, रांगोळी स्पर्धा व चित्र रंगभरण स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. सर्वप्रथम मान्यवरांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज व छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांच्या प्रतिमेस संस्थेचे सचिव प्रा.जे.पी शेळके, विद्यालयाच्या मुख्याध्यापिका कदम एस.डी, मुख्याध्यापक आर.टी. राऊत, प्राचार्या आर.डी. लोखंडे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका एस.डी.कदम यांनी केले. राजमाता इंग्लिश स्कूल मध्ये छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त चित्र रंगभरण स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेमध्ये प्रथम माहेनूर शेख, द्वितीय श्रेया ठोंबरे ,तृतीय आयुष पवार यांनी यश संपादन केले.या स्पर्धेचे परीक्षक म्हणून श्रीम. लोखंडे आर.डी.श्रीम. हिवरेकर पी.डी. यांनी पाहिले. तसेच छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त प्राथमिक विभागांमध्ये शालांतर्गत चित्र रंगभरण स्पर्धा व वकृत्व स्पर्धा छत्रपती शिवाजी महाराजांचे जीवन चरित्र या विषयावर आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेमध्ये गट तिसरी /चौथी प्रथम जाधव समृद्धी, द्वितीय वाघमारे समीक्षा,तृतीय पाचंग्रे माही ,उत्तेजनार्थ गालफाडे श्रावणी तसेच चित्र रंगभरण स्पर्धेमध्ये प्रथम कवडे अक्षता, द्वितीय कुरेशी मुस्कान, तृतीय शेख अल्फिया उत्तेजनार्थ भुरे समीक्षा या विद्यार्थिनींनी यश संपादन केले . स्पर्धेचे परीक्षक म्हणून श्रीम. कदम जी.डी ,श्रीम. सोनवणे एम. एस., श्रीम. रसाळ एस. आर.यांनी पाहिले. तसेच माध्यमिक शाळेमध्ये वकृत्व स्पर्धा व रांगोळी स्पर्धेचे आयोजन केले होते. या शालांतर्गत वक्तृत्व स्पर्धा 'रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज' विषयावर आयोजित केली होती यामध्ये ५ते ७ गटामध्ये प्रथम जाधव भक्ती, द्वितीय जगताप श्रावणी ,तृतीय पवार रोहिणी तसेच ८ते १० गटांमध्ये प्रथम डावकर राजनंदिनी, द्वितीय मस्कर आरती ,तृतीय गाडे अक्षरा यांनी यश संपादन केले . या स्पर्धेचे परीक्षण सहशिक्षक जगताप एस.सी, मातकर व्हि.डि, एम.एच. आगलावे यांनी पाहिले. तर रांगोळी स्पर्धेमध्ये ५ ते ७ गटांमध्ये प्रथम पवार आरुषी, द्वितीय शिंदे स्वानंदी,तृतीय ढवळे राजश्री तसेच ८ ते १० गटांमध्ये प्रथम जाधव अनुष्का, द्वितीय पवार वैष्णवी, तृतीय वैद्य दिव्या यांनी यश संपादन केले. या स्पर्धेचे परीक्षक म्हणून श्रीम. कदम एस.डी, श्रीम.लोखंडे आर. डी., मुंडे एल.आर यांनी पाहिले.

वरील सर्व स्पर्धेतील यशस्वी विद्यार्थिनींना सन्मान चिन्ह, प्रमाणपत्र, रोख रक्कम, देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तिडके डी. एल. यांनी केले तर आभार प्रदर्शन मुंडे एल.आर. यांनी केले. या कार्यक्रमास शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांच्यासह विद्यार्थिनीची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.


# २० लक्ष घरकुल लाभार्थ्यांना मंजूरी पत्राचे वितरण आणि १० लक्ष घरकुल लाभार्थ्यांना प्रथम हप्त्याचे वितरण -माजी मंत्री रावसाहेब दानवे

तभा वृत्तसेवा
जालना/प्रतिनिधी

मा.ना.श्री. अमित शहा, केंद्रीय गृहमंत्री, भारत सरकार यांच्या शुभहस्ते व मा.ना.श्री.देवेंद्रजी फडणवीस, मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे उप-स्थितीमध्ये प्रधानमंत्री आवास योजना- ग्रामीण टप्पा २ अंतर्गत २० लक्ष घरकुल लाभार्थ्यांना मंजूरी पत्राचे वितरण आणि १० लक्ष घरकुल लाभार्थ्यांना प्रथम हप्त्याचे वितरण समारंभाचे आयोजन करण्यात आले आहे अशी माहिती माजी मंत्री श्री.रावसाहेब पाटील दानवे यांनी एका पत्रकाद्वारे दिली आहे.

महा आवास अभियान २०२४-२५ अंतर्गत प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण टप्पा-२ मधील राज्यातील २० लाख लाभार्थ्यांना मंजूरी पत्र व किमान १० लाख लाभार्थ्यांना पहिला हप्ता वितरण कार्यक्रम दि. २२ फेब्रुवारी २०२५ रोजी सायंकाळी ४.३५ वाजता, मुख्य बॅडमिंटन हॉल, श्री शिव छत्रपती क्रिडा संकुल, म्हाळुंगे, बालेवाडी, पुणे येथे आयोजित करण्यात आला आहे.

या कार्यक्रमास मा. ना. श्री. एकनाथ शिंदे, उप मुख्यमंत्री (नगर विकास), मा. ना. श्री. अजित पवार, उप मुख्यमंत्री (अर्थ), मा. ना. चंद्रकांत पाटील मंत्री, उच्च व तंत्रशिक्षण, संसदीय कार्य, मा. ना. श्री. दत्तात्रय भरणे, मंत्री, क्रीडा व युवक कल्याण, मा. ना. श्री. मुरलीधर मोहोळ, केंद्रीय राज्यमंत्री, सहकार व नागरी विमान वाहतूक मंत्रालय, भारत सरकार, मा. ना. श्री. जयकुमार गोरे, मंत्री ग्रामविकास व पंचायतराज, मा. ना. डॉ. निलम गो-हे, उपसभापती, महाराष्ट्र विधान परिषद, मा. ना. श्री. योगेश कदम, राज्यमंत्री, ग्रामविकास व पंचायतराज, मा. ना. श्रीमती माधुरी मिसाळ, राज्यमंत्री, नगर विकास व सामाजिक न्याय, मा. श्रीमती सुजाता



सौनिक (भा.प्र.से) मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य व मा. श्री. एकनाथ डवले, प्रधानसचिव, ग्रामविकास व पंचायतराज विभाग उपस्थित राहणार आहेत.

या राज्यस्तरीय कार्यक्रमासाठी प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण टप्पा २ मधील पुणे जिल्ह्यातील सुमारे ६००० लाभार्थ्यांना आमंत्रित करण्यात आले असून राज्यस्तरीय कार्यक्रमात प्रातिनिधीक स्वरूपात लाभार्थ्यांना मंजूरी पत्र वितरण करण्यात येणार असून त्याबरोबरच प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण टप्पा-२ मधील राज्यातील १० लाख लाभार्थ्यांना एका क्लिकवर पहिला हप्ता वितरित करण्यात येणार आहे. मा. मंत्री, ग्राम विकास व पंचायत राज यांच्यामार्फत सर्व जिल्हयांचे मा. पालक मंत्री, सर्व तालुक्यांचे मा. आमदार, सर्व ग्राम पंचायतींचे सरपंच, ग्राम पंचायत अधिकारी व लाभार्थी यांना या कार्यक्रमामध्ये उत्साहाने सहभागी होण्यासाठी आमंत्रित करण्यात आले आहे. कार्यक्रमाच्या साधारणपणे दीड तास अगोदर राज्यातील सर्व जिल्ह-ास्तरांवर मा. पालकमंत्री यांचे अध्यक्षतेखाली ५०० लाभार्थी यांच्या उपस्थितीमध्ये कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे. या कार्यक्रमात घरकुल बांधकामाबाबत उपस्थित लाभार्थ्यांना प्रशिक्षण देण्यात येईल व लाभार्थी यांना मंजूरी पत्र वितरित करण्यात येणार आहे. तसेच सदर कार्यक्रमाच्या ठिकाणी राज्यस्तरीय कार्यक्रम पाहण्यासाठी छखउ च्या मदतीने तउ सुविधा उपलब्ध करण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत. या कार्यक्रमात घरकुल बांधकामाबाबत उपस्थित लाभार्थ्यांना प्रशिक्षण देण्यात येईल व या कार्यक्रमामध्ये लाभार्थी यांना मंजूरी पत्र वितरित करण्यात येणार आहे. सदर कार्यक्रमाच्या ठिकाणी राज्यस्तरावरील कार्यक्रम पाहण्यासाठी छखउ च्या मदतीने २ ुरू डर्ळींश डीशराळपस उपलब्ध आहे.

कार्यक्रमाच्या साधारणपणे दीड तास अगोदर ग्रामपंचायतस्तरावर संबंधित सरपंच यांचे अध्यक्षतेखाली ग्रामसभेचे आयोजन करून १०० लाभार्थी /लोकांच्या उपस्थितीमध्ये कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे. राज्यस्तरावरील कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण ग्रामपंचायतस्तरावर दिसण्यासाठी कार्यक्रमाच्या ठिकाणी स्क्रीन, एलसीडी प्रोजेक्टर व इंटरनेटची व्यवस्था करण्यात येत असून, जेणेकरून लाभार्थी व ग्रामस्थांना राज्यस्तरीय कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण पाहता येईल. या कामी ग्रामपंचायत/प्राथमिक शाळा/माध्यमिक शाळा/प्राथमिक आरोग्य केंद्र/इतर संस्था यांची मदत घेण्यात येत आहे. मंजुरी पत्र वितरण व हप्ता वितरण कार्यक्रमासाठी विस्तार अधिकारी व त्यापेक्षा वरिष्ठ स्तरावरील अधिकाऱ्याची प्रत्येक ग्रामपंचायतीसाठी निरीक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. नियुक्त निरीक्षक ह्यांनी ग्रामपातळीवरील सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, ग्रामपंचायत अधिकारी, तलाठी, कृषीसहाय्यक, मुख्याध्यापक, शिक्षक, अंगणवाडी सेवीका यांचे बरोबर संबंधीत लाभार्थी व त्यांचे कुटूंब यांच्या उपस्थितीचे नियोजन करत आहेत. ग्रामपंचायत स्तरावर ८४१० फुट साईजचा फ्लेक्स बोर्ड लावण्यात येत आहे. त्यामध्ये प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण टप्पा २ अंतर्गत मंजूर लाभार्थ्यांची नावे नमूद करण्यात येतील. (उदाः जिल्हा, तालुका, ग्रामपंचायतीचे नाव, लाभार्थ्यांचे नाव, मंजूरी वर्ष, लाभार्थ्याचा आवास खऊ). सर्व प्रथम प्रधानमंत्री आवास योजनेच्या विविध पैलू जसे की, घरकुल बांधकाम प्रगतीच्या टप्पा निहाय निधी वाटप प्रक्रिया, बांधकाम साहित्याची उप-लब्धता, घरकुल बांधकाम आराखडा, इ. बाबत लाभार्थ्यांना प्रशिक्षण देण्यात येईल. या कार्यक्रमात उपस्थित लाभार्थ्यांना मंजूरी पत्र वितरण करण्यात येईल. सदर कार्यक्रमास भारतीय जनता पार्टी च्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी उपस्थित राहावे असे आवाहन माजी मंत्री श्री.रावसाहेब पाटील दानवे यांनी केले आहे.

## संक्षिप्त

### दहावीचा मराठीचा पेपर फुटला नाही - जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ



तभा वृत्तसेवा
जालना/प्रतिनिधी

आज काही वृत्त वाहिन्यानी 'जालना जिल्ह्यातील बदनापूर शहरात दहावीचा मराठी विषयाचा पेपर फुटला' या आशयाचे चूकीचे वृत्त प्रसारित करण्यात आले आहे. परंतू प्रत्यक्षात असा कोण-ताही प्रकार घडलेला नसुन, स्थानिक झेरॉक्स दूकानदारांनी आजच्या मराठी विषयाच्या प्रश्न पत्रिकेत न आलेल्या प्रश्नांची झेरॉक्स काढून विक्री केली आहे. प्रश्न पत्रिका परिक्षा केंद्राच्या बाहेर आलेली नाही. जिपचे शिक्षणाधिकारी (माध्यमिक), तहसिलदार आणि पोलिस निरिक्षक यांच्या मार्फत तपासणी करण्यात आली आहे. तथापी याठिकाणी दगडफेक झाली. याबाबत दोषीं व्यक्तीचा शोध घेवून कायदेशीर कार्यवाही सुरु असल्याची माहिती दिली असल्याचे जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी कळविले आहे.

### लोकमान्य सार्वजनिक वाचनालयात शिवजयंती उत्साहात साजरी



तभा वृत्तसेवा
भोकरदन/प्रतिनिधी

लोकमान्य सार्वजनिक वाचनालय भोकरदन येथे छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

यावेळी लोकमान्य सार्वजनिक वाचनालय आयोजित जिजाऊ-सावित्री जयंती सांस्कृतिक सप्ताह २०२५ अंतर्गत झालेल्या रंगभरण व चित्रकला स्पर्धेचे बक्षीस वितरण करण्यात आले.

यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष संस्थेच्या सहसचिव श्रीमती सुशीला खरात होत्या. तर प्रमुख अतिथी म्हणून मराठी पत्रकार संघाचे जिल्हा कार्यकारिणी सदस्य गणेश औटी, तालुका पत्रकार संघटनेचे अध्यक्ष शेख इरफान, उपाध्यक्ष कमलकिशोर जोगदंडे, कार्याध्यक्ष प्रा.संजय पैठणकर, कार्यकारिणी सदस्य सलीम शेख, ज्येष्ठ पत्रकार नानासाहेब वानखेडे आदीसह लोकमान्य सार्वजनिक वाचनालयाचे अध्यक्ष विनायक औटी, उपाध्यक्ष प्राचार्य प्रकाश वाघ, कोषाध्यक्ष विजय धोंगडे आदी मान्यवर उपस्थित होते. तत्पूर्वी सर्व मान्यवरांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अर्धाकृती पुतळ्यास पुष्पहार घालून अभिवादन करून जयंती साजरी करण्यात आली. याप्रसंगी रंगभरण व चित्रकला स्पर्धेच्या तिन्ही गटातील सर्व विजेत्या स्पर्धकांना अनुक्रमे प्रथम क्रमांक मिळवलेल्या स्पर्धकास रुपये १५०१/-, स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र, द्वितीय क्रमांक मिळविलेल्या स्पर्धकास रुपये १००१/- स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र तसेच तृतीय क्रमांक मिळवलेल्या स्पर्धकास रुपये ५०१/- स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र वाटप करण्यात आले.या स्पर्धेचे बाह्यपरीक्षक म्हणून उत्कृष्ट चित्रकार सुभाष पवार, अश्विनी औटी, अदिती देशमुख यांनी काम पाहिले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संस्थेचे सचिव नंदकिशोर देशमुख यांनी केले. सूत्रसंचलन रमेश गिराम यांनी केले तर आभार प्रदर्शन संस्थेचे संचालक कैलास पवार यांनी केले. यावेळी शिक्षक संघटनेचे नेते भगवान देठे, विजय साबळे, सुदेश थारेवाल, संदीप शर्मा, रामेश्वर सहाने, बी.टी.सपकाळ, कापुरे आदी सह विजेत्या स्पर्धकांचे पालक उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संस्थेचे संचालक चंद्रशेखर देशमुख, ग्रंथपाल कैलास साबळे, पूजा पवार आदींनी परिश्रम घेतले.

# तहसीलदार सुट्टीवर वाळू चोर नदीपात्रात

## कानडी येथे ११ टेम्पो दोन जेसीबी पकडले मात्र कारवाई केव्हा? पथक भूमीगत

तभा वृत्तसेवा
तळणी/प्रतिनिधी

सपूर्ण तळणी परीसराची जीवनदाईनी असलेल्या पूर्णा नदीचे लचके तोडण्यात येत आहे. सपूर्ण पूर्णा नदी पात्रातून वाळू चोर मोठ्या प्रमाणात वाळू चोरी करत आहेत यामुळे शासनाच्या लाखो रुपयाचा महसुल ला चुना लावण्या बरोबर पर्यावरणाचे मोठ्या प्रमाणात ऱ्हास होत आहे. गेल्या एक महिन्या पासून कारवाया पूर्णपणे थांबल्या आहेत.

मंठा तहसीलदार सोनाली जोंधळे या काही दिवसापासून रजेवर गेल्या असल्याने वाळू चोरांना मोकळे रान मिळाले आहे. पूर्णा नदी काठावरील प्रत्येक ग्रामपंचायतच्या हद्दीतून रोज दिवस रात्र शेकडो ब्रास वाळू उपसा होत आहे.

अवैध वाळू उत्खनन करण्यासाठी अनेक शेतातून खाजगी रस्ते तयार करण्यात आलेले आहेत. या शेत रस्त्यातून हजारो ब्रास वाळू



ची चोरी झाली तरी सुद्धा या शेत रस्त्यावर महसुल व पोलीस प्रशासनाकडून अद्याप पर्यन्त कुठलीच कारवाई का करण्यात आली नाही. मागील महिन्यात कानडी येथे उपविभागीय अधिकारी यांच्या पथकाने कानडी येथील पूर्णा नदी पात्रातून अवैध वाळू भरण्याच्या उद्देश्याने आलेल्या ११ टेम्पो व दोन जेसीबी च्या क्रमाकांची नोद केली होती याच अनुषंगाने उपविभागी अधिकार्यानी तहसीलदार व पोलीस निरीक्षक यांना कारवाई करण्यासाठी पत्राद्वारे विचारणा केली आहे. परंतू अद्याप पर्यन्त कुठलीच कारवाई या प्रकरणात झाली नाही. सध्या मंठा तहसी-लदार सोनाली जोंधळे या सुट्टीवर आहेत यामुळे वाळू चोरी जोरात सुरू आहे दिवसा सुद्धा अवैध वाळू वाहतूक व उपसा सुरु आहे कारवाया पूर्णतः बंद झाल्या असून नियुक्त केलेले पथक विविध कारणे सांगून भूमीगत राहण्याचेच पसंत करत आहेत. केधळे पोखरी, वझर सरकटे , वाघाळा, किर्ला, भूवन टाकळखोपा, कानडी, देवठाणा, उस्वद खोरवड ही गावे अवैध वाळू उपश्याचे केंद्र बनले आहे. कानडी येथे पथकाच्या मार्फत केलेल्या कारवाई सदर्भातील ११ टेम्पो व दोन जेसीबी चालकांच्या मालकाची नावे समजावी म्हणून आर टी ओ ना पत्र दिली आहे या सदर्भात निश्चित कारवाई होणारच अशी माहिती प्रभारी तहसीलदार कल्याण काळदाते यांनी दिली.

# जि.प.प्रा.शाळा पिंप्रुळा वार्षिक स्नेहसंमेलन व शिवजयंती साजरी



तभा वृत्तसेवा
परतूर/प्रतिनिधी

पिंप्रुळा शाळेमध्ये संपन्न झालेल्या स्नेहसंमेलन कार्यक्रमाचे कौतुक करावे तेवढे कमीच आहे.अवघी ४० विद्यार्थी संख्या असलेली द्वि शिक्षकी शाळा असून सुद्धा एवढा जबरदस्त परफॉर्मन्स विद्यार्थ्यांनी सादर केलेला महाराष्ट्राच्या संस्कृतीचे दर्शन कार्यक्रमाच्या माध्यमातून दिसून आले शिक्षकांनी घेतलेली मेहनत व सुंदर असं नियोजन शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली गावातील नवयुवक पालकांनी केले. सर्वांच्या सहकार्याने पाहुण्यांच्या उपस्थितीने बहारदार असा संपूर्ण कौतुकास्पद कार्यक्रम संपन्न झाला. तर कार्यक्रमाचे उद्घाटक श्री. कैलास इंगळे सरपंच पिंप्रुळा व श्री.शाम गाडगे उपसरपंच पिंप्रुळा, कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री.अनिल गाडगे शाळा व्यवस्थापन समिती पिंप्रुळा शाळेचे अध्यक्ष, प्रमुख पाहुणे श्री. संतोष साबळे गट शिक्षण अधिकारी परतुर, श्री कल्याणराव बागल गट समनव्यक परतूर, श्री.शंकरराव थोटे सर श्रीष्टी केंद्रप्रमुख, श्री. पांडुरंग नवल प्राध्यापक विवेकानंद महाविद्यालय मंठा, श्री. शिव-ाजीराव गाडेकर मुख्याध्यापक यनोरा, श्री. शिवाजीराव खंडागळे मुख्यध्यापक श्रीष्टी, व श्री. दत्ता काशीद सर माजी मुख्याध्यापक पिंप्रुळश्र व सर्व मुख्याध्यापक व शिक्षक व तसेच आजी माजी शाळा व्यवस्थापन समिती व सर्व ग्रामपंचायत सदस्य व सर्व गावकरी मंडळी मोठ्या संख्येने हनुमान मंदिर पिंप्रुळा गाव या ठिकाणी उपस्थित होते. वार्षिक स्नेहसंमेलन २०२५ उत्कृष्ट सादरीकरण केल्यामुळे मुख्याध्यापक श्री सुरनर सर व श्री माने सर यांचे कौतुक होत आहे.

# मंठ्यात दहावीच्या मराठीच्या पेपरला कॉफी पूरवा अभियाची परंपरा कायम

## बाहेरून पोलिसांचा बंदोबस्त; केंद्र परीक्षा केंद्र अंतर्गत पुरवली जाते कॉफी

तभा वृत्तसेवा
मंठा/प्रतिनिधी

मंठा शहरातील दहावीच्या परीक्षेला शुक्रवारपासून सुरुवात झाली आहे. या परीक्षा केंद्रावर बाहेरून सन्नाटा. केंद्रात मात्र मात्र कॉफ्यांचा बाजार पाहायला मिळाला. मंठा शहरातील देवी रोडवरील रेणुका विद्यालय विद्या मंदिर व व जुन्या हेलस रोडवरील छत्रपती संभाजीराजे महा विद्यालयात शिक्षक व कर्मचाऱ्याकडून साळेअंतर्गत कॉफी पुरली जात आहे. याकडे बैठे पथक देखील दुर्लक्ष करीत असल्याचे दिसून येत आहे. यामुळे हुशार विद्यार्थ्यांच्या मनावर याचा परिणाम होत असून त्यांच्या अभ्यासाचा काहीच



अर्थ राहिलेला दिसून येत नाही. पोलीस प्रशासनाकडून बाहेरील कडे कोट बंदोबस्त करण्यात येत आहे. तसेच परीक्षा केंद्राबाहेर विनाकारण फिरणाऱ्या व कॉफी देण्याच्या उद्देशाने जाणाऱ्या बारा जणांवर मंठा पोलीस निरीक्षक यांच्या पथकाकडून कारवाई देखील करण्यात आली. परंतु कुंपणच शेत खात असेल तर यावर कोण कारवाई करणार असा देखील प्रश्न पालक व हुशार विद्यार्थ्यांकडून होत आहे.या प्रकाराकडे जिल्हाधिकारी जिल्हा शिक्षणाधिकारी याचबरोबर शिक्षण मंत्री यांनी देखील गांभीर्याने लक्ष घालण्याची मागणी होत आहे.

# छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्साहात साजरी

तभा वृत्तसेवा
जाफराबाद/प्रतिनिधी

जाफराबाद तालुक्यातील मंगरूळ येथे शिवराजे मित्र मंडळ यांच्या वतीने शिवजयंती उत्सव सोहळा मोठ्या थाटामाटात साजरा करण्यात आला असून या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी अमजद सेठ पठाण होते. छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीच्या निमित्ताने छोटे छोटे चिमुकल्या मुलांनी आपले भाषण कौशल्य नृत्य स्पर्धाही आयोजित केल्या होत्या त्यामध्ये छोट्या मुलांनी आपले छानसे कौशल्य त्या ठिकाणी दाखविले असून मंगरूळ येथे छत्रपती फुले शाहू आंबेडकर विचारांचा वारसा जपणारी ही शिवजयंती सर्व जाती धर्मांच्या लोकांनी मोठ्याने हिरहिरीने साजरी केली. यावेळी अध्यक्ष स्थानि अस-लेले अमजद सेठ पठाण यांनी बोलताना छत्रपती शिवाजी महाराजांनी सर्वसामान्य रयतेला आपलं राज्य कसं वाटेल यासाठी काम केलं. शेतकरी सुखी तर रयत सुखी रयत सुखी तर राजा सुखी असे हे लोक कल्याणकारी राजे होते. छत्रपती शिवाजी महाराजांवर ची निष्ठा स्वराज्यातील मावळ्यांची कायम होती. या कार्यक्रमांमध्ये उपस्थित पोलीस पाटील देविदास पाटील गवते, ज्ञानेश्वर पाटील शिंदे, कृष्णा पाटील पवार,



नितीन पाटील शिवणकर, श्रीहरी डोके, प्रल्हाद डोके, केशव गवते, शेषराव पाटील डोके, भाऊसाहेब पाटील गवते फारूक शेठ , तंटामुक्ती अध्यक्ष शेख सलीम, पंडित बोर्डे,ज्ञानेश्वर गवते, शिवाजी गवते, सुधाकर पिंपळे, विष्णू डोके, दादाराव डोके, शेषराव डोके, समाधान गवते, पद्माकर महाराज पिंपळे, पुरुष-ोत्तम महाराज शिंदे, गणेश नाथ धारकर, गोरखनाथ धारकर, चेतन शिंदे, नंदकिशोर शिवणकर, करण डोके,ऋषिकेश पवार, विकास वाघ, त्यांच्यासह शिवराजे मित्र मंडळ मंगरूळचे ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विजय पाटील गवते यांनी केले.

## कितर्पुर येथे ३ कोटी रुपयांचा रस्ता तर २ कोटी रुपयांच्या पुलाचे लोकार्पण

# मंदिराच्या अर्थव्यवस्थेमुळे सर्वसामान्यांच्या आर्थिक विकासाला चालना -आमदार बबनराव लोणीकर

तभा वृत्तसेवा
मंठा/प्रतिनिधी

समृद्ध आणि वैविध्यपूर्ण इतिहास अस-लेला भारत एकेकाळी आध्यात्मिक आणि भौतिकदृष्ट्या समृद्धीचे प्रतीक होता. काळाच्या ओघात भारतातील मंदिरांच्या बहुआयामी भूमिकेचा शोध घेतला गेला आणि केवळ धार्मिक संस्था असण्यापलीकडे त्यांचे महत्त्व असल्याचे स्पष्ट झाले. मंदिरे केवळ उपासनेची केंद्रे नाहीत तर राष्ट्राच्या सामाजिक-आर्थिक-राजकीय परिदृश्याला आकार देणारे महत्त्वाचे घटक देखील आहेत. मंदिरे ही प्रार्थनास्थळे म्हणून काम करत होती आणि आहेत परंतु त्यापेक्षा जास्त आध्यात्मिक विकासाला चालना देतात. मंदिरे ही शिक्षणाची केंद्रे होती, साधक आणि विद्वान दोघांनाही आध्यात्मिक शिक्षण देत असत. धर्मग्रंथांचा अभ्यास केला जात असे आणि तात्विक चर्चा



भरभराटीला येत असत, ज्यामुळे समाजाच्या बौद्धिक समृद्धतेत भर पडत होती, असे प्रतिपादन माजी मंत्री आमदार श्री बबनराव लोणीकर यांनी आज केले.

मंठा तालुक्यातील किर्तापुर येथे श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर कलशारोहण कार्यक्रम तसेच ३ कोटी रुपयांचा डांबरी व सिमेंट कॉंक्रिटीकरण रस्ता व २ कोटी रुपयांच्या मलाच्या लोकार्पण कार्यक्रम प्रसंगी आमदार लोणीकर बोलत होते.

पूढे बोलताना श्री लोणीकर म्हणाले की, भजन आणि कीर्तनाच्या स्वरूपात भक्ती संगीत मंदिराच्या परिसरातून प्रतिध्वनीत झाले. या सांस्कृतिक अभिव्यक्तींनी केवळ आध्यात्मिक अनुभव अधिकच गहन केला नाही तर सामुदायिक बंधनातही भूमिका बजावली. मंदिरे सामुदायिक मेळाव्यांसाठी केंद्रबिंदू म्हणून काम करत असत, एकता आणि सामायिक ओळखीची भावना वाढवत असत. अनेक मंदिरांकडे शेतीसह मोठ्या जमिनी होत्या. त्यातून मिळणारे उत्पन्न मंदिराच्या व परिसरातील अत्यावश्यक बाबींच्या आर्थिक कल्याणाला चालना देत असे. मंदिरांच्या बांधकाम आणि देखभालीमुळे कुशल आणि अकुशल कामगारांच्या विस्तृत श्रेणीसाठी रोजग-ाराच्या संधी निर्माण होतात, ज्यामुळे स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना मिळते.आध्यात्मिक पर्यटनामुळे निवास, भोजन आणि धार्मिक भेटवस्तूंवर पैसे खर्च करणाऱ्या पर्यटकांना आकर्षित करून आर्थिक विकास होतो, ज्यामुळे स्थानिक अर्थव्यवस्थांना चालना मिळते. यामुळे पर्यटनाशी संबंधित क्षेत्रात नोकरीच्या संधी निर्माण होतात आणि विविध समुदायांमध्ये सांस्कृतिक देव-ाणघेवाण आणि समजूतदारपणा वाढतो, ज्यामुळे शाश्वत विकासाला हातभार लागतो. असेही आमदार बबनराव लोणीकर यावेळी म्हणाले.

माजीमंत्री आमदार श्री बबनराव लोणीकर यांच्या विशेष प्रयत्नातून किर्तापूर येथे ३ कोटी रुपयांचा डांबरीकरण व सिमेंट कॉंक्रीट रस्त्याचे तर २ कोटी रुपयांच्या पुलाचे लोकार्पण देखील लोणीकरांच्या हस्त करण्यात आले. स्वातंत्र्याचा ७० वर्षानंतर देखील गावासाठी डांबरीकरण रस्ता नव्हता तो आमदार बबनराव लोणीकर यच्या माध्यमातून मिळाला त्याचप्रमाणे गावाजवळच्या नदीवर मोठा पूल मागील अनेक दिवसांपासून मागणी असताना पूर्ण होऊ शकला नाही ती मागणी आमदार बबनराव लोणीकर यांनी ६ महिन्यात पूर्ण केले अशी भावना यावेळी गावकऱ्यांनी व्यक्त केली. यावेळी हभप बबन महाराज हंडीकर, भाजपा तालुकाध्यक्ष सतीश राव निर्वळ विठ्ठलराव काळे कैलास बोराडे पांडुरंग काळे सरपंच भागवत पोटे उपसरपंच विजयी घारे सरपंच बाबाजी जाधव

# शिक्षण विभागाचा शिक्षकांवरच भरोसा नाय काय?

## केंद्रसंचालक,पर्यवेक्षक बदली मुळे सर्वत्र नाराजी, --जिल्ह्यात ४२ केंद्रांची अदलाबदली

**मोहन धारासूरकर**

**परभणी ,/प्रतिनिधी-:** दि २१ फेब्रुवारी पासून सुरू होत असलेल्या दहावीच्या परीक्षेचे नियोजन प्रशासनाकडून सुरू झाले आहे.यामध्ये कॉप्यांना आला घालण्यासाठी अनेक ठिकाणी केंद्रसंचालक व पर्यवेक्षक बदली करण्यात आले आहेत.परंतु यामध्ये अनेक शाळा या किरकोळ प्रकार किंवा काही गोंधळ नसतांनाही केंद्रसंचालक व पर्यवेक्षक बदलण्यात आल्याने शिक्षकांसह मुख्याध्यापकांमधून नाराजी व्यक्त करण्यात येत आहे. शिक्षण विभागाचा शिक्षकांवरच भरोसा नाय काय? असे म्हणण्याची वेळ आली आहे. राज्यभरात कॉपी मुक्त परीक्षा अभियान राबवले जात आहे.परंतु यामध्ये शिक्षक व मुख्याध्यापक भरडले जात असल्याचे चित्र आहे.सेलू तालुक्यात शहरी भागात अतिशय कडकपणे परीक्षा घेण्यात येतात.परंतु छोट्या छोट्या कारणांचा आधार घेऊन केंद्रसंचालक व पर्यवेक्षक बदलले जात आहेत.कारण कोणताही शिक्षक कॉप्यांना प्रोत्साहन देऊ शकत नाही.त्यातच ज्या केंद्रावर अनेकवेळा कॉप्याचे प्रकार घडलेत अशा केंद्रावर बदल करणे संयुक्तिक आहे.परंतु क्षुल्लक कारणावरून केंद्रसंचालक बदलणे यामुळे नाराजी पसरत आहे. कमीतकमी केंद्रसंचालक तरी त्या त्या शाळेवर ठेवणे आवश्यक आहे.कारण केंद्रसंचालक बदलल्यास नवीन शाळेतील भौतिक सुविधा,सुरक्षा व्यवस्था याची माहिती नसते.यामुळे केंद्रसंचालकांना त्रास होण्याची शक्यता आहे.अतिशय कडकपणे परीक्षा घेत आहोत असा अविर्भाव आणत असतांना मुख्याध्यापकांच्या समोर येणाऱ्या समस्यांचा विचार त्र केलेला दिसत नाही.परीक्षा काळात केंद्रसंचालक,पर्यवेक्षक बदल्यांच्या निर्णयाला शिक्षक संघटनांनी देखील विरोध केला परंतु प्रशासनाने त्र आपलाच होरा कायम ठेवल्याने नाराजी पसरत . आज दि १५ फेब्रुवारी रोजी दहावीच्या परीक्षेचे साहित्य वाटपासाठी येथील शिवाजी महाविद्यालयात झालेल्या केंद्रसंचालकांच्या बैठकीत शिक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांसह बोर्डाचे अधिकारी सुद्धा उपस्थित होते.या बैठकीत देखील काहींनी आपली समस्या मांडली.परंतु बोर्डाच्या अधिकाऱ्यांनी थेट मुख्यमंत्र्यांच्या आदेशाचा व राज्य मंडळाच्या आदेशांचा संदर्भ देत केंद्रसंचालकांना कडक सूचना केल्या.तसेच प्रेमाने सांगण्याऐवजी कारवाईचेच जास्त उदाहरणे दिले.तसेच केंद्रसंचालकांच्या कुठल्याही तक्रारी एकूण घेतल्या जाणार नसून संबंधित केंद्राची सर्व जबाबदारी केंद्रसंचालकांची असल्याच्या सूचना दिल्या. परभणी जिल्ह्यात एकूण ४२ केंद्राचे केंद्रसंचालक व पर्यवेक्षक बदलण्यात आले .

**ससाणेंच्या बोलण्यात टी एन शेषन यांचा उल्लेख या बैठकीत केंद्रसंचालकांना सूचना देतांना कडक अधिकारी म्हणून प्रसिद्ध असलेले योजना शिक्षणाधिकारी संजय ससाणे यांनी आपल्या बोलण्यात ३ ते ४ वेळा दिवंगत निवडणूक आयुक्त टी एन शेषन यांच्या कार्यपद्धतीचा व नावाचा उल्लेख केला.टी एन शेषन यांनी जसे कडकपणे काम केले तसे काम केंद्रसंचालकांनी करावे असेही त्यांनी सांगितले.तसेच कायद्यातील सूचनांची उजळणी करून केंद्रसंचालकांनी जबाबदारीने काम करण्याच्या सूचना दिल्या.**

## संक्षिप्त वृत्त...

### खून,जबरी चोरी करणारे दोघे पोलिसांच्या ताब्यात, आरोपीची कबुली

**परभणी,/प्रतिनिधी :** पूर्णा तालुक्यातील ताडकळस व चुडावा पोलिस स्टेशन अंतर्गत खून व जबरी चोरी करणाऱ्या दोघा कुख्यात आरोपींना स्थानिक गुन्हा शाखेच्या पथकाने सापळा रचून मोठ्या शिताफीने ताब्यात घेतले.

ताडकळस पोलिस स्टेशन अंतर्गत गुन्ह्यातील फरार आरोपी हा त्याचे साथीदारासह गंगाखेड येथे येणार असल्याची माहिती शनिवार १५ फेब्रुवारी रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकास मिळाली. त्या माहितीच्या आधारे या पथकाने गंगाखेड येथील तहसील कार्यालयासमोर सापळ लावून आरोपी मुंजा तुकाराम कहाते (वय २१ वर्षे, रा. पिंप्री देशमुख ता.जि. परभणी) व त्याचा साथीदार केशव बाबुराव जरतारे (वय २० वर्षे, रा. मुघट, ता. मुदखेड जि. नांदेड) या दोघांना मोठ्या शिताफीने ताब्यात घेतले. या आरोपीतांना विश्वासत घेवून विचारपूस केली असता त्यांनी ताडकळस व चुडावा पोलिस स्टेशन अंतर्गत त्यांचा साथीदार अजिंक्य जगताप यांच्यासह गुन्हे केल्याचे कबूल केले. पुढील कारवाईसाठी त्यांना चुडावा पोलिस स्टेशन येथे हजर करण्यात आले. या प्रकरणी पुढील तपास पूर्णेचे उपविभागीय पोलिस अधिकारी समाधान ट हे करीत .

, जिल्हा पोलिस अधिक्षक रविंद्रसिंह परदेशी यांच्या मार्गदर्शनाखाली व अप्पर पोलिस अधिक्षक यशवंत काळे यांच्या नेतृत्वात स्थानिक गुन्हा शाखेचे पोलिस निरीक्षक विवेकानंद ट यांच्या पथकातील सपोनि भारती, पोउपनि वाघमारे, पोउपनि चंदनसिंह परिहार, पोलिस अंमलदार रंगनाथ दुधाटे, सचिन भदर्गे, विलास सातपुते, लक्ष्मण कांगणे, राहुल परसोड, सिध्देश्वर चाटे, हनुमान ढगे, राम पौळ, नामदेव डुबे, परसराम गायकवाड, दिलीप निलपत्रेवार, उत्तम हनवते, संजय घुगे व सायबर सेलचे गणेश कौटकर, बालाजी रेड्डी यांनी ही कारवाई केली.

### वंचित बहूजन युवा आघाडीचे मनपाला साकडे- प्रभाग क्रं.११ मध्ये सुविधा द्या

**परभणी,/प्रतिनिधी :** महानगरपालिका अंतर्गत प्रभाग क्रमांक ११ मधील विविध नागरी समस्या तात्काळ सोडवाव्यात, अशी मागणी वंचित बहुजन युवा आघाडीने महापालिका प्रशासनास सादर केलेल्या निवेदनाद्वारे केली .

युवा जिल्हाध्यक्ष गणेश गाढे, युवा जिल्हाउपाध्यक्ष मुजफ्फर खान, परभणी तालुकाध्यक्ष प्रमोद अशोकराव अंभोरे, (उत्तर विभाग) युवा जिल्हा कोषाध्यक्ष मिलिंद खंदारे, शेख अजहर, दीपक आनंदा, सय्यद जुनेद, मजर खान, अली यार खान आदींनी सोमवार १७ फेब्रुवारी रोजी महापालिका प्रशासनास आपल्या मागणी संदर्भातील निवेदन सादर केले. त्याद्वारे, शहरातील कायम दुर्लक्षित असलेला प्रभाग क्रमांक ११ मधील अब्दुल रहीम नगर, गाजिबा तूराबूल हक नगर, जमजम कॉलनी, हाजी अहमद कॉलनी या नगरामधील रस्त्यांची व नाल्यांची अत्यंत दुरावस्था झालेली . त्याचबरोबर विविध वस्त्यांमध्ये अजूनही पक्के रस्ते व नाल्या बनविण्यात आल्या नाहीत. परिणामी येथील नागरिकांना दैनंदिन जीवनात अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत . त्यामुळे या समस्या लवकरात लवकर सोडवाव्यात, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली .

### मुंबईत ५ मार्च रोजी मांगवीर महामोर्चा- मोर्चाच्या तयारीसाठी नांदेडात बैठक संपन्न

**परभणी,/प्रतिनिधी :** 'न्यायमूर्ती अनंत बद्दर समितीचा अहवाल तात्काळ सादर करून त्यावर सरकारने निर्णय घ्यावा' या प्रमुख मागणीसाठी ५ मार्च रोजी मुंबईतील आझाद मैदानावर मांगवीर महामोर्चा काढण्यात येणार .

या मोर्चाच्या पार्श्वभूमीवर मातंग समाजाच्या न्यायासाठी लढणाऱ्या संघटनांच्या वतीने नांदेडमध्ये बैठक आयोजित करण्यात आली होती. अण्णाभाऊ साठे क्रांती आंदोलनाचे संस्थापक अध्यक्ष सतीश कावडे यांच्या पुढाकारातून आयोजित केलेल्या या बैठकीच्या अध्यक्षस्थानी दलित मित्र पुरस्कार प्राप्त रामराम सूर्यवंशी हे . यावेळी कॉम्रेड गणपत भिसे, लालबाजी घाटे, इंजि. भाऊसाहेब घोडे, एल. डी. कदम, हेमंत साळवे, किशोर कांबळे, विजय रणखांब, दत्ता कंधारे, भालेराव, वाघमारे आदी सह अनेक मान्यवर उपस्थित . सूत्रसंचालन परमेश्वर बंडेवार यांनी केले.

### चुडाव्याच्या शेतकऱ्याने केली आत्महत्या

**परभणी,/प्रतिनिधी :** पूर्णा तालुक्यातील चुडावा येथील गुणाजी दिगांबर पवार (वय ५०) या शेतकऱ्याने शुक्रवारी (दि.१४) रात्री कर्जबाजारीपणास कंटाळून विषारी औषध प्राशन करीत आत्महत्या केली. परभणी जिल्हा बँक व ट ग्रामीण बँकेतून या शेतकऱ्याने पीककर्ज घेतले . शेती जास्त पिकत नसल्यामुळे कर्ज फेडावे तरी कसे व मुलांचे शिक्षण करावे तरी कसे या चिंतेने ते ग्रासले . शुक्रवारी सायंकाळी साडेसहा वाजेच्या सुमारास ते शेताकडे जातो म्हणून घराबाहेर पडले. रात्री उशीरापर्यंत ते परतले नाहीत.

तरुण भारत
कार्यालयाचा पत्ता- डॉ.लोया नेत्र रुग्णालयासमोर ढवळे यांचे निवासस्थान शिवाजी नगर, परभणी
❑ दैनिक ❑ वेबसाईट ❑ सोशल मिडिया
छोट्या जाहीराती व प्रगटनासाठी
खरेदी-विक्री-प्रॉपर्टी व वाहन/भाडेपट्टी/नोकरी विषयक/ प्रवेश/ विवाह विषयक/ शैक्षणिक/ आरोग्य/ ड्रायव्हिंग स्कूल/ मोबाईल/ हॉटेल/ रेस्टॉरंट/ आईस्क्रिम पार्लर/ मसाज पार्लर/ ब्युटी पार्लर/ कागदपत्रे हरवले/ चेंज ऑफ नेम/ न्यायालयीन व धर्मादाय आयुक्त कार्यालय प्रगटने/
९४ २३३२४६६६५, ९२८४६६४४३०, ९२८४६९५५८३

## सर सय्यद अहमद खान उर्दू प्रा.शाळेत स्वयंशासन दिन साजरा

**जिंतूर,/प्रतिनिधी :** सर सय्यद अहमद खान उर्दू प्रा. शाळेत ''स्वयंशासन दिन'' व निरोप समारंभ उत्साहात संपन्न.

दिनांक २२ फेब्रुवारी रोजी शनिवार सर सय्यद अहमद खान उर्दू प्रा शा जिंतूर या शाळेत इयत्ता ०७ वी च्या विद्यार्थ्यांचा *''स्वयंशासन दिन'' तसेच सहावीच्या विद्यार्थ्यांकडून सातवीच्या विद्यार्थ्यांना निरोप समारंभ कार्यक्रम संपन्न झाला.

सकाळी ०९:३० ते ०१:३० वाजता इयत्ता सातवीच्या विद्यार्थ्यांसाठी ''स्वयंशासन दिन'' चे आयोजन करण्यात आले . ज्या मध्ये मुख्याध्यापक म्हणून राफिया खान रईस खान पठाण यांनी तर उपमुख्याध्यापक म्हणून अब्दुल रहमान अब्दुल साजिद यांनी कार्यभार सांभाळला. एकुण ४३ विद्यार्थ्यांनी शिक्षक म्हणून इयत्ता पहिली ते सहावीच्या विद्यार्थ्यांना अध्यापन केले. सोबतच एक लिपिक व दोन सेवक म्हणून एकूण ४६ कर्मचाऱ्यांनी शाळेच्या का कार्यभार उत्तम प्रकारे सांभाळले. या वेळेत वर्ग ७ वी च्या विद्यार्थ्यांना मुख्याध्यापक ,उपमुख्याध्यापक व शिक्षक तसेच शिक्षकतर कर्मचारी यांना एका दिवसासाठी प्रशासन चालविण्याच्या अनुभव विद्यार्थ्यांना मिळाला. त्यामुळे विद्यार्थ्यांनी मुख्याध्यापक व संस्थेचे आभार मानले. यावेळी सातवीच्या विद्यार्थ्यांना निरोप देण्यात आला. या कार्यक्रमात अनेक विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रम संपन्न झाल्यावर विद्यार्थ्यांनी स्नेहभोजनाचा आनंद घेतला. दुपारी ०२:०० वाजता इयत्ता सातवीचा विद्यार्थ्यांसाठी ''निरोप समारंभ'' कार्यक्रम ठेवण्यात आला .

या कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मुख्याध्यापक त्याचे शिक्षक व इतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.





**परभणी- छत्रपती संभाजीनगर येथे १३ फेब्रुवारी ते १९ फेब्रुवारी २०२५ दर्म्यान श्री त्र शिवचरित्र पारायण सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे त्या कार्यक्रमातील दिनांक १७ फेब्रुवारी २०२५ चे काही क्षणचित्रे. कार्यक्रमात आयोजक तथा वाचा शिवचरित्र छत्रपतीचे लेखक प्रा चंद्रकांत भराट, मराठा प्रवाह समन्वय समितीचे प्रदेशाध्यक्ष धाराजी भुसारे सह इतर पदाधिकारी दिसत आहेत.**

## चारठाण्यात गायीचे डोहाळे जेवणाचा आगळा वेगळा कार्यक्रम साजरा

**चारठाणा,/प्रतिनिधी-** येथील शेती मालक संजय देशपांडे यांच्या शेतातील शेत मजुर संदिप आसाराम आवचार यांच्या परिवाराने गाईच्या डोहाळे जेवणाचा कार्यक्रम आयोजित आज दुपारी १२वा. करून गाईचे संरक्षण करण्याचा एक मोलाचा सल्ला याद्वारे जनतेला दिला .

शासनाने गाईला मातेचा दर्जा दिला आहे.हिंदुस्थानी संस्कृती व कृषी संस्कृतीमध्ये गाईचे अनन्यसाधारण महत्व . गाय आणि त्यांच्यापासून झालेले बैल, गोरे याच्यावर शेतकरी अवलंबून आहे, त्यामुळे हिंदू संस्कृतीमध्ये गाईला देवाचा दर्जा . चारठाणा येथे गाईच्या डोहाळे जेवणाचा आगळावेगळा कार्यक्रम पार पडला.. त्यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी सांगितले की, देवाची, संतांची, आई-वडिलांची, वडिलधाऱ्या माणसांची सेवा करून तर मोक्ष प्राप्त होईल. त्याचप्रमाणे गोमातेची सेवा करणे सुद्धा माझ्यासाठी क्रमप्राप्त आहे, असे त्यांनी सामनाशी बोलताना सांगितले. त्यांच्या घरामध्ये पिढ्यान्पिढ्या गोपालनाचा व्यवसाय केला . त्यामुळे त्यांच्या कुटुंबासाठी अत्यंत पवित्र व कुटुंबाचा एक घटक असल्याचे त्यांनी सांगितले. गाईचे संरक्षण करण्यासाठी आज शेतकऱ्यांनी पुढाकार घेतला पाहिजे. त्यामुळेच गाईचे संरक्षण व्हावे तिची सेवा घडावी, गाईची हत्या थांबवावी व प्रत्येक शेतकऱ्याने तिचे संरक्षण करावे या कार्यक्रमाच्या मागचा हाच उद्देश असल्याचे सांगितले. खरे तर हिंदू धर्मानुसार गोमातेमध्ये १२ आदित्य आठ बसु, अकरा रुद्र व दोन अश्विन कुमार मिळून तेहतीस . त्यामुळेच हिंदू धर्मात गोमातेला जास्तीचे महत्त्व प्राप्त झाले . ऋग्वेदात तर गाईला अग्न्या म्हटले . गाय ही अद्वितीय असल्याचे यजुर्वेद सांगतो तर संपत्तीचे घर असल्याचे अथर्ववेद सांगतो त्यामुळेच वेगवेगळ्या आख्यायिकानुसार गाय हे विष्णूचे रूप असल्याचे म्हटले जाते. गाईचे महत्त्व सांगावयाचे झाले तर पवित्र व अपवित्र अशा कुठल्याही कार्यक्रमासाठी गाय ही खूप महत्त्वाची असते. शास्त्र आणि विद्वानांच्या मते काही प्राणी आणि पक्षी आहेत जे आत्म्याच्या विकासाच्या प्रवासाच्या शेवटच्या टप्प्यावर . गायदेखील त्यापैकी एक . त्यानंतर आत्म्याला मानवी रूपात यावे लागते. कत्तलखान्यात जाणाऱ्या गायीला वाचून तिच्या पालनपोषणाची व्यवस्था केल्याने माणसाला गो यज्ञाचे फळ मिळते. यामुळेच या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यासाठी आज कमीत-कमी २१स्त्रियांनी गोमातेला साडीच्या स्वरूपात आहेर घेऊन येऊन तिची पूजा,औवाळणी व



ओटी भरत उपस्थिती नोंदवली. या स्त्रियांना सुद्धा साडीच्या व रुमाल टोपीच्या स्वरूपात संदीप आवचार व याची पत्नी रेणुका आवचार यांनी आहेर देऊन स्वादिष्ट व रुचकर जेवणाची व्यवस्था केली. या कार्यक्रमासाठी फुले क्रांती स्व सा.बचत गट अध्यक्ष सुवर्णा एकनाथ आवचार, काशिबाई होले,रुखमीणबाई आवचार, मुक्ता रासवे,मनिषाआवचार, अंकिता रासवे,राधा होले,सावता आवचार, सावता वानखरे,वर्षा घाटुळ,अशोक घाटुळ,अमोल काळे समस्त गावकरी मंडळ, शेतकरी यांनी सहकार्य केले,तसेच या कार्यक्रमासाठी पत्रकार एकनाथआवचार, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ तालुका कार्यकरणी सदस्य अनिल देशपांडे व सर्व पदाधिकारी उपस्थित होते.

## भोसीत स्टेवर्डशिप डे अंतर्गत किटकनाशकाच्या सुरक्षित वापरासाठी शिबीर



**जिंतूर,/प्रतिनिधी:** छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्त इंसेक्टिसाइइस इंडीया लिमिटेड ट्रॅक्टर ब्रँड कंपनीच्या वतीने तालुक्यातील भोसी गावात स्टेवर्डशिप डे अंतर्गत किटकनाशकाच्या सुरक्षित वापराबाबत मार्गदर्शन शिबीराचे आयोजन दिनांक २१ फेब्रुवारी रोजी करण्यात आले होते . मार्गदर्शन कार्यक्रमास सरपंच चंद्रकला रामप्रसाद सोनुळे उपसरपंच मिराबाई ठोंबरे व ग्राम पंचायत सदस्य,शेतकरी व विक्रेते उपस्थीत होते यावेळी इंसेक्टिसाइइस इडीया लिमीटेडचे रिजनल अधिकारी साजिद खान पठाण यांनी शेतकऱ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की कीटकनाशक जबाबदारीने कसा वापर करावा याचे प्रात्याक्षिके करून माहिती दिली फवारणी करतांना काय करावे व काय करूनये याबाबत सांगण्यात शिवाय कीटकनाशके फवारणी नंतर हात व तोड स्वच्छ धुवावे कीटकनाशके सुरक्षित ठिकाणी आणी मुलांच्या पासून दूर ठेवावा,तर रिकाम्या बाटल्या इतरत्र शेतात कोठेही टाकण्यात येऊ नये,फवारणीनंतर लगेच जेवण करण्याचे टाळावे त्याच बरोबर कीटकनाशके रंगानुसार वर्गीकरण करण्यात आले असून लाल रंग अत्यंत विषारी पिवळा रंग जास्त विषारी निळा मध्यम आणि हिरवा कमी विषारी दर्शवतो,शिबीरात तज्ज्ञांनी शेतक-याना कीटकनाशके यांची योग्य ओळख त्याच्या प्रभावीतेच्या मर्यादा आणी संभाव्य जोखमी बाबत माहीती दिळी,शेती उत्पादनवाढिस लागावे व आरोग्यावरही परिणाम होणार नाही यासाठी सुरक्षित शेतीचा संकल्प यावेळी शेतकऱ्यांनी केला किटकनाशक विक्रेते गजानन डुब्बेवार,शरद ठोबरे शेतकरी भास्करराव ठोबरे याच्यासह भोसी गावातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कर्मचाऱ्यांनी पर्यंत केले.

## सेलूत सामान्यज्ञान परीक्षेला मोठा प्रतिसाद दोन हजार विद्यार्थ्यांचा सहभाग

**सेलू,/प्रतिनिधी :** येथील सार्वजनिक शिवजन्मोत्सव समितीच्या वतीने त्र शिवाजी महाराजांच्या जयंती निमित्त शिवाजी राजांच्या जिवन चरित्रावर आधारीत रविवारी १६ फेब्रुवारीरोजी आयोजित तालुकास्तरीय सामान्यज्ञान स्पर्धा परीक्षेत तालुक्यातील विविध शाळा, महाविद्यालयातील दोन हजार विद्यार्थ्यांच्या उत्स्फ ूर्त व मिळाला.

येथील नूतन विद्यालय व केशवराज बाबासाहेब विद्यालयात ५ वी ते ६ वी, ७ वी ते ८ वी व ९ वी ते १२ वी अशा तीन गटात आयोजित सामान्यज्ञान स्पर्धा परीक्षा यशस्वीपणे पार पडल्या.

परीक्षा यशस्वी करण्यासाठी केंद्र संचालक म्हणून विलास खरात, रामराव गायकवाड, किरण जाधव , तानाजी भोसले, रामराव बोबडे यांनी काम पाहिले. तालुक्यातील विविध शाळांमधील १०० शिक्षकांनी पर्यवेक्षक म्हणून उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवला. स्पर्धा परीक्षा यशस्वीतेसाठी समितीचे अध्यक्ष गोविंद काष्टे, उपाध्यक्ष अप्पूसेठ सोळंके, सचिव रामेश्वर शेरे, प्राचार्य डॉ.शरद कुलकर्णी, मुख्याध्यापक सर्जे राव लहाने, रोहीदास मोगल यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशांत देशमुख, आत्माराम हारकळ, सुरेश कवडे, गणेश माळवे, सुभाष मोहकरे, किरण खरात, नरेश पाटील, योगेश ढवारे , सर्जेराव सोळंके, रणजीत गायके, दतात्रय यादव, सिध्देश्वर मुरकुटे , बाबासाहेब काष्टे, मुकुंद सोळंके आदींनी परिश्रम घेतले. विजेत्या स्पर्धकांना १९ फेब्रुवारी शिवजयंतीदिनी रोख पारितोषिके , सन्मान चिन्ह व प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात येणार .

## वझुर परिसरात ग्रामस्थांचे पालकमंत्री यांना साकडे

**परभणी,/प्रतिनिधी-** जिल्ह्यातील पिंगळी-ताडलिमला-वझुर-रावराजुर-मरडसगाव प्रजिमा ३५ गोदावरी नदीवरील रखडलेल्या पुलाचे काम त्वरीत सुरु करावे, अशी मागणी वझूर परिसरातील ग्रामस्थांनी जिल्ह्याच्या पालकमंत्री सौ. मेघना साकोरे-बोर्डीकर यांना सादर केलेल्या निवेदनाद्वारे केली .

लक्ष्मणराव पवार, डॉ. केदार खटींग, ॲड. अशोकराव शिंदे, प्रल्हाद पवार, गोपाळराव पवार, निलेश पवार यांच्यासह अन्य ग्रामस्थांनी पालकमंत्री बोर्डीकर यांना एक तपशीलवार निवेदन सादर केले. त्याद्वारे, वझुर (ता.पुर्णा) व रावराजुर (ता. पालम) दोन्ही गावच्या मध्यभागातून गोदावरी नदीच्या पात्रात पुलाचे काम चालु . ६ मार्च २०१९ रोजी कार्यारंभ आदेश होऊन ४ वर्षाहुन अधिक काळ उलटला आहे अद्याप काम पुर्ण झाले नसुन पुलाअभावी ग्रामस्थांचे अतोनात नुकसान होत आहे व अनेक अडचनींना सामोरे जावे लागत . हा पूल १९५४ नागपूर प्लानानुसार मंजुर . परभणी २२२ (नवीन ६१) ते लातुर राष्ट्रीय महामार्ग १६१ होणार असून यामुळे दोन जिल्हयातील ४८ किमी अंतर कमी होणार . गंगाखेड, परळी, अंबाजोगाई शहर ओलांडून वाहतूक कोंडीमुळे लागणारा वेळ बचत होईल. या मार्गीने अंतर अंदाजे १६५ किमी . या तुलनेत त्रिधारा येथून पिंगळी, वझुर, रावराजुर, मरडसगाव, बनवस, माळेगाव, अहमदपुरमार्गे लातुर ११७ कि.मी. अंतर आहे यामुळे इंधनासहित वेळेची बचत होईल. आंध्रप्रदेश व कर्नाटक राज्य सीमा जवळ पडतील.तसेच या मार्गावर १०० हुन अधिक गावे वाहतुक होऊन दळणवळण सोयीस्कर होईल व उद्योगधंदे शेतीला पुरक व्यवसाय, मुख्य बाजारपेठ, शेतमाल खरेदीविक्रीसाठी सोयीस्कर होऊ शकते, असे या निवेदनाद्वारे निदर्शनास आणून दिले.

पिंगळी (बा) पद्मावती वझुर व बनवस या मार्गावर परभणी जिल्हा प्राचीन ऐतिहासिक वारसा स्थळ, तीर्थक्षेत्र ज्यामध्ये प्राचीन मंदिरे असुन स्थापत्यकला, मूर्तीकला, वास्तुकला पाहायला मिळतात. पर्यटनाला चालना, ऐतिहासिक पर्यटन, धार्मिक पर्यटन, सांस्कृतिक पर्यटन, कृषी पर्यटन, शैक्षणिक पर्यटन होऊ शकते. या पुलाचे काम पूर्ण झाल्यास डिग्रस बंधाऱ्यात पाणी साठवणुक क्षमतेच्या १०० टक्के पाणीसाठा उपलब्ध होईल, अशी अपेक्षाही या निवेदनाद्वारे व्यक्त करण्यात आली.